# माणूस

शनिवार । १५ जानेवारी १९७७ । साठ पैसे



मेळावा संपला. पवना कृषक संघाचे अध्यक्ष दगडू मारुती कालेकर यांनी वजनकाट्याची पूजा केली. नारळ फुटला. गुलाल उधळला गेला आणि 'पवना कृषक' आणि 'ग्राहक पंचायत' यांच्या जयजयकाराने वातावरण दुमदुमून गेले.

एका नव्या उपक्रमाची ओळख

पृष्ठ...५

# साप्ताहिक माणूस

वर्ष सोळावे – अंक तेहतिसावा

१५ जानेवारी १९७७

मूल्य : साठ पैसे

संपादक

**श्री. ग. माजगावकर**

साहाय्यक

दिलीप माजगावकर

सौ. निर्मला पुरंदरे

□

वार्षिक वर्गणी : छत्तीस रुपये

सहामाही वर्गणी : वीस रुपये

परदेशची वर्गणी : पंचावन्न रुपये

□



प्रकाशित लेख, चित्रे इत्यादींबाबतचे हक्क स्वाधीन. अंकात व्यक्त झालेल्या मतांशी चालक सहमत असतीलच असे नाही.



□

राजहंस प्रकाशन संस्थेच्या मालकीचे हे साप्ताहिक संस्थेतर्फे मुद्रक व प्रकाशक **श्री. ग. माजगावकर** यांनी साप्ताहिक मुद्रण, १०२५ सदाशिव, पुणे येथे छापून तेथेच संस्थेच्या कार्यालयात प्रसिद्ध केले.

□

**साप्ताहिक माणूस**

१०२५ सदाशिव पेठ

नागनाथ पाराजवळ

पुणे ४११ ०३०

□

दूरध्वनी : ४३४५९

□


### मुक्काम : नंदुरबार

# युवक महोत्सव

## काही गोड-अगोड खरं तर अगोडच

पुणे विद्यापीठाचा युवक महोत्सव धुळे जिल्ह्यातल्या या आडगावी डिसेंबरच्या शेवटच्या आठवड्यात घेण्यात आला होता.

युवक महोत्सव म्हणजे काय, तो कशासाठी, त्यातल्या स्पर्धा–कलाकार–विजेते वगैरे सर्व गोष्टींचा पुरेसा ऊहापोह वृत्तपत्रांतून झालाच असेल. या लेखाचा उद्देश तो नाही. काही निवडक मुद्यांकडे लक्ष वेधायचे आहे. साहजिकच हे काही युवक महोत्सवाचे संपूर्ण चित्र नव्हे.

महोत्सवाच्या संयोजनाविषयी थोडेसे :

नंदुरबारला एकच कॉलेज आहे–आर्टस्, सायन्स, कॉमर्स कॉलेज. अर्थात तसं एक थोडंसं कॉलेज ऑफ एज्युकेशनसुद्धा आहे. पण युवक महोत्सवाची जबाबदारी आर्टस-सायन्स-कॉमर्सवरच होती. या लहान कॉलेजला एवढी जबाबदारी झेपली नाही असं दिसतं.

एक तर कॉलेजला स्वतःचं वसतिगृह नाही, ही उणीव सगळ्यात मोठी. यामुळं स्पर्धकांच्या निवासाची व्यवस्था करताना त्रेधा झाली. कॉलेजचे बरेचसे वर्ग, जवळची एक शाळा, बी. एड्. कॉलेज व (बहुधा) एका मुलींच्या शाळेचे वसतिगृह एवढ्या संस्था मोकळ्या करून घेतल्या, तेव्हा कुठे प्रचंड दाटीवाटीने विद्यार्थी-विद्यार्थिनींची सोय झाली. स्पर्धक तब्बल पावणेसहाशे. सुमारे चाळीस प्राध्यापक त्यातले बहुसंख्य कॉलेजच्या वर्गातच सामावले. तरीही उरलेल्या काही पाहुण्यांची सोय, कॉलेजपासून दहा-बारा मिनिटांच्या अंतरावरल्या आणखी एका हायस्कूलमध्ये करण्यात आली. एवढी चारीधाम यात्रा अपुरी पडेल म्हणून की काय, स्नानगृहे व विशेषतः स्वच्छतागृहे यांची जागा या सगळ्यापासून पुरेशी लांब आडवाटेला होती. निवासव्यवस्थेतली अपरिहार्य उणीव एकवेळ समजून घेता येईल. पण स्नानगृहे-स्वच्छतागृहांची अपुरी ओंगळ व गैरसोयीची व्यवस्था ही जबाबदारी व कल्पनाशक्ती कमी पडल्यामुळेच झाली, हे उघड आहे.

भोजनव्यवस्थापकाइतकी दहशत अख्ख्या महोत्सवात कुणाचीच

---

**टीप**

या अंकातील पृष्ठ ११ वर पुनर्मुद्रित केलेल्या श्री. भास्कर लक्ष्मण भोळे यांच्या 'समाजवादी क्रांतीच्या वाटेतील खाचखळगे' या लेखातील विवेचन–Svetozar Stojanovic लिखित 'Between Ideals and Reality : A critique of Socialism and its Future' (ऑक्सफर्ड युनिव्हर्सिटी प्रेस १९७३) या ग्रंथाच्या आधारे केलेले आहे.

बसली नसेल. सवलतीच्या दरात भोजन देण्यात आलेले नसतानाही ज्या दर्जाचे अन्न त्यांनी पहिले दोन दिवस खाऊ घातले त्यावरून पाहुण्या विद्यार्थ्यांना अपचन होऊ नये यांबद्दल त्यांचा कटाक्ष असल्याचा दिसत होते. पुढील दोन दिवसांत यात काही सुधारणा झाली असल्यास कल्पना नाही, कारण सुरुवातीच्या अनुभवानंतर मी भोजनगृहाकडे फिरकण्याचे धाडस केले नाही. तिथल्या माइकवरून वेगवेगळ्या स्पीडने अहोरात्र किंचाळणाऱ्या हिंदी गाण्यांच्या ध्वनिमुद्रिका हेही एक कारण होतेच. कॉलेजचे भुयारवजा कँटीन किंवा कँटीनवजा तळघर हाही एक अजबखाना होता. इथली स्वच्छता, सेवा व पदार्थ याबद्दल अधिक न बोलणेच योग्य. अर्थात तसं पाहिलं तर भोजननिवासाच्या गैरसोयीबद्दल मी केलेली तक्रार अयोग्यच आहे. कारण महोत्सवाच्या उद्‌घाटनाच्या भाषणात आपल्या 'माननीय कुलगुरूंनी दिलेल्या संदेशानुसार या गैरसोयी फारशा महत्त्वाच्या नसून त्या दूर करणं परस्परसामंजस्यानं सहज शक्य होतं ! आपल्या तक्रारींच्या पार्श्वभूमीवर माननीय कुलगुरूंचा हा रामबाण सल्ला अनेकांना झोंबला. युवक महोत्सवाला किंवा क्रीडास्पर्धांना विद्यार्थी येतात ते जेवण्या-झोपण्यासाठी नव्हे हे तर खरंच, पण याचा अर्थ, वाटेल त्या गैरसोयींची व त्या सोडविण्याची सवय करण्यासाठीच ते येतात असाही होत नाही. हा काही एन. सी. सी. चा कँप नव्हे. गैरसोयी अपरिहार्य असतील तर त्याबद्दल दिलगिरी व्यक्त करणे हा मार्ग खरा सौजन्याचा. कॉलेजचे प्राचार्य श्री. जोंधळे यांनी तो स्वीकारलाही. एरवी विद्यार्थ्यांचे ऐकण्याचे दिवस आहेत म्हणून त्यांनी काय काहीही ऐकावे ?

या काहीही ऐकण्यावरून आठवला तो महोत्सवातला परिसंवाद नामक प्रकार. परिसंवादात बोलणाऱ्या स्पर्धकांकडून काही ऐकण्यापेक्षा त्यांनाच काहीतरी आणि काहीबाही ऐकवण्याचा उपक्रम संयोजकांनी इथे केला. मुळात 'आदिवासी समाज आणि समस्या' हा या परिसंवादाचा विषय आणि त्याची अयोजनपद्धती दोन्ही मराठीतील परिसंवादाच्या रुढ कल्पनेपासून फटकून वागणारे होते. धुळे जिल्ह्यातली आदिवासींची संख्या ध्यानात घेऊन हा विषय नेमला हे ठीक. पण या सखोल विषयावर पुरेशी तयारी करून आलेल्या स्पर्धकांना आपले मुद्दे मांडण्यासाठी प्रत्येकी फक्त तीन मिनिटे वेळ देण्यात आला, तेव्हा परीक्षकांना स्पर्धकांच्या वक्तृत्वाची चाचणी घ्यायची आहे की बोलण्याच्या वेगाची, याची शंका येऊ लागली. स्पर्धक जेमतेम अठरा-वीस होते, तर प्रत्येकाला पुरेसा अवधी का दिला गेला नाही ? अडीच तासात परिसंवाद उरकला, तो तास-दोन तास अधिक चालला असता किंवा एकाऐवजी दोन दिवसांत विभागला असता तर काय बिघडले असते ? बाहेरच्या वाद-वक्तृत्वस्पर्धा दोन-तीन दिवस चालतातच. तीन मिनिटांपेक्षा जास्त वेळ तर शालेय पातळीवरच्या स्पर्धांतही दिला जातो. कदाचित कमी बोलून जास्त परिणाम साधण्याचे विद्यार्थ्यांचे कौशल्य परीक्षकांना अजमावयाचे असावे. परंतु अशा वेळी त्यांनी जास्तीत जास्त वेळ मौन पाळण्याची स्पर्धा घ्यायला हरकत नव्हती.

स्पर्धकांनी आपले मुद्दे मांडल्यानंतर सुमारे पाऊण तास सर्वांनी मिळून या विषयावर चर्चा केली. या चर्चेचे नियंत्रण एका परीक्षकांनी केले—म्हणजे स्वतःच काही मुद्दे उपस्थित करून त्यावर आपल्या मर्जीनुसार निरनिराळ्या विद्यार्थ्यांना बोलण्याची संधी दिली. या प्रकारातून आपण इतर गोष्टींबरोबरच नेतृत्वगुणही पाहणार असल्याची घोषणाही त्यांनी केली, तथापि प्रत्यक्षात या स्पर्धेचे स्वरूप चतुःशृंगीच्या जत्रेतल्या, फिरूनफिरून ठराविक आकड्यांवर थांबणाऱ्या चक्राच्या जुगारी स्टॉलसारखे झाले होते.

स्पर्धकांचे एवढे हाल पुरेसे नव्हते म्हणून की काय परिसंवादाच्या मध्येच तीन आदिवासी विद्यार्थ्यांना उभे करून त्यांच्याकडून आदिवासींच्या समस्या सांगणारी हातवाऱ्यासकट पाठ असलेली भाषणे म्हणून घेण्यात आली. दस्तुरखुद्द कुलगुरूंनी एक दमदार भाषण केले. या सर्वांच्या भाषणातला आदिवासींचा कळवळा समजून घेण्यासारखा होता, पण शहरी जीवनावर केलेली आगपाखड अकारण वाटली. एकंदर परिसंवादाचा नूरच एकीकडे, 'पांढरपेशे. तुम्हाला काय आदीवासींच्या दुःखाचं सोयरसुतक ?' असा तुच्छतेचा होता तर दुसरीकडे 'पहा हे पंधरा-वीस शहरी पोपट कसे आता आदिवासींवर बोलायला आणलेत,' असा आढ्यतेचा होता. माननीय कुलगुरूंनी 'डेक्कन क्वीन' हा शब्द भाषणात वापरणाऱ्या एका स्पर्धकावर उगीचच हल्ला चढवला होता. डेक्कनक्वीन म्हणे आदिवासींना माहीत नाही. याचा अर्थ, आदिवासी समस्येवर बोलताना सर्व शब्द आदिवासींना समजतील असेच वापरायचे की काय ? स्पर्धक आदिवासी बोलीत न बोलता शुद्ध मराठीत बोलल्याबद्दल टीका झाली नाही, हेच नशीब. 'आपल्या मुलांना चांगले इंग्रजी येत नाही, याची आपल्याला काळजी वाटते, पण आदिवासींच्या मुलांना गमभनसुद्धा येत नाही, याची वाटत नाही,' असंही एक विधान माननीय कुलगुरूंनी केलं. याचा अर्थ काय ? या दोहोंचा संबंध काय ? पदव्युत्तर शिक्षण व तेही प्रामुख्याने इंग्रजी माध्यमातून देणाऱ्या विद्यापीठाच्या कुलगुरूंनी हे बोलावं, या कर्माला काय म्हणायचं ? आदिवासींना गमभन येण्याइतकंच, ज्यांना गमभन येतं त्यांनी उच्च शिक्षण घेणं राष्ट्रीय दृष्टीनेही महत्त्वाचं आहे. त्यांनी उच्च शिक्षण घेतल्यामुळेच आदिवासी समाज अज्ञानी राहिला अशी स्थिती आहे काय ? आदिवासी समाजाची स्थिती दयनीय आहे, हें एकदम मान्य. पण त्याचे सर्व खापर शहरी–प्रगत समाजघटकांच्या माथी फोडण्याचा प्रयोग स्थानिक लोकप्रियता मिळवून देणारा असला तरी न्याय्य नक्कीच नव्हे. तथापि अशाप्रकारचे वातावरण विशेषतः परिसंवादाच्या आसपास बरेच दाटून राहिले होते.

हे सारं का, कशासाठी ?

असं ऐकतो की, या परिसंवादाला जोडूनच एक मोठा आदिवासी मेळावा आयोजित करावा व त्याला मुख्यमंत्री किंवा अन्य एखाद्या वजनदार व्यक्तीला बोलावून महोत्सवाचं सामाजिक (की राजकीय?) महत्त्व, वजन, शान वाढवावी असा एक प्रयत्न झाला होता, तथापि काही कारणाने हा मेळावा बारगळला. त्यानंतर, केवळ सुशिक्षित आदिवासी स्त्रीपुरुषांचा मेळावा माननीय कुलगुरूंच्या अध्यक्षतेखाली घ्यावा, असाही प्रयत्न फसला. आणि मग या परिसंवादालाच मेळाव्याच्या अवशेषाचं स्वरूप प्राप्त झालं. कारण परिसंवाद संपल्यानंतर त्याचा एक भाग म्हणूनच, स्थानिक महाविद्यालयातल्या आदिवासी युवतींनी एक नृत्यही तिथेच सादर केलं. हे सगळे उपक्रम अत्यंत स्तुत्य आहेत, तथापि त्यामुळे त्यातल्या स्पर्धाप्रकरणाची

अक्षम्य हेळसांड झाली एवढीच तक्रार. परिसंवादाच्या वेळची एकंदर शिस्त तर वाखाणण्यापलिकडे होती. बडीबडी धेंडे, स्थानिक थोर नेतेमंडळी, विद्यापीठ कार्यकारणीचे मान्यवर सभासद, इतर श्रेष्ठ प्राध्यापकादि लोक यांचं येणं-जाणं सारखं सुरू. प्रत्येकाला उत्थापन, आमतस्वागत, खुर्च्यांची हलवाहलव वगैरे पुष्कळ काही. किरकोळ लहानमोठ्या तक्रारी चव्हाटयावर मांडण्यापेक्षा आदेशानुसार गोड मानून घेतलेल्याच बऱ्या.

अर्थात या सगळ्या तक्रारी गोड मानून घेतल्या असत्याही. पण हा लेख लिहितानाचं खरं दुखणं आहे ते या सगळ्यातून डोकावणारा राजकारणाचा चंचुप्रवेश. युवक महोत्सवाच्या समारोपसमारंभात तर तो प्रकर्षानं जाणवला. महोत्सवाचं यजमानपद असलेलं नंदुरबार कॉलेज व त्याचे प्राचार्य एकंदरीतच पार्श्वभूमीत राहिले आहेत आणि खरा खेळ समानपक्षीय हितसंबंध असलेली मंडळी खेळत आहेत, असं जाणवत राहिलं. महोत्सवातलं कर्तेपण तर 'नंदुरबार तालुका विधायक समिती'कडे उघडपणेच गेलं होतं. या संस्थेचे अध्यक्ष व धुळे जिल्हा परिषदेचे उपाध्यक्ष पूज्य बापूजी पाटील संपूर्ण महोत्सवात अगत्यानं उपस्थित तर होतेच, शिवाय सर्वसूत्रधारही होते. स्थानिक लहानमोठ्या पुढाऱ्यांचाही असाच वावर. (तेही अधिकाऱ्यांचे बिल्ले छातीवर लटकावून) प्रत्यक्षात संबंध नसतानाही होता. त्यालाही एकवेळ हरकत नव्हती, पण त्यामानानं सब काम सुबक-सुखद होत नव्हतं. विद्यापीठाच्या युवक महोत्सवावर अशा प्रकारे एखाद्या पक्षसंघटनेचा वरचष्मा असावा ही शंका फारशी आनंददायक नाही.

युवक महोत्सवाचा शेवट दरवर्षीसारखाच उदास आणि कंटाळवाणा झाला. आभाराची भाषणे चक्क तीन वक्त्यांनी केली, तर एका ज्येष्ठ वक्त्याने परीक्षकांचे आभार मानताना अनवधानाने अनुद्गार काढले. नंदुरबार तालुका विधायक समितीचे सचिव श्री. बोरसे यांनी केलेले आभाराचे ऐतिहासिक भाषण विक्रमी लांबण लावणारे ठरावे. यावेळी कॉलेजच्या 'सबंध' मैदानापासून गावातल्या 'सबंध' रिक्षा-टांगेवाल्यापर्यंत सर्वांचे (आणि कुणाचेही) 'सबंध' आभार मानण्यात आले. एकूण समारंभही बऱ्यापैकी अघळपघळ झाला, आणि विद्यापीठाचे प्रतिनिधी कोपऱ्यातच राहिल्यासारखे दिसले.

असं एकुणात बरंच काही. गोड—अगोड वगैरे.

म्हणूनच सुरुवातीला लिहिल्याप्रमाणे हा काही युवक महोत्सवाचा समग्र वृत्तांत नव्हे!

—प्रतिनिधी

# नगरसेवकांचे नेत्रदान

कुटुंबनियोजनाइतकी नसली तरी एकंदरीत सध्या नेत्रदानाची मोहीम बऱ्याच मोठ्या प्रमाणावर चालू आहे. याचं एक कारण म्हणजे मध्यंतरी संजय गांधींनी व्यक्त केलेली स्वतःच्या नेत्रदानाची इच्छा. तेव्हापासून युवक कांग्रेस व इतर बऱ्याच संघटनांनी ही मोहीम हाती घेतली. काही दिवसांपूर्वी ठाणे नगरपालिकेने तर सक्तीच्या नेत्रदानाचा ठराव संमत केला. आणि यात आपणही मागे पडू नये म्हणून की काय, पण परवा पुणे महानगरपालिकेतही यावर चर्चा झाली (आणि नेत्रदानासंबंधीचे गांभीर्य बरेच कमी करून टाकण्यात आले!) अखेर सर्व नगरसेवकांची नेत्रदानाची तयारी दर्शविणारा ठराव संमत केला गेला.

या प्रसंगी झालेल्या चर्चेचा गोषवारा इथे देण्यात काहीच अर्थ नाही. पण चुकीच्या माहितीवर आधारलेली काही विधाने केली गेली त्याची नोंद घेणे जरूरीचे आहे.

एका सदस्याने एक सर्वसाधारण आरोप केला की, कुणी नेत्रदानाची इच्छा व्यक्त केल्यास डॉक्टरलोकच त्या विनंतीकडे दुर्लक्ष करतात. या सदस्यांना ही माहिती कुणी पुरवली? वस्तुस्थिती अगदी उलटी आहे. ससून हॉस्पिटलमध्ये 'आय् बँक' आहे. प्रसिद्ध नेत्रविशारद डॉ. रॉय हे तिचे संचालक. (याच डॉ. रॉय यांच्या मार्गदर्शनाखाली पुण्यातील काही तरुणांनी नेत्रदानाची मोहीम पूर्वीपासूनच चालविली आहे.) त्यांना जर या सदस्याने माहिती विचारली असती तर नक्कीच भ्रमनिरास झाला असता. सत्य परिस्थिती अशी आहे की, कुणी कागदोपत्री नेत्रदानाची इच्छा व्यक्त केली तरी त्याच्या मृत्यूनंतर त्याचे नातेवाईक त्याची ही इच्छा पुरी करत नाहीत. म्हणजे डॉक्टरांना बोलावणे वगैरे प्रकार होतच नाहीत. आतापर्यंत आय् बँकेत जमा झालेल्या डोळ्यांची संख्या फक्त तीन आहे. आणि यात एकही महाराष्ट्रीय नाही ही नमूद करण्यासारखी गोष्ट आहे. असं असताना डॉक्टरमंडळीच हेळसांड करतात हा आरोप चुकीचा आहे. कुणी डोळे द्यायची इच्छा व्यक्त केली तर ती पुरी करण्यासाठी ससून हॉस्पिटलमध्ये सुसज्ज यंत्रणा तयार आहे याची नोंद त्या सदस्यमहाशयांनी घ्यावी.

दुसऱ्या एका सदस्यानेही अशीच चमत्कारिक माहिती पुरवली. त्यांचं म्हणणं असं की, कुणीही उठसूठ नेत्रदान करण्यात अर्थ नाही. काही शारीरिक व्याधी असल्या तर डोळे नेत्रदानासाठी कुचकामी ठरतात. ही माहितीही अशीच चुकीची आहे. शारीरिक व्याधींचा आणि डोळ्यांचा काही संबंध नाही. इतकंच नव्हे तर चष्मा, अगदी सोडावॉटर ग्लासच्या काचेचा चष्मा असलेली व्यक्तीही नेत्रदान करू शकते.

या चर्चेच्या वेळी एका सदस्याने गुगली टाकला. ते म्हणाले की, सर्व नगरसेवक नेत्रदान करू इच्छितात असा ठराव आपण संमत करतोय, पण आता सभागृहात अनुपस्थित असलेल्या नगरसेवकांचं काय? त्यांची इच्छा गृहीत धरायची का?

अशी उलटसुलट चर्चा होऊन अखेर ठराव संमत झाला. सर्व नगरसेवकांनी नेत्रदान करण्याची इच्छा व्यक्त केली हे चांगलंच झालं. पण चर्चा ज्या स्वरूपात झाली ती पाहता एक चांगला पायंडा पाडण्याची संधी नगरसेवकांनी गमावली असंच म्हणावं लागेल.

—एम्. एम्.

नव्या शोषणमुक्त अन्नशासनाच्या दिशेने

# ग्राहक पंचायतीचा पवन-मावळातील अभिनव उपक्रम !

रविकिरण साने

पुण्यापासून अवघ्या ५० कि. मी. अंतरावरील काले वसाहत. मुंबई पुणे हमरस्त्याजवळ पवना धरणाच्या बांधकामाच्या निमित्ताने वसलेली. वस्ती अगदीच लहान. धरणावर काम करणारे कर्मचारी व्यापारी आणि काही मूळचे गावकरी शेतकरी. आम्ही गावात पोहोचलो तर ११ वाजून गेलेले. कार्यक्रमाच्या ठिकाणी तर गावकऱ्यांनी जंगी तयारी केलेली दिसत होती. पवना कृषक सेवा सहकारी संस्थेच्या इमारतीसमोरच्या पटांगणात गावकऱ्यांनी गर्दी केली होती. ग्राहक पंचायतीचा गरूडचिन्हांकित फलक लावण्यात आला होता. एक मोठा काटाही लावण्यात आला होता. १२ वाजून गेले तरी आजूबाजूच्या गावातून बैलगाड्या जुंपून तांदूळाची पोती घेऊन येणाऱ्या शेतकऱ्यांची रीघ चालूच होती. एक नवा उपक्रम घडतो आहे याची जाणीव सर्वत्र दिसत होती. या उपक्रमाच्या सर्वबाजूंची माहिती करून घ्यायला ते उत्सुक झाले होते. उत्साह ओसंडून चालला होता.

मी हे सर्व बाजूला उभा राहून पाहतो आहे. एक जागरूक पत्रकार या नात्याने. गावकऱ्यांचा हा उत्साह विलक्षण आहे. खरं तर आज लेव्ही-दिन नाही. सरकारी अधिकारी, वसुलीचे कारभारी शिवाय गाड्या काही काही दिसत नाही. पण आजवर नाडला जाणारा अर्धपोटी राहून आपल्या चतकोर अर्ध्या शेतात जीवापाड श्रमणारा शेतकरी वाजत गाजत तांदुळाची पोती घेऊन येतो आहे. कारण थेट तांदूळ खरेदीच्या उपक्रमाचे आज उद्घाटन आहे. जमीन कसणाऱ्या या भूमिपुत्रांची शहरातल्या ग्राहकांशी आज गाठ पडणार आहे.

### थेट उत्पादकांकडून ग्राहकाकडे !

एक अफलातून कल्पना. सध्याच्या आर्थिक व्यवस्थेलाच आव्हान देणारी. या कल्पनेने गेले वर्षभर पुण्यामुंबईत खळबळ उडवून दिली आहे. मोठमोठे अर्थशास्त्रज्ञही या कल्पनेने मोहून गेले. तर मग पवनाकाठच्या शेतकऱ्यात त्याने उत्साह संचारला नाही तरच नवल. मी भारल्यासारखा तो उत्साह अनिमिष नेत्रांनी निरखतो आहे. सभा सुरू झाल्याचे जाणवते. कान टवकारतो.

त्या शेतकऱ्यांच्या मेळाव्यासमोर एक टेबल आणि खुर्च्या टाकलेल्या दिसत आहेत. अध्यक्षस्थानी पवनाकृषकचे अध्यक्ष श्री. दगडू मारुती कालेकर आहेत. शेजारी ग्राहक पंचायतीचे अध्यक्ष श्री. बिंदू माधव जोशी, सचिवद्वय सूर्यकांत पाठक आणि सुहास काणे. पवनाकृषकचे कार्यकारी संचालक श्री. दिलीप जोशी अशी मंडळी बसली आहेत. पवना कृषकच्या माध्यमातून या शेतकऱ्यांना नव्या जीवनाचे दर्शन घडवणाऱ्या दिलीप जोशींचे भाषण सर्वजण मनोभावे ऐकत आहेत. ते म्हणतायत, 'कृषक सेवा सहकारी संस्थांमार्फत कर्जपुरवठा करून ग्रामीण कर्जबाजारीपणा कमी करणे आणि लहान व अतिलहान शेतकऱ्याला उत्पादनवाढीसाठी मदत करणे यासाठी महाराष्ट्र बँकेने आवश्यक ती पावले उचलली आहेत. बँकेने पतपुरवठा व्यवस्थापन दिलेल्या पवना कृषक सेवा सहकारी संस्थेने पंतप्रधानांच्या वीस कलमी कार्यक्रमाची मावळ तालुक्याच्या विकासात हातभार लावायच्या उद्देशाने अंमलबजावणी सुरू केली आहे. या प्रकारच्या सेवासंस्थांच्या निर्मितीसाठी महाराष्ट्र बँक सहकार खाते, जिल्हा परिषद आणि गरीब शेतकरी प्रथमच एकत्र आले आहेत. आणि आता अशा उपक्रमातून निर्माण झालेला तांदूळ घ्यावयास ग्राहक पंचायत पुढे आली आहे. मधल्या दलालांना वगळून उत्पादक आणि ग्राहक यांच्या थेट संबंधाचे नवे पर्व मावळ भागात सुरू होत आहे. त्याचे मी मनःपूर्वक स्वागत करतो आणि सर्वांनाच सहकार्याचे अश्वासन देतो.' टाळ्यांच्या गजरात भाषण संपते. मग या उपक्रमाचे नेमके स्वरूप स्पष्ट करायला उभे राहतात श्री. बिंदू माधव जोशी.

### उपेक्षित गटांना प्राधान्य

'शेतकरी बंधूनो ! आज आपल्या सर्वांना हा रोज अनुभव येतो की आजचा बाजार हा दलालांच्या अडत्यांच्या हातात गेलेला आहे. हे दलाल आणि व्यापारी जो सांगतील त्या भावात तुम्हाला तुमचा माल विकावा लागतो. आणि आम्हा शहरवासीयांना ते मागतील तो भाव देऊन माल घ्यावा लागतो. अशा पद्धतीने हे दलाल अडणीवर बसून तुमचा रुपयाचा माल आम्हाला चार रुपयाला विकतात आणि दोघांचीही पिळवणूक करतात. एकीकडे स्वतः उत्पादक असून शेतकऱ्याला अर्धपोटी रहायची वेळ येते तर तिकडे भरपूर किंमत मोजूनही भेसळीचा माल खावा लागल्याने ग्राहक टेकीला येतो याला उत्तर म्हणून पुण्या-मुंबईचे परिसरातले हजारो ग्राहक आता संघटीत झाले आहेत. आणि ग्राहक म्हणून थेट तुमच्याकडे खरेदीसाठी आम्ही आलो आहोत.

वस्तू विनिमयात ग्राहक उत्पादकांचा थेट संबंध आला पाहिजे आणि मधील दलालांचे वर्चस्व कमी झाले पाहिजे असा जाणीवपूर्वक प्रयत्न आमच्या ग्राहक पंचायतीमार्फत आम्ही गेली दोन वर्ष करत आहोत. 'थेट संबंधाचा हा सिद्धांत प्रत्यक्षात उतरविण्यासाठी पंचायतीने छोटे छोटे उपक्रम दोन वर्षात केले आहेत. हे उपक्रम करत असताना समाजामधल्या हरिजन, गिरीजन आदीवासी दुष्काळात वर्षानुवर्षे नाडलेले शेतकरी, लहान व अतिलहान शेतकरी अशा उपेक्षित

गटांना प्राधान्य दिले आहे. ग्राहकांना केवळ उत्तम माल मिळाला पाहिजे असे नव्हे तर त्याबरोबर असे उपेक्षित सामाजिक गट उत्क्रांत होण्यास हातभार लागला पाहिजे. असा पंचायतीचा आग्रहाचा विचार आहे. त्यातूनच आम्ही गेल्यावर्षी ठाणे जिल्हातील आदीवासी बांधवांचा तांदूळ पुणेकरांना दिला. सांगली जवळच्या म्हैसाळ गावातील हरिजन बांधवांची उत्तम प्रतीची द्राक्षेही पुण्या-मुंबईत आम्ही विकली. त्यावेळी आलेला अनुभव फार बोलका आहे. आज बाजारात दलाल, आडते हे व्यावसायिक शेतकऱ्यांच्या मालाला भाव पाडून देतात मात्र विक्री करताना ग्राहकांना तोच माल चढ्या भावाने विकला जातो. द्राक्षांचे असेच होत असे. शेतकऱ्यांना साडेतीन रुपये किलो असा भाव देऊन प्रत्यक्षात ही द्राक्षे पुण्या-मुंबईत ७ रु. किलोने विकली जात. ग्राहक पंचायतीने गेल्या वर्षी म्हैसाळच्या हरीजन बंधूना १ किलो द्राक्षाला साडेचार रुपये भाव दिला व ग्राहकांना ती पाच रु. दराने विकली.

ग्राहक-उत्पादकांचे थेट संबंध आले पाहिजेत, असे म्हणून केवळ भागणार नाही. कारण त्यात फार मोठ्या अडचणी आहेत. आम्ही तांदूळ खरेदी करणार म्हटल्यावर तुमच्यावरही कसा दबाव आला हे आम्हाला माहीत आहे. असाच एक बोलका अनुभव आम्हाला आला.

## नवे अन्नशासन उभारू

पुण्याजवळील काही खेड्यामधून हिरवा मूग थेट खरेदी करण्याचा प्रयत्न ग्राहक पंचायतीच्या तरुण कार्यकर्त्यांनी केला. दर सोमवारी आठवड्याच्या बाजाराच्या वेळी सकाळी जाऊन शेतकऱ्यांच्या मुगाची पोती बाजारात जाण्यापूर्वी त्यांना जादा भाव देऊन कार्यकर्त्यांनी खरेदी केली. शेतकरी मंडळीही खूष झाली. मूगाचा पुरवठा अशाप्रकारे उत्तम चालेल असे वाटले होते पण त्याच्या पुढच्या सोमवारी वेगळाच अनुभव आला. भाव जास्त देऊनदेखील ते शेतकरी पंचायतीला मूग न घालता बाजारात व्यापाऱ्याला घालू लागले. असे का घडले ? याची जेव्हा चौकशी केली तेव्हा कळले की, बाजारातील दलाल, व्यापाऱ्यांनी खेड्यापाड्यावर हिंडून शेतकऱ्यावर जे दडपण आणले ते झुगारून देण्याची ताकद आज त्या गरीब शेतकऱ्यांची नाही. शेवटी दलालाच्या दडपणामुळे हा मूग खरेदीचा उपक्रम थांबवावा लागला. तो शेतकरी असंघटीत, विखुरलेला होता. तुम्ही आज सेवा संस्थेच्या झेंड्याखाली एकत्र आले आहात. महाराष्ट्र बँक तुमच्या पाठीशी आहे. तेव्हा तुमच्यावर येणाऱ्या दडपणांना तुम्हीच सडेतोड जबाब दिला पाहिजे.

आज जीवनावश्यक वस्तूविनिमयाचे एक वेगळेच अन्नशासन अस्तित्वात आहे. त्याचे अलिखित नियम आणि दरारा फार मोठा आहे. गरीब शेतकऱ्यांवरील याचा वचक कमी करावयाचा असेल आणि थेट संबंधांचा सिद्धांत प्रस्थापित करावयाचा असेल तर शेतकरी व ग्राहकांची पिळवणूक करणारे सध्याचे दलालांचे अन्नशासन आपण तोडून काढले पाहिजे. त्याऐवजी ग्राहक-उत्पादकांचे एक नवे अन्नशासन आपणाला या देशात निर्माण करावयाचे आहे.' बिंदुमाधवांचे भाषण संपले आणि कितीतरी वेळ टाळ्यांचा कडकडाट होत राहिला. आपल्या तांदूळ विक्रीच्या या छोट्याशा कृतीत भारतीय अर्थव्यवस्थेच्या पुनर्घटनेचा एक क्रांतिकारी विचार दडला आहे याचे विलक्षण दर्शन त्यांना होत होते. आणि या क्रांतीकार्याला आपलाही सक्रीय सहभाग आहे या विचाराने तर सर्वजण मोहरून गेले होते.

एका फार मोठ्या कार्याची सुरुवात आपल्या हस्ते होते आहे, या विचाराने सभेचे अध्यक्ष कालेकर तर भारावून गेले. ते उठून उभे राहिले आणि बिंदूमाधवांचा हात कृतज्ञतेने हातात धरला. पवना कृषक आणि शेतकरी यांच्यावतीने कृतज्ञता व्यक्त करताना ते म्हणाले, 'दलाल–व्यापारी यांचेकडून आपण नाडले जातो हे आम्हाला कळत असते. पण वर्षभर जीवनावश्यक वस्तूंसाठी याच व्यापाऱ्यांवर आम्हाला अवलंबून रहावे लागते. त्यामुळे हे व्यापारी दोन्हीकडून आम्हाला नाडतात. पण ग्राहक पंचायतीसारखी संस्था जर आम्हाला जीवनावश्यक वस्तू पुरवीत असेल तर आम्ही त्याचे स्वागत करू. म्हणजे मधले दलाल जाऊन तुमचा आमचा थेट संबंध दोन्ही दृष्टीने प्रस्थापित होईल.'

'जीवनावश्यक वस्तूंचा पुरवठा करण्याचा प्रयत्न ग्राहक पंचायत करेल' असे आश्वासन पंचायतीचे सचीव सूर्यकांत पाठक यांनी दिले. आजच्या उपक्रमाला पुरवठा मंत्री ना. रत्नाप्पा कुंभार येणार होते. परंतु मराठवाड्यातील कार्यक्रमामुळे आपल्याला येता येत नाही. पण या अभिनव उपक्रमाला आपला पूर्ण पाठिंबा असल्याचे त्यांचे पत्र सूर्यकांत पाठक यांनी वाचून दाखवले.

मेळावा संपला. पवना कृषकचे अध्यक्ष दगडू मारुती कालेकर यांनी वजनकाट्याची पूजा केली. नारळ फुटला. गुलाल उधळला गेला. आणि पवना कृषक सेवा संस्था व ग्राहक पंचायत यांच्या जयजयकाराने वातावरण दुमदुमून गेले. ग्राहक उत्पादकांच्या या एकीच्या आवाजाने दलालांचे धाबे दणाणले. याचे प्रत्यंतर थोड्या वेळाने आलेच. पूजा होताच कालेकर पाटलांची मुहूर्ताची शकुनाची पोती काट्यावर चढली आणि तांदूळ खरेदी सुरू झाली. वजनकाटा, मालाची वर्गवारी, भावाची निश्चिती आणि ताबडतोब रोख रकमेने त्यांची किंमत अशा पद्धतीने काम सुरू झाले. मी त्या धावपळीतून बाजूला होऊन या उपक्रमातल्या एकेका व्यक्तीला गाठायला सुरुवात केली.

## ग्रामविकासात ग्राहकांचे योगदान

प्रथम भेट घेतली बिंदूमाधव जोशी यांची. पुण्याच्या युवक चळवळीचा एक अध्वर्यू, युवक महामंडळाचा कार्याध्यक्ष, पुण्यात अनेक आंदोलने छेडणारा हा तरुण आता ग्राहकांची मजबूत चळवळ बांधून नव्या नव्या कल्पना प्रत्यक्षात आणतो आहे. या सर्वांची पार्श्वभूमी काय ? ग्राहक उत्पादक ऐक्याचा हा सिद्धांत स्फुरला कोठून हे सारे मला ऐकायचे होते. श्री. बिंदूमाधव म्हणाले, 'मी गेली अनेक वर्षे एक सामाजिक कार्यकर्ता म्हणून खेड्यात काम करतो आहे. धुळ्याच्या आदिवासी भागात दोन वर्षं होतो. गेल्या दुष्काळापासून शिरूरच्या शापित भूमीत कामाला प्रारंभ केला. शिरूरचे नेते श्री. बाबूराव दौंडकर यांचेबरोबर फिरत असताना पोटातल्या भूकेचे ब्रह्मांड दर्शन आम्हाला झाले. सरकारी व अन्य पातळीवर कामे चालू होती पण आमच्यापुढे वेगळेच प्रश्न उत्पन्न होत होते. नुसत्या श्रमदानाने रस्ते उठतील, धरणे बनतील, बांध पडतील. पण माणसे कधी उठणार, परंपरागत अंधश्रद्धातून जागी कधी होणार? समाजातील

दुष्ट नीतीबंध व चालीरीती कशा तुटणार ? दलाल, अडते, व्यापारी यांच्या मगरमिठीतून शेतकरी कधी मुक्त होणार ? असे मनं पिळवटून टाकणारे अनेक प्रश्न, या वेदना आम्हाला व्याकूळ करीत; पण ज्या करुणेचे रूपांतर कृतीत होत नाही ती वांझ ठरते. आणि असल्या वांझोट्या वादांचा आम्हाला तिटकारा आहे. यातूनच एक नवी कल्पना पुढे आली–धान्यपेढीची. पैशाच्या व्यवहाराला फाटा मारून केवळ धान्यविनिमयाचे पद्धतीवर आधारलेली ही कल्पना सर्वांना विलक्षण वाटली. या धान्यपेढीच्या उद्घाटनातच पुढच्या अनेक उपक्रमांचे बीज रोवले गेले. स्वयंप्रेरीत ग्रामविकासाची कामे करणाऱ्या महाराष्ट्रातील विविध संस्था एकत्र आणून या विस्कळीत कामांना एक चळवळीचे स्वरूप द्यावे म्हणून ग्रामायनसारखी संस्था यातूनच निर्माण झाली. शहरातून निर्माण झालेल्या अत्यंतिक टंचाईच्या काळात अनेकांनी तेल-तूपासाठी आंदोलने छेडली. पण अशी फुटकळ आंदोलने उपयोगी पडायची नाहीत हे लक्षात घेऊन युवक महामंडळाने ग्राहक चळवळ संघटीत केली आणि योग्य वेळ येताच युवक महामंडळाने ही चळवळ ग्राहक पंचायत या संस्थेकडे सोपवली. ग्रामायन आणि ग्राहक चळवळ या वेगवेगळ्या स्तरावर काम करणाऱ्या संस्थांचा उगम हा असा आहे. त्यामुळे ग्रामीण विकास आणि ग्राहक चळवळ यांचे संबंध नवे नाहीत. एका बाजूने ग्रामीण विकास घडत गेला पाहिजे. शेतकरी आपल्या श्रमाने समृद्ध झाला पाहिजे आणि त्याच्या मालाला योग्य भाव देऊन, ग्रामीण विकासासाठी अन्य सहाय्य देऊन ग्राहक चळवळ विकसीत झाली पाहिजे. छोटा उत्पादक आणि ग्राहक यांचा असा विकास नव्या अर्थव्यवस्थेला जन्म दिल्याशिवाय राहणार नाही. ग्राहक उत्पादक ऐक्याचा विचार आम्ही मांडला. त्या दिशेने प्रत्यक्ष कृतीची पावले आम्ही उचलतो आहोत.' शहरी झगमगाटातील तरुणांना ग्राहक आणि उपेक्षीत शेतकरी व ग्रामीण भाग यांचेकडे आकृष्ट करणारे बिंदुमाधवांचे विचार मला माननीय वाटले. त्यांच्या विचाराचे प्रत्यंतरही समोर मिळत होते. त्यांचेबरोबर आलेले सगळे सहकारी अगदी तरूण नवे उन्मेष जपणारे, नवी स्वप्ने फुलवणारे सगळे उत्तम पदवीधर वेगवेगळ्या व्यवसायांमध्ये हुद्यावर काम करणारे पण ग्राहक चळवळीची धुरा जिद्दीने खांद्यावर वाहणारे.

## पवना कृषकाचे कार्य

नंतर भेटला पवना कृषकचा कार्यकारी संचालक श्री. दिलीप जोशी. हा देखील असाच झपाटलेला तरूण. पवना कृषकचे काम करण्यापूर्वी ठाण्याच्या आदीवासी भागात मनोरजवळ काम करत होता. त्यामुळे भातशेतीच्या नव्या नव्या प्रयोगांची उत्तम माहिती असलेला पवना कृषकच्या कार्याची माहिती सांगताना तो म्हणाला, 'पुणे जिल्ह्यातील मावळ तालुका म्हणजे तांदुळाचे आगर आहे. वडगाव कामशेत भागात बहुतेक ठिकाणी भातशेती आहे. पवना धरणाच्या परिसरातील २४ गावांच्या पाहणीत असे आढळले की या गावांची लोकसंख्या सतरा हजार आहे. त्यात १७४० शेतकरी आहेत पण यातील पन्नास टक्क्यापेक्षा जास्त शेतकरी लहान व अतिल्हान आहेत. त्यांची आर्थिकस्थिती इतकी दयनीय आहे की पवनेचे पाणी उपलब्ध असता भांडवलाअभावी ते पाणी ते वापरू शकत नाहीत. ब्रह्मणोली गावातील काही हरीजन शेतकरी त्यांच्या घरात पुरेसे धान्य शिल्लक नसल्याने केवळ दुधी भोपळा शिजवून तो मीठ घालून खावून भातशेतीत काम करत आहेत.

अशा या अतिलहान शेतकरी, शेतमजुरांना एकत्र करून ७५ साली पवना कृषक सेवा सहकारी संस्था उभी करण्यात आली. महाराष्ट्र बँकेने वित्त पुरवठा व व्यवस्थापनाची जबाबदारी घेतली. आजपर्यंत संस्थामार्फत ३ लाख रुपयांची विविध कर्जे या शेतकऱ्यांना देण्यात आली आहेत. शेतकऱ्याला एका जागेवरच सर्व सेवा उपलब्ध व्हाव्यात असा प्रयत्न आहे. शेतकऱ्यांना उत्तम बी बीयाणे, खते, औषधे वेळेवर पुरवली जातात व आवश्यक ते मार्गदर्शनही केले जाते. त्याबरोबर फवारणी यंत्रे, प्रेशर, वजनकाटा इत्यादी सेवाही उपलब्ध केल्या आहेत.' आमचे हे बोलणे चालू असतानाच एक प्रसंग घडला.

काही दलाल आणि व्यापारी मंडळी जमलेल्या शेतकऱ्यांना फितवण्याचा प्रयत्न करत होती. पंचायतीपेक्षा अधिक दराची लालूच दाखवत होती. काही व्यापारी आपल्या तांदूळाचा नमुनाही घेऊन आले होते. बाहेर काही वेळ वातावरणात थोडी अस्वस्थता निर्माण झाली पण लगेच गावकऱ्यांनी निश्चयाने या दललांना पिटाळून लावले आणि खरेदी पुन्हा रांगेला लागली.

## भूमिपुत्राचा खरा आनंद

ब्राह्मणोली गावचे पवना कृषकाचे एक संचालक गोविंदा लक्ष्मण काळेना मी गाठले. गडी भलताच खुषीत होता. मी विचारताच बोलू लागला. 'साहेब हे दलाल आमची पिळवणूक करतात हे खरे आहे. तुमच्या पंचायतीने आम्हाला चांगला भाव दिला म्हणून आता यांची पोटं दुखायला लागली. पण आम्ही अर्धपोटी राहात होतो त्याचे काय ? साहेब, मी आज आठ पोती तांदूळ घातला. आठवडाभरापासून मी या व्यापाऱ्यांकडे खेटे घालतोय तर यांनी त्याचा भाव करावा १९०रु. क्वीटल, नं. २ चा सुंदर आंबेमोहर तांदूळ पण यांचा भाव इतका खालचा. आज पंचायतीने मला याच तांदूळाला २७० रु. भाव दिला. मग का शेतकरी उड्या मारणार नाही. तुम्हा लोकांना हजाराच्या आकड्याचे काही वाटत नाही. पण आमच्या शेतकऱ्याचा वर्षाचा व्यवहार असतो २१४ हजाराचा. त्यात त्याला हजार पाचशे रुपये जास्त मिळाले तर त्याच्या वर्षाची जिंदगी होते. काय पाटीलसाहेब खरयना ? मी पाटलांकडे पाहिले. कालेकर पाटलांनी मान हलवत तोंड मोकळ केलं. डोक्याचे पागोटे काढून मांडीवर घेत ते बोलू लागले, 'गेल्या खेपेचीच गोष्ट सांगतो, आम्ही गहू पायलट योजना राबवली. कल्याण सोना उत्तम गहू लावला, संस्थेचे उद्दिष्ट होते ३७५ एकराचे पण आम्ही आघाडी मारली ४। शे एकराला गहू पिकला. बी बीयाणे खते, औषधे मिळून सुमारे ३ लाख रुपये संस्थेने गुंतवले; गव्हाचे पीक चांगले आले. आम्ही सगळे खूष होतो पण येथल्या दलाल व्यापाऱ्यानी शेतकऱ्यांचा गहू भाव पाहून घेतला. बाहेर बाजार १७० ने चालू होता, पण या व्यापाऱ्यांनी १३० वर आम्हाला गटवले. त्यामुळे शेतकऱ्यांची ७० टक्के कर्ज फिटले पण ३० टक्के तसेच राहिले. पुन्हा आम्ही भुकेकंगालच व्हायचे पण यावेळी या गव्हामुळे कानशेतचा सातू खाऊन राहण्याऐवजी पहिल्यांदा आम्हाला घरचा गहू खायला मिळाला. पण तेव्हाच ठरवले इथल्या दलालाकडे पीक घालायचे नाही. त्यातूनच आमच्या जोशीसाहेबांनी तुमच्या ग्राहक पंचायतीशी संपर्क साधला.'

सगळाच अनुभव मला नवा वाटत होता. विचारांना चालना देणारी, अंतर्मुख बनवणारा, ग्राहक उत्पदकांचे नवे अन्नशासन अस्तित्वात येईल का ? थेट संबंधाचा विचार मला अतिशय महत्त्वाचा वाटतो. आपल्या देशात राजकीय सांस्कृतिक, सामाजिक, धार्मिक सर्वच क्षेत्रात दलालांचा बुजबुजाट वाढला आहे त्यातून एक भक्ष शोषित समाजाची निर्मिती होते आहे. त्या सर्वांवरच थेट संबंधीचा हा सिद्धांत जालीम उपाय ठरावा. अशा उपक्रमांची व्याप्ती जसजशी वाढत जाईल तसतसे दलालांचे धागे तुटत जातील व शोषणमुक्त अन्नशासनाची उभारणी सुकर होऊ शकेल. □

# बेकार तरूण

## जगापुढील चिंतेचा विषय

वा. दा. रानडे

तरुणांच्या बेकारीचा प्रश्न अविकसित आणि विकसनशील देशातच नव्हे तर अमेरिका आणि पश्चिम युरोपातील विकसित देशात-सुद्धा चिंतेचा विषय झाला आहे. अमेरिके-तील शहरांतून बेकार तरुणांची संख्या वाढल्याने खून, आत्महत्त्या, वेश्याव्यवसाय वगैरे स्वरूपाच्या गुन्ह्यांत वाढ झाली असून मादक पेये किंवा गोळ्या घेणारांचेही प्रमाण वाढले आहे. पश्चिम युरोपातील अनेक देशातही अमेरिकेसारखीच परिस्थिती निर्माण होईल असा एका पाहणीचा निष्कर्ष आहे.

अमेरिकेत- ज्या कारणांमुळे तरुणांमध्ये बेकारी आढळते तीच कारणे पश्चिम युरोपातही दिसून येत आहेत. या बेकारांमध्ये शालेय शिक्षण अपुरेच सोडलेली, समाजाच्या खालच्या थरातली मुले, अपुरे व्यावसायिक शिक्षण मिळालेले तरुण किंवा ज्यांच्या शिक्षणाचा नोकऱ्या देणाऱ्या कारखान्यांच्या गरजांचे दृष्टीने उपयोग नाही. असे तरूण असतात. प्रगत देशात सुद्धा समाजातील सर्वच थर प्रगत नसतात. खालच्या थरातील मुलांना शालेय शिक्षणसुद्धा पूर्ण घेता येत नाही असे यावरून दिसते. व्यावसायिक शिक्षणाच्या अपुऱ्या सोयी आणि शिक्षणाची उद्योगधंद्यांच्या गरजांशी सांगड नाही हे आपल्या शिक्षण पद्धतीतील दोष काही प्रमाणात प्रगत पाश्चात्य राष्ट्रांतही आढळून येत आहेत.

पश्चिम युरोपात आर्थिक विकासाचा वेग मंदावला आहे. कामगारवर्गात दरवर्षी जी नवी भर पडत आहे. त्यांना पुरेशी कामे देण्याचे दृष्टीने विकासाचा वेग कमी पडत आहे. सामूहिक बाजारपेठेच्या नऊ राष्ट्रात रोजगार शोधणाऱ्या पंचवीस वर्षांखालच्या तरुणांची संख्या १९७३ पासून गेल्या तीन वर्षांत दुपटीने वाढली आहे. पन्नास लाख बेकारांपैकी दर तिघांमागे एक पंचविशीच्या आतला तरूण आहे. दीर्घकाळ काम न मिळालेल्या तरुणांची संख्याही वाढत आहे.

शिक्षण संपून नोकरी किंवा रोजगाराचे वय सुरू होण्याच्या काळात सुरवातीलाच काम मिळाले नाही तर कामाचा अनुभव मिळत नाही आणि असे तरूण दीर्घकाळ बेकार राहिले तर केवळ बेकार होतात एवढेच नव्हे तर काम देण्यालाच अपात्र होण्याचा संभव असतो. याकडे ब्रिटीश मॅनपॉवर कमिशनचे अध्यक्ष रिचर्ड ओब्रायन यांनी लक्ष वेधले आहे. आपल्याकडे भिकाऱ्यांच्या बाबतीत हा अनुभव आलेलाच आहे. मुंबईतून भिकाऱ्यांची हकालपट्टी करून त्यांना दुसरीकडे काम देण्याचे प्रयत्न झाले. पण आळशी जीवनाला चटावलेल्या भिकाऱ्यांना काम करण्याची सवयच नसल्याने कोणतेही काम ते करू शकत नाहीत असा अनुभव आला. दिलेल्या कामावरून पळून ते पुन: मुंबईत आले. येथे बेकार तरुणांची तुलना भिकाऱ्यांशी करावयाची नाही. भिकाऱ्यांना कामच नको असते. बेकार तरुणांना काम हवे असून मिळत नाही पण दीर्घकाळ काम मिळाले नाही तर बेकार मन गुन्हेगारीकडे वळू लागते.

तरुणांच्या बेकारीचा प्रश्न अधिक बिकट होण्याची आणखी दोन कारणें म्हणजे मालक आणि कामगार संघटनांचे नेते- दोघांचेही धोरण त्यांना रोजगार मिळवून देण्यास पोषक नाही. एकदा कामावर घेतलेल्या कामगारास काढून टाकणे कठीण व खर्चाचे असते असा मालकांचा अनुभव असल्याने नवीन कामगारांची भरती करण्यास ते सर्वसाधारणपणे तयार नसतात. नव्याने नोकरी शोधणाऱ्या तरुणापेक्षा आपल्या संघाचे सभासद असलेल्या कामगारांचे हक्क व हितसंबंध जपणे, त्यांची नोकरी सुरक्षित कशी राहील याकडे लक्ष देणे हेच त्यांचे मुख्य कर्तव्य होऊन बसते.

बेकार तरुणांना काम मिळवून देण्याचा प्रयत्न करणे आणि त्यांना गुन्हेगारीच्या मार्गापासून परावृत्त करणे या उद्देशाने पश्चिम जर्मनीत हॅम्बुर्ग येथे रेव्हरंड कॉर्नेर जेस्कोनोव्हस्की या धर्मोपदेशकाने चर्चमध्ये एक पुनर्वसन केंद्र चालविले आहे. तेथे आठवड्यातून दोनदा असे तरूण जमतात, जेस्कोनोव्हस्की गेली सात वर्षे या केंद्रात कार्य करीत आहेत. तरुणांची बेकारी मोठ्या प्रमाणावर वाढली तर आपणांस फार मोठ्या धोकादायक परिस्थितीस तोंड द्यावे लागेल' असा इशारा त्यांनी दिला आहे.

पश्चिम जर्मनी आणि फ्रान्समधील बेकार तरुणांच्या हालचाली पाहिल्या म्हणजे हा इशारा चुकीचा म्हणता येणार नाही. पश्चिम जर्मनीतील दोन तरुणासंबंधीची एक बातमी या दृष्टीने सूचक आहे. हे तरूण-आपल्या जाकिटावर स्वस्तिक व नाझी पदके अभिमानाने लावतात. हिटलरने रोजगार परिस्थिती सुधारली म्हणून ते त्याची स्तुती करतात. पॅरिसच्या रस्त्यावरील बेकार तरुणांची निदर्शनेही संभाव्य स्फोटक परिस्थिती-बद्दल इशारा देणारी आहेत. तरुणांमधील वाढत्या बेकारीबद्दल निषेध प्रदर्शित करण्यासाठी गेल्या काही महिन्यात तरुणांनी दोनदा मोर्चे काढले. या निदर्शकांच्या आघाडीस विशीच्या आतली मुले होती, ती घोषणा देत होती :

'क्रांती हाच आता एकमेव उपाय आहे.'

या निदर्शकांच्या व पोलिसांच्या चकमकी झाल्याच्या बातम्या अजून आल्या नसल्या तरी उद्या त्या होणार नाहीत असे म्हणता येणार नाही. ही निदर्शने १९६८ मधील कामगार व विद्यार्थी यांच्या बंडाची आठवण करून देत आहेत.

वरिष्ठ पातळीवरील अधिकाऱ्यांनाही या परिस्थितीची जाणीव झाली आहे. आर्थिक परिस्थितीचे निराशाजनक चित्र रंगवून एक फ्रेंच बँक अधिकारी म्हणाला, 'बेकारीने आमच्या लोकशाही संस्थेच्या पायालाच हादरा बसण्याचा धोका आहे.'

बहुतेक औद्योगिक देशात बेकारीने युद्धोत्तर काळातील उच्चांक गाठला आहे. अमेरिकेत तिचे प्रमाण सर्वांत जास्त आहे. एकूण कामगारांपैकी आठ टक्के म्हणजे बारा कामगारांमागे एक तेथे बेकार आहे. कानडा ७ टक्के, इंग्लंड ६.५ ऑस्टेलिया ५, फ्रान्स ४, इटली आणि पश्चिम जर्मनी ६.७५ जपान २ टक्के अशी इतर प्रमुख प्रगत देशाची टक्केवारी आहे. या बहुतेक देशांनी युद्धोत्तर काळातील बेकारीचा उच्चांक गाठला आहे. १९३० मधील जागतिक मंदीनंतर एवढी

बिकट परिस्थिती प्रथमच उद्भवली आहे.

मंदी आणि बेकारी ही भांडवलशाही अर्थव्यवस्थेत मधून मधून उपस्थित होणारी अटळ अरिष्टे आहेत. आणि अर्थव्यवस्था बदलल्याशिवाय ती दूर होत नाहीत. केवळ समाजवाद्यांनी निवडणुका जिंकून सरकार स्थापल्याने आणि काही उद्योगधंद्यांचे राष्ट्रीयीकरण केल्याने तेथे समाजवाद येत नाही. ब्रिटनचे उदाहरण याबाबतीत बोलके आहे. मजूर सरकार तेथे अनेकवेळा अधिकारावर येऊनही बेकारीचा प्रश्न ते यशस्वीपणे सोडवू शकलेले नाही. ब्रिटनमध्ये आज बेकारांची संख्या १४ लाख म्हणजे युद्धोत्तरकाळात सर्वात जास्त आहे. या वर्षी ती आणखी वाढेल असा अंदाज आहे.

प्रत्येकाला काम मिळणे हा मूलभूत हक्क मानला गेला पाहिजे आणि काम पुरविणे हे सरकारचे मूलभूत कर्तव्य मानायला हवे. घटनेतच या हक्काचा आणि कर्तव्याचा समावेश हवा. आपल्या घटनादुरुस्तीवरील चर्चेचे वेळी काही डाव्या पक्षांनी ही मागणी केली होती. पण सरकारने ती मान्य केली नाही. वास्तविक समाजवादाचे उद्दिष्ट घटनेत मान्य केल्यानंतर प्रत्येकाला काम मिळण्याचा हक्क हा मूलभूत हक्क म्हणून तत्वतः तरी मान्य करायला हवा होता, आजच हे उद्दिष्ट गाठणे शक्य नाही पण टप्प्या–टप्प्यांनी निश्चित मुदतीत ते गाठले जाईल असे आश्वासन सरकारने द्यायला हवे होते. बेकारीचा 'बेकारी हटाव' कार्यक्रमाला अग्रक्रम द्यायला हवा होता पण सदोष नियोजनामुळे बेकारीचा प्रश्न सरकार यशस्वीपणे सोडवू शकलेले नाही. उद्योगविनिमय केंद्रांकडे नोकरीसाठी नावे नोंदविलेल्या पण नोकरी न मिळालेल्या बेकारांची संख्या दरवर्षी वाढत आहे. १९७० साली ती ४०·६९ लाख होती, ती दरवर्षी वाढत वाढत १९७५ मध्ये ९३·१५ लाखावर गेली. १९७६ चे आकडे अजून उपलब्ध नाहीत.

कम्युनिस्ट राष्ट्रांमध्ये काही पाश्चात्य राष्ट्रांचे तुलनेने रहाणीचे मान कमी असेल पण बेकारीचा प्रश्न सोडविण्यात त्यांनी निश्चित यश मिळविले आहे.

□

# सोलकढी

## □ भविष्यविश्वासू अनंतराव

माझा भविष्यावर विश्वास आहे. काही नजराळू माणसांना ते दिसते, अगदी तळहाती डोलणाऱ्या आवळ्याइतके दिसते, असे मी मानतो. त्यामुळे माझ्या भविष्यात काय (आणि काय काय) लिहिले आहे, ते त्या नजराळूंच्या नजरेने मी वाचले आहे. पण प्रिय वाचकांसुद्धा कोणालाही ते सांगायचे नाही, असे वचन मी त्यांना देऊन बसलो आहे. एक गोष्ट मात्र सांगायला हरकत नाही : माझ्या भविष्यात इतके वैविध्यपूर्ण वैचित्र्य किंवा वैचित्र्यपूर्ण वैविध्य आहे की, तेवढे नरहर कुरुंदकरांच्या व्यासंगविषयातदेखील नसेल !

माझे भविष्य अचूक वर्तवताना या नजराळूलोकांनी किती वेगवेगळ्या साधनांचा उपयोग केला होता : कोणी माझी जन्मलग्नकुंडली पाहिली होती; कोणी डावा–उजवा हात पाहिला होता; कोणी चेहराच पाहिला होता; कोणी लहानपणापासूनच्या छायाचित्रांचा संच पाहिला होता; कोणी मराठी-इंग्रजी हस्ताक्षर पाहिले होते; कोणी शाळासमाप्तीचा दाखला पाहिला होता; एकाने तर बँकबुक तेवढेच पाहिले होते. कोणी गणित केले होते; कोणी प्लँचेट केले होते; कोणी मोहिनीविद्येचा प्रयोग केला होता; कोणी सरधोपट अंदाज केला होता.

भविष्यावर माझा विश्वास असल्यामुळे आजूबाजूची विज्ञाननिष्ठ मंडळी माझी फार टरटिंगल करतात. साधुमहाराजांचे चमत्कार हे त्यांना हातचलाखीचे खेळ वाटतात. आकाशातले ग्रह म्हणजे नुसते यानतळ वाटतात. भुतेखेते, पऱ्या, उडत्या तबकड्या या कविकल्पना वाटतात. मला तसे वाटत नाही. जवळच्या काही लोकांना मी आपल्य मताने आपलेसे केले आहे. त्यामुळे तर विज्ञाननिष्ठांचा संताप झाला आहे. येथे एकाचे असे अनेक अनंतराव नित्य होत असल्यामुळे आपण पाश्चात्य राष्ट्रांप्रमाणे प्रगती करू शकलो नाही; पाश्चात्य राष्ट्रात भविष्यविश्वासू अनंतरावही नाहीत आणि भविष्यसांगे बाबारावही नाहीत; आपल्याकडे अशी स्थिती येईल तो सुदिन, असा त्यांचा तळतळाट चाललेला असतो.

पाश्चात्य राष्ट्रात भविष्याची ग्रहदशा इतकी फिरली असेल, हे मला खरे वाटेना. त्याबद्दलच्या खात्रीलायक माहितीसाठी ब्रिटनमधले माझे स्नेही मि. हॅरॉल्ड विल्सन यांना पत्र लिहून मी चौकशी केली. पंतप्रधानपद सोडल्यापासून विल्सन तसे मोकळे असतात : वाचतात; लिहितात; भाषणे देतात; पाईप ओढतात. त्यांचे उत्तर लगोलग आले. त्यातल्या अवांतर गप्पागजाली टाळून, भविष्याबद्दल त्यांनी मुद्दाम लिहिलेली एक हकीगत तेवढी सांगीन म्हणतो. कातिना थिओदोस्यू नावाची एक ब्रिटिश भविष्यवेत्ती आहे. भविष्य सांगणे हा तिचा धंदा आहे. ब्रिटनसारख्या प्रगत राष्ट्रात तिचा हा धंदा भरभराटीला आला आहे. वर्तमानपत्रातून लक्षावधी सामान्य वाचकांना जशी ती दररोज त्यांचे भविष्य जाहीरपणे सांगते तशी अनेक धनिकवणिकबाळांना ती खासगीत भविष्यांच्या आधारे, वेळोवेळी वित्तविषयक सल्ला देते. या सल्ल्याबद्दल तिला बदाबदा पैसे मिळतात. तिच्या भविष्यामुळे लहानमोठ्या उद्योगधंद्यामध्ये आणि शेअरबाजारात उलथापालथ होते. त्या पातळीवरच्या अर्थकारणात कातिनाला महत्त्वाचे स्थान प्राप्त झाले आहे. आता बोला.

ही हकीगत वाचल्यावर आमची विज्ञाननिष्ठ मित्रमंडळी काय म्हणतील ते आर्किमिडीज जाणे. मी मात्र एवढेच म्हणतो की, आज आपल्या राष्ट्राला तारकेश्वरी सिन्हांपेक्षा कातिना थिओदोस्यूंची अधिक गरज आहे.

—अनंतराव



# अशी चौकशी, अशी फाशी !

**लेखांक नऊ । र. धों. घाणेकर**

## निक्सनचे व्हाईट हाऊस

**१९६०** साली राष्ट्रपतीपदाची निवडणूक होणार होती. डेमोक्रॅटिक पक्षातर्फे केनेडी व रिपब्लिकन पक्षातर्फे निक्सन उभे राहिले होते. ८ नोव्हेंबरला निवडणुका होत्या व त्याच्याअगोदर दोन्ही पक्षाकडून निवडणूक प्रचार चालला होता. २७ ऑक्टोबर १९६० ला आयसेनहॉवरला बातमीदारांनी प्रश्न विचारला :

' What qualities must the next President have ? '

आयसेनहॉवर म्हणाला,

' Character, ability, responsibility and experience. '

रिपब्लिकन पक्षाने उभा केलेला उमेदवार रीचर्ड निक्सन १९६० मध्ये राष्ट्रपतीपदाला योग्य नव्हता, १९६८ मध्येही नव्हता आणि १९७२ मध्ये तर मुळीच नव्हता.

आयसेनहॉवरनी आपल्या Waging Peace ह्या पुस्तकामध्ये ६३१ पानावर, राष्ट्रपतीने आपल्या भोवतालचे वर्तुळ कसे असावे ह्याविषयी लिहिताना खालील विचार प्रगट केलेले आहेत :

' To describe satisfactory staff organization for the Presidency in terms of my own experience, one or two obvious generalisations are pertinent : The Chief Executive must first select his principle assistant from among the atleast most dedicated and experienced men and women he can find. If the principle assistants to the executive are strong, understanding and dedicated individuals of integrity, they can make even a jerrybuilt organization functions atleast healthily. The idea of combination, of course, is to have capable personnel and a logical system. '

नोव्हेंबर १९६८ मध्ये निक्सन राष्ट्रपतीपदाच्या निवडणुकीत निवडून आला, आणि त्यानंतर आपल्या नव्या मंत्रिमंडळात कोण कोण व्यक्ती घ्यावयाच्या ह्याविषयी त्याची खलबते सुरू झाली. १९५२ साली तो उपराष्ट्रपती म्हणून निवडून आल्यानंतर त्याला हे माहीत होते की, आयसेनहॉवर नंतर आपणच राष्ट्रपती होणार, आणि म्हणून त्या दृष्टीने तो आपली पावले टाकीत होता. परराष्ट्रीय राजकारण लढविण्यात तो तरबेज झाला परंतु खुद्द घरचेच राजकारण त्याला बरोबर लढविता आले नाही. त्यात तो हरला. आणि हरण्याला खरे कारण म्हणजे त्याचा विश्वासघात करणारी भोवतालची प्रभावळ.

अनेक व्यक्तींची नावे, त्यांची कारकीर्द, त्यांची लायकी, त्यांची कर्तबगारी त्याच्या दृष्टीपुढून एखाद्या चलत्‌चित्रपटासारखी सरकत होती. वरवरच्या थरांमधील व्यक्ती त्यांच्या मंत्रिमंडळात काम करण्यास तयार नव्हती. १९४६ सालापासून ज्या व्यक्ती त्याच्या निवडणुकांना कारणीभूत झाल्या होत्या, त्याच्यापैकी काहीजण तो तपासून पाहू लागला.

पहिली व्यक्ती–मुरे छोटिनेर : पहिल्यापासून ह्या व्यक्तीवर निक्सनचा फार लोभ, कारण राजकारणातील निवडणुका कशा जिंकायच्या ह्याविषयीचे तंत्रमंत्र निक्सनला छोटिनेरकडूनच पहिल्यांदा समजलेले. नंतरच्या कारकीर्दीत निक्सनला उपयोगी पडणारी जोडगोळी–व्हिटॅनर–बॅक्स्टर हे जोडपे. त्यांच्याच मालिकेतील हा छोटिनेर. लॉस एन्जेल्समध्ये फौजदारी कोर्टातून काम करणारा एक साधा वकील. परंतु राजकारण आणि निवडणुका ह्यामध्ये त्याला अत्यंत रस. व्यवस्थेशीर प्रचार–मारा करून मतदारांची मते, आपल्या बाजूला कशी वळवून घ्यावयाची ह्यात तो हातखंडा. शेवटपर्यंत निक्सनबरोबर राहिलेला हा छोटिनेर १९६८ नंतर व्हाईट हाऊसमध्ये शिरला आणि कोणत्याही अधिकाराच्या पदावर नसतानादेखील वाटेल ती माणसे व्हाईट हाऊसमध्ये घुसडीत होता.

दुसरी व्यक्ती–हरबर्ट क्लीन : निक्सनसारखाच हरबर्ट क्लीन हा १९४६ साली महायुद्धावरून परत आलेला एक योद्धा. १९४८पासून 'पोस्ट ॲडव्होकेट' मासिकाचा संपादक. जेवढे म्हणून निक्सनविषयी चांगले आणि उठावदारपणे छापता येईल तेवढे छापावयाचे, असे ह्याचे धोरण होते. १९४८ मध्ये मिसेस हेलेन ह्या बाईच्या विरुद्ध लढत मारून निक्सन सिनेटमध्ये शिरला तेव्हापासून क्लीन हा निक्सनचा Press Adviser म्हणून काम करीत होता.

तिसरी व्यक्ती रॉबर्ट फिंच : ह्यादेखील युद्धावरून परतलेला शूर वीर. अत्यंत देखणा आणि रुबाबदार. त्याचे वडीलही १९१४ च्या पहिल्या युद्धावर गेलेले होते. १९४६ नंतर तो राजकीय इतिहास हा विषय घेऊन महाविद्यालयातून परीक्षेला बसला. पास झाल्यावर वॉशिंग्टनमध्ये कॉंग्रेसमन नोरिस पॉलसन ह्याच्याकडे सेक्रेटरी म्हणून काम करीत असताना निक्सनची त्याची ओळख झाली. पुढे तो व्हाईट हाऊस कौन्सेलर झाला.

चौथी व्यक्ती वुइल्यम रोजर्स : आयसेनहॉवर कारकीर्दीतला हा ॲडव्होकेट–जनरल पुष्कळ वेळा निक्सन ह्याचा सल्ला मानीत असे.

पृष्ठ २५ वर

# समाजवादी क्रांतीच्या वाटेतील खाचखळगे

भास्कर लक्ष्मण भोळे

घोषित उद्दिष्टांच्या पूर्ततेसाठी प्रत्यक्ष वापरात येणाऱ्या साधनांची केवळ भलावण करणारे तत्त्वज्ञान व सामाजिक शास्त्रे ही जैसे थे वादाचीच समर्थने असतात. राज्यकर्ते जितक्या वारंवार मार्क्सचा हवाला देतात तितके तिथे खऱ्या मार्क्सवाद्यांना कार्य करणे असंभव होत जाते ही वस्तुस्थिती असूनही मार्क्सवादाच्या भाष्यकारांनी आजवर फक्त भांडवलशाही व्यवस्थांनाच आपल्या टीकेचे लक्ष्य ठरविले आणि समाजवादी म्हणविणाऱ्या व्यवस्थांच्या संदर्भात अशा समीक्षणाची अधिक आवश्यकता असूनही तिकडे एकंदरीत दुर्लक्षच केले असे आढळते. समात्जवादी व्यवस्थांचे जे काही तुरळक परीक्षण झाले आहे ते बरेचसे अॅकॅडेमिक व सैद्धांतिक पातळीवरच झाले आहे. प्रत्यक्ष इतिहास व अनुभव यांच्या आधारे नाही. समाजवादाच्या राज्यवादी (स्टेटिस्ट) बुरख्याला हात घालण्याचे एकूणच मार्क्सवाद्यांनी टाळले आहे. खरे म्हणजे हा रहस्यभेद केल्याखेरीज 'आपल्या युगाचे साक्षेपी भान' किंवा 'विद्यमान परिस्थितीचे कठोर समालोचन' ही आपली भूमिका मार्क्सवादाला समर्थपणे पार पाडताच यायची नाही.

ऑक्टोबर क्रांतीच्या अवनतीमधून निर्माण झालेली नवी राज्यवादी वर्गव्यवस्था आजही स्वतःला यशस्वीपणे समाजवादी म्हणवून घेत आहे. वर्गीय इतिहासाचे परिवर्तन मार्क्सला मानवी इतिहासात करायचे होते. पण स्टॅलिनचे मार्क्सवादाचेच रूपांतर बंदिस्त विचारसरणीत करून टाकले. व्यवहाराप्रमाणेच सिद्धांताचेही निर्णयकर्तेपण पक्षनेतृत्वाला देऊन मुळात उत्क्रांतिक्षम असलेल्या त्या तत्त्वज्ञानाला कुंठित करून टाकले. सत्तासंपादनानंतर धारण केलेल्या मक्तेदारीत संस्थीकरणाच्या प्रक्रियेची सांगता केली. मार्क्सवादाला त्याच्या विश्वबंधुत्वाच्या उच्चपदावरून आदिम प्रांतिकतेच्या संकुचित पातळीवर आणून टाकले त्या क्रांतिकारी तत्त्वज्ञानाचा चेहरामोहरा पार बदलून जी नवी कर्मठ विचारसरणी त्याने तयार केली ती मूळ तत्त्वज्ञानाहून इतकी परकोटीची भिन्न आहे की तिला मार्क्सवादाचे भ्रष्ट रूप असे न संबोधता, मार्क्सवादाच्या परिभाषेत मांडलेली निराळीच विचारसरणी मानावी लागेल. मुळात राज्यविरोधी असलेला मार्क्सवाद त्याच्याशी आमूल विसंगत असलेल्या राज्यवादात इथे प्रवर्तित झाला. घोषित उद्दिष्टांमुळे व त्यांच्या सदोदित उद्घोषामुळे राज्यवादी वस्तुस्थितीवर समाजवादी मुलामा राज्यकर्ते देऊ शकले या नव्या व्यवस्थेत नवे अंतर्विरोध निर्माण होऊच शकत नाहीत. त्यामुळे विरोधविकास इथे नेहमीसाठी थांबतो, समाजात आढळणारा जो थोडाबहुत परात्मभाव (अॅलिनेशन) आहे तो जुन्या व्यवस्थेचा शेष भाग असून आपोआप नाहीसा होणारा आहे–अशा काही अंधश्रद्धा त्यांनी जोपासल्या. वैचारिक संघर्षाच्या नावाखाली स्वतंत्र विचाराला चिरडून टाकले, स्वतःच्या गरजांप्रमाणे इतिहासाची मोडतोड करून ऐतिहासिकतेच्या विरोधविकासवादी तत्त्वालाच धाब्यावर बसवले. मार्क्सवादाला केवळ भौतिक–तांत्रिक प्रगतीच्या व्याख्येत कोंबून टाकले. उत्पादनाचे मानवी स्वरूप आणि व्यक्ती–व्यक्तीतील निकोप संबंध हेही मार्क्सला सामाजिक प्रगतीचे तितकेच महत्त्वाचे निकष वाटत असताना नव्या राज्यकर्त्यांनी मात्र उत्पादनाच्या शक्तिप्रवाहावरच संपूर्ण सामाजिक जीवन आधारित असल्याचा भ्रम निर्माण केला. लोकप्रियता मिळविण्याच्या लालसेपोटी मार्क्सवादाच्या अतिसामान्यीकरणावर व संघटन-संस्थीकरणावर अतिरेकी भर देऊन त्या तत्त्वज्ञानाला पार पालथे पाडीत असतानाच स्वतः मार्क्सवादाच्या विशुद्धतेचे रक्षक असल्याचा बहाणा जगासमोर केला.

म्हणूनच समाजवादातील वास्तव मानवतावादाच्या आदर्शावर सतत घासून पाहण्याची जबाबदारी मार्क्सवाद्यांवर येऊन पडते. नवी मिथ्ये (मिथ्स), मंत्र-तंत्रे (फेटिशेस्), निषिद्धे (टाबूज) आणि पवित्र सिद्धांत (सेक्रेड टेनेट्स्) यांचे खरे अंतरंग उघडे केले पाहिजे. क्रांतिकारी चळवळ अखंड चालविण्याच्या लोकेच्छेला यातून प्रोत्साहन मिळू शकेल. समाजवादी समाजसुद्धा विचारसरणीजन्य आत्मविभ्रमाला सहज बळी पडू शकतो हे त्यांनी लक्षात ठेवले पाहिजे. त्यांच्या अंतिम निष्ठा मानवतावादाच्या सत्यावर व सत्याच्या मानवतावादावर दृढ स्थिरावलेल्या असल्या पाहिजेत संपूर्ण व विशुद्ध सत्याची भीती क्रांतीला स्वार्थासाठी बळकावणाऱ्यांना वाटत असते. खुद्द क्रांतीला ती कधीही वाटण्याचे काहीच कारण नाही. राजकीयदृष्ट्या सुरक्षित असो वा नसो मार्क्सवाद्यांनी आपली सचोटी सोडता कामा नये.

समाजातला परात्मभाव नाहीसा करणे हे राज्यसत्तेचे खरे कार्य असले पाहिजे. स्टॅलिनप्रणीत राज्यसत्ता हे कार्य पार पाडण्याची आपली क्षमताच केवळ घालवून बसली नव्हती तर ती स्वतःच एका नव्या व अधिक भयंकर अशा परात्मभावाचा मूलस्रोत ठरली होती. तरीही मार्क्सवाद्यांनी तिचे समाजवादीपण आजपर्यंत स्पष्टपणे नाकारले नाही. खरे पाहता खाजगी मालमत्ता नष्ट करण्यातून सामाजिक मालमत्तेची प्रतिष्ठापना होण्याऐवजी नवी वर्गीय राज्यसत्तेची मालमत्ता अस्तित्वात आल्यामुळे तिथल्या व्यवस्थेला आज समाजवादापेक्षा राज्यवाद म्हणणेच उचित ठरेल. मार्क्सच्या परात्मभावाविषयीच्या विचारांच्या आधारे समाजवादात, राज्यवादात उद्भवलेल्या नवनव्या परात्मभावाचा शोध आणि समीक्षण करण्याची जबाबदारी समकालीन मार्क्सवाद्यांनी टाळून चालणार नाही. एरवी, स्वतःच्या देशातील लोकशाहीच्या मार्गातील अडथळ्यांचा

विचार न करता केवळ भांडवलशाहीवर आपल्या सर्व शक्तीनिशी हल्ला चढविणाऱ्या मार्क्सवाद्यांच्या नैतिक व राजकीय क्षमता संशयास्पद ठरतील.

## समाजवादाचा राज्यवादी अवतार

अनेक वैचारिक-राजकीय मिथ्यांनी परिपूर्ण असलेल्या आपल्या शतकाचे सर्वात मोठे मिथ्य म्हणजे समाजवादाचे राज्यवादी मिथ्य, हे होय. राज्यवादाच्या पुरस्कर्त्यांनी दीर्घकाळपर्यंत जगाच्या डोळ्यांत धूळफेक करून त्याला खतपाणी घातले आहे. सर्व शक्तिमान राज्यसत्ता उभी करून आपण समाजवादाचे स्वप्न साकार केले असल्याचा दावा त्यांनी जगाच्या गळी उतरविला. वस्तुतः या राज्यसत्तेची सूत्रे धारण करणारा वर्ग श्रमिक कामगारांचा प्रतिनिधी न उरता कधीच उत्पादनसाधनांचा सामुदायिक मालक झाला आहे.

समाजवादाचे पर्यवसान राज्यवादात होणे अनिवार्य होते काय ? रशियात ते झाले याची काही कारणे नोंदविता येतील. मार्क्सच्या अपेक्षेविरुद्ध अप्रगत राष्ट्रांत क्रांती घडून आली. मोठा व विकसित असा कामगारवर्ग तिथे स्वाभाविकच नव्हता. जो छोटा कामगार वर्ग तिथे होता तो क्रांतियुद्धात कामी आला. समाजवादाचे विकृतीकरण होण्याचे हे एक निर्णायक कारण मानावे लागेल. त्याखेरीज रशियाचा आर्थिक-सामाजिक क्षेत्रातला सरंजामशाही वारसासुद्धा राजकीय सत्ता अनिर्बंधक होण्यास साहाय्यभूत झाला. शैक्षणिक-सांस्कृतिक दर्जा अत्यंत खालावलेला; जोडीला जागतिक युद्ध, प्रतिक्रांती व परकीय आक्रमणे यामुळे भूप्रदेश उद्ध्वस्त झालेला; विकसित देशातील कामगार चळवळींचा प्रभावी पाठिंबा एकूण अभावानेच उपलब्ध झालेला—अशा सगळ्या परिस्थितीत राज्यवादाचा प्रादुर्भाव आणि यश स्वाभाविक असले तरी क्रांतिकारी शक्तींच्या अखंड लढ्याद्वारे ती प्रक्रिया थांबविणे अशक्य नव्हते. क्रांतीनंतर सत्तेवर आलेल्या राज्यकर्त्यांसमोर दोन पर्याय होते : एक, समाजवादी स्वयं-व्यवस्थापनाचा व दुसरा, सर्वंकष राज्ययंत्र व पक्षसंघटन उभारण्याचा. पहिला काहीसा संदिग्ध असल्यामुळे तसेच दारिद्र्य, दुष्काळ व प्रतिक्रांती यांचा समर्थ मुकाबला करण्याची निकड जाणवल्यामुळेही त्यांनी दुसरा पसंत केला. आणि यातूनच अराज्यवादी मार्क्सविचाराला राज्यवादी व्यवस्थेच्या वैचारिक अधिष्ठानाचे रूप प्राप्त झाले. समाजवादात राज्यसत्ता उत्तरोत्तर बळकट होत जाणार हे वादातीत गृहीत मानले गेले. 'राज्य-समाजवाद' हा समाजवादाचा आदर्श ठरला. त्यामुळे या व्यवस्थेत श्रमिक कामगार शोषणमुक्त होणे तर दूरच राहिले उलट ते एका नव्या शोषणपद्धतीचे भक्ष्य ठरले. क्रांतीकारी राज्यसत्ता कामगारवर्गापासून दुरावून शेवटी त्या वर्गाच्या विरुद्ध उभी राहण्याचा हा धोकाही मार्क्सने आधीच सांगितला होता.

स्टॅलिनच्या राज्यवादात राज्यसत्ता=सर्वांगीण समाज असे समीकरण झाल्याने उत्पादनसाधनांची मालकी व व्यवस्थापनाची मिरासदारी राज्यसत्तेकडे आली. बूर्झ्वा समाजात श्रेष्ठींची राजकीय सत्ता त्यांच्या आर्थिक सत्तेवरून ठरते. याउलट राज्यवादी व्यवस्थेत त्यांची आर्थिक सत्ता राजकीय सत्तेवरून ठरते. सत्ताधाऱ्यांपैकी प्रत्येकाला अतिरिक्त मूल्यातील (सरप्लस व्हॅल्यू) त्याचा वाटा राज्यसत्तेच्या उतरंडीत त्याचे स्थान कुठे आहे यावरून मिळतो. निर्णयप्रक्रियेतील त्याच्या सहभागाचे स्वरूप आणि प्रमाणही त्याच आधारावर ठरते. नावाला कामगारांची हुकूमशाही पण प्रत्यक्षात निर्णयकर्त्यावर्गात कामगारांचे प्रतिनिधी अगदीच नगण्य आणि पुढे क्रांती जसजशी भूतकाळात-जाणार तसे हे प्रमाण आणखीच घटणार हेही ठरून गेलेले असल्याने दलित व शोषित कामगारांना तिथले राज्यकर्ते म्हणणे केवळ व्याजस्तुतीनेच शक्य आहे. उत्पादनाच्या नियंत्रणापासून तसेच अतिरिक्त मूल्याच्या वितरणाविषयीचे निर्णय घेण्यापासून त्यांना वंचित तर ठेवले जातेच पण भांडवलशाही व्यवस्थेत सुद्धा त्यांनी मिळविलेले काही हक्क त्यांना नाकारले जातात. उदाहरणार्थ, त्यांना आपला नियुक्त निवडण्याचा हक्क नाही, कामाच्या स्थितीबद्दल ते वाटाघाटी करू शकत नाहीत. पगारवाढ मागू शकत नाहीत. या अर्थाने राज्यवाद ही कामगारांचे वस्तुमात्रीकरण करणारी सामंतशाहीच असते. कामगारांच्या हितसंबंधांचे प्रतिनिधित्व करणाऱ्या स्वतंत्र-स्वायत्त संस्थांना तीत स्थानच नसते. कामगार संघटना वगैरे असल्या तरी त्यांचे कार्य केवळ प्रेषण माध्यमांचे (ट्रान्स्मिशन बेल्टस्) असते. किसान संघटनांचेही तसेच.

एका बाजूला राजकीय व आर्थिक सत्ता, मालमत्ता व सामाजिक प्रतिष्ठा या गोष्टी एकवटलेल्या तर दुसऱ्या बाजूला दमन-शोषणादी गोष्टी एकत्र आलेल्या अशी परिस्थिती असताना, ज्यांचे ते शोषण करतात त्यांचेच प्रतिनिधित्व करीत असल्याचा डिंडिम राज्यकर्ते वाजवीत राहतात. स्टॅलिनचा राज्यवाद 'अल्पजनसत्ताक' (ऑलिगार्किक) होता. तिथे राज्यकर्त्यावर्गाचा एकाधिकार प्रत्यक्ष व परिपूर्ण होता. या राज्यावादाला जमेची बाजू नव्हतीच असे नाही. त्याने अमाप प्रगती देशात घडवून आणली. एका मागास समाजाचे आर्थिक, राजकीय व सांस्कृतिक पुनरुत्थान घडवून आणून त्यास आंतरराष्ट्रीय क्षेत्रात श्रेष्ठ लष्करी सत्ता म्हणून नावारूपास आणले. जागतिक उद्योगधंद्यातील भागी वाढविली. एकेकाळी निरक्षर व अशिक्षित असलेल्या या समाजात आज साक्षरतेचे प्रमाण सर्वांत जास्त असून कला, संस्कृती, तंत्रज्ञान, वैद्यकशास्त्र इत्यादी अनेक क्षेत्रांत तो आघाडीला आहे. मोफत शिशुसंगोपन, आरोग्यविषयक व सामाजिक निगा, शिक्षणव्यवस्था याबाबतीत या राष्ट्राचा हात आज कुणी धरू शकणार नाही. स्त्रीदास्यविमोचनाची इथली गती जगात अतुलनीय आहे. दुसऱ्या महायुद्धात नाझीवादाचा पराभव करण्यात त्याचा सिंहाचा वाटा आहे. अशा अनेक गोष्टींचे श्रेय राज्यवादी व्यवस्थेला द्यावेच लागेल. पण तरीही तेवढ्यावरून ती समर्थनीय ठरत नाही. कारण स्टॅलिनवादाखेरीज एवढी प्रगती करणे केवळ अशक्य होते काय ? या लाखमोलाच्या प्रश्नाचे नकारार्थी उत्तर दिले जाण्यास भरपूर वाव आहे. अनेक प्रकारांनी व कारणांनी झालेल्या जीवितहानीचा व रक्तलांछित सामूहिकीकरणाने उद्ध्वस्त झालेल्या शेतकी क्षेत्राचाही नुसता विचार केला तर या प्रगतीसाठी मोजाव्या लागलेल्या जबर किमतीचा अंदाज येऊ शकेल. सामाजिक शास्त्रे व तत्त्वज्ञान या क्षेत्रांत आढळणारी कमालीची खालची पातळी, वैयक्तिक कलाक्षेत्रात पसरलेला कुंठितपणा व ओंगळ राजकीयीकरण, आंतरराष्ट्रीय साम्यवादी चळवळीला स्टॅलिनवादाखाली दडपण्याचे (प्रसंगी अमानुष) प्रयत्न व त्यातून इतर देशांच्या अंतर्गत विकासावर झालेले दुष्परिणाम—हे सगळे पाहिल्यावर

निश्चितपणे असे वाटते की, स्टॅलिनकाळ जर या देशाच्या इतिहासात उगवलाच नसता तर तो आहे त्याहूनही राजकीय, सांस्कृतिक व नैतिक अर्थाने अधिक समर्थ होऊ शकला असता.

राज्यवादाच्या समर्थकांनी त्याची आवश्यकता प्रतिपादताना बाह्य व अंतर्गत शत्रूंपासून संरक्षण, आर्थिक–सांस्कृतिक–शैक्षणिक संघटन अशी कारणे दिली आहेत. देशाभोवतालच्या भांडवलशाही वेढ्यांमुळे यांपैकी फार तर पहिले समर्थनीय ठरू शकेल. पण औद्योगीकरणाला जनसामान्यांनी केलेला विरोध मोडून काढण्यासाठी स्टॅलिन हा ऐतिहासिक आवश्यकतेचा अध्वर्यु होता, किंवा थेट कामगारांपासूनही राष्ट्रीय मालमत्तेचे संरक्षण करण्यासाठी सर्वंकष राज्यसत्ता आवश्यक होती असे म्हणण्यामागे काही मूलभूत संकल्पनात्मक घोटाळे आहेत, 'परिस्थिती'वर पूर्ण दोष टाकून, दुसरा पर्याय नव्हता असे भासविणे हेच आधी भ्रममूलक आहे. दुसरा पर्याय होता कामगारवर्गाचे सामर्थ्य आणखी संघटित करून राज्यसंस्थेवरचा त्यांचा प्रभाव वाढविणे व सामाजिक स्वयंशासनास प्रोत्साहन देणे हा तो पर्याय होता. एवढेच नाही तर क्रांत्युत्तर लगेचच्या काळात तशी प्रबळ प्रवृत्तीसुद्धा होती. फार तर परिस्थितीतील काही प्रतिकूल प्रवाहांमुळे या प्रक्रियेची गती काही अंशी मंदावली असती. परंतु स्टॅलिनवादाने ही खरी शक्यताच डावलली. नव्हे, त्याने तिच्याविरुद्धच लढा दिला. म्हणूनच रशियाच्या या तथाकथित समाजवादास (राज्यवादास) वस्तुनिष्ठ घटकांपेक्षा व्यक्तिनिष्ठ घटकच अधिक जबाबदार आहेत हे सत्य स्वीकारण्यावाचून गत्यंतर उरत नाही.

हा आदिम राज्यसत्ताधिष्ठित राज्यवाद पुढे जेव्हा सामाजिक प्रगतीच्या आड आला तेव्हा क्रमाक्रमाने त्याची जागा तंत्रप्रधान राज्यवादाने घेतली. वासाहतिक पूर्वकाळ असलेल्या समाजांमध्ये राज्यवादाचे असेच नवे नवे प्रकार अस्तित्वात आले. काही भांडवलशाही पद्धतीचेही पर्यवसान राज्यवादात झाले. बूर्झ्वा लोकशाहीच्या विकसित परंपरा–बहुपक्षपद्धती, राजकीय उदार मतवाद, संसदवाद वगैरे–असलेल्या देशांमध्ये बूर्झ्वा राजकीय लोकशाहीचा मुखवटा तसाच राहून 'कल्याणकारी राज्या'च्या स्वरूपात राज्यवाद अवतरला. तेव्हा आजची खरी शृंगापत्ती भांडवलवाद की समाजवाद ही नसून राज्यवाद की समाजवाद ही आहे. शेतीचे रक्तलांछित सामूहिकीकरण, साम्यवाद्यांचे निष्कासन, हंगेरी, युगोस्लाव्हिया, झेकोस्लोवाकीया इत्यादी राष्ट्रांवरचे लष्करी हल्ले–ह्या सगळ्या गोष्टी समाजवादात कशा बसतात? समाजवादाच्या नोकरशाहीतून मुक्त असा लोकशाही समाज उभा राहावा, आर्थिक विकेंद्रीकरण व्हावे, राजकीय दहशत व सेन्सॉरशीप यांना अर्धचंद्र मिळावा, कामगारांचे स्वयंव्यवस्थापन सुरू व्हावे, राष्ट्रीय सार्वभौमत्व प्रस्थापित व्हावे वगैरे अपेक्षित होते. या अपेक्षांच्या पूर्ततेसाठी केलेले प्रयत्न ज्या राजवटीत प्रतिक्रांतिकारक ठरतात त्या व्यवस्थेला मार्क्सप्रणीत समाजवाद कसे संबोधता येणार? अशा प्रश्नांनी जगातल्या मार्क्सवाद्यांना अधूनमधून अस्वस्थ केले असले तरी ती अवस्था मूलतः समाजवादीच नसल्याचा निर्वाळा त्यांनी कधीच दिला नाही. त्यांच्यापैकी काहींना अजूनही वाटते की, हा समाजवादी वाटचालीतला अपवादात्मक व तात्कालिक विक्षेपच आहे. वस्तुस्थिती अशी आहे की, समाजवादातील हा विक्षेप इतका प्रचंड व समाजवादाशी इतका मूलतः विसंगत आहे की, त्याला भ्रष्ट वा विकृत समाजवाद म्हणणेही चूक ठरावे. समाजवादी मार्गाचा गैरसमाजवादी उद्दिष्टांसाठी पद्धतशीर गैरवापर करणारा हा राज्यवाद आहे. घोषित समाजवादी उद्दिष्टांना अंधश्रद्धेचा विषय बनविणे, क्रांतिकारी भूतकाळाचा उदो उदो करणे, अशा क्लृप्त्यांमुळे ऑक्टोबर क्रांतीविषयी आदरभाव बाळगणारे मार्क्सवादी विचारवंतही फसतात. वस्तुस्थितीचे यथार्थ आकलन ते करून घेऊ शकत नाहीत.

देशाचे लष्करी सामर्थ्य वा जागतिक सत्तेचा त्याला मिळालेला दर्जा हे समाजवादी प्रगतीचे पुरावे म्हणून देणे म्हणजे समाजवादाला बिगरसमाजवादी निकष लावणे आहे. प्रत्यक्षात लोकशाही व स्वातंत्र्याच्या रक्षणार्थ अमेरिकेने घेतलेल्या साम्राज्यवादी पवित्र्याइतकाच रशियाचा आंतरराष्ट्रीय कामगार चळवळीबद्दलचा कळवळाही दांभिक आहे. कारण दोहोंमधील हेतू सारखेच आहेत हे ऐतिहासिक सत्य कधीही नजरेआड होऊ दिले जाता कामा नये. एकाच प्रकारची स्टॅलिनवादी अल्पजनसत्ता सर्व राष्ट्रांवर लादण्याच्या मनीषेने बाहेरच्या देशांना आपापले राज्यवादी प्रकारही निवडण्याचे स्वातंत्र्य रशिया देत नाही तिथे स्वतंत्र समाजवादी वाटा चोखाळू देण्याची बातच नको. राज्यवाद व समाजवाद यांमध्ये जर आपण अंतर करणार नसलो तर साम्यवादी पक्षांमध्ये अखंड घडणाऱ्या दुहीस व फाटाफुटीस आपण कुठलेच समाधानकारक स्पष्टीकरण देऊ शकणार नाही.

## साध्य–साधन विपर्यास

क्रांतीची साध्ये जेवढी अधिक महत्त्वाकांक्षी असतात तेवढी त्यांच्या प्रत्यक्षीकरणाच्या प्रभावी साधनांची हमी मिळणे दुरापास्त असते. आणि साधने जेवढी महागडी असतात तेवढा त्यांना स्वयमेव साध्यांचे स्थान मिळण्याचा व त्यांच्या भाराखाली क्रांतिकारक व त्यांची स्वप्ने भरडली जाण्याचा धोका मोठा होतो. साधनाविषयी पछाडलेपण निर्माण होणे हे साध्यसाधनविपर्यासाचेच लक्षण होय. क्रांतिकारी साध्यांना प्रत्यक्ष परिस्थितीपेक्षा अधिक धोका वापरात आणलेल्या क्रांतिकारी साधनांकडून संभवतो. मूलगामी उद्दिष्टांच्या नावाखाली भूतकाळाकडे पूर्ण पाठ फिरविण्याचे प्रयत्न कित्येकदा अत्यंत प्रतिगामी सिद्ध होतात. क्रांतिकारी चळवळ सर्वंकष होऊन प्रचंड ऐतिहासिक क्रमांना जन्म देते. उद्दिष्टांपासून जेव्हा जेव्हा दूर जाणे घडते अशा प्रत्येक वेळी दुर्दैवी आवश्यकतेच्या नावाखाली त्या पथच्युतीचे समर्थन केले जाते. साधने मग साध्यसापेक्ष राहण्याऐवजी स्वयंसिद्ध व अंतिम ठरून बसतात. संक्रमणकाळात सत्यासत्यविवेकशून्यता क्षम्य ठरू लागते. अशा तऱ्हेने राज्यवादी जेव्हा मूळ उद्दिष्टांना विकृत करतात तेव्हा त्यांच्या भोवतालच्या संधिसाधूंना ती पर्वणीच वाटते. ते त्या उद्दिष्टांना संपूर्ण मूठमाती देण्याच्याच प्रयत्नास लागतात. सर्व दमनसाधनांचा वापर अशा परिस्थितीत क्रांतिशत्रूविरुद्ध कारवाई करण्यासाठी होण्याऐवजी क्रांतिकारक चळवळीतल्या प्रामाणिक घटकांना दडपून टाकण्यासाठी केला जातो. ज्या शक्तींना व प्रवृत्तींना दडपायचे त्यांनाच संरक्षण प्रोत्साहन मिळून ज्या बळकट करायच्या त्यांचे खच्चीकरण होते.

काही कारणांमुळे अल्पकाळ हुकूमशाही आवश्यक ठरते असे मानले तरीही, तिच्यामुळे क्रांतीच्या गर्भाला नख लागल्यावाचून राहात नाही. क्रांतिकारी न्यायाच्या प्राप्तीसाठी व्यक्तिस्वातंत्र्यावर काही काळ मर्यादा घालणे इष्ट वाटले तरी बलप्रयोग नेहमीच अनिवार्यतः स्वातंत्र्यशून्य समाजव्यवस्थेची पायाभरणी करीत असतो. यातून मग क्रांतिकारक न्यायाऐवजी क्रांतिमारक अन्यायाची प्रतिष्ठापना होत असते. ऑक्टोबर क्रांतीनंतर लागलीच नव्हते एवढे निर्बंध नंतर प्रतिक्रांतीचा धोका कमी होत गेला असूनही वाढत गेले हे लक्षणीय आहे.

समाजवादाचा सर्वांत मोठा (खरे तर, एकमेव) धोका हुकूमशाही हा आहे. समाजवादाचा विकास केवळ लोकशाहीतच शक्य आहे. हुकूमशाहीतील कामगारवर्ग आपली क्रांतिकारी भूमिका कधीच पार पाडू शकत नाही, कारण तेथील नेतृत्व ती स्वतःकडे हिरावून घेते. लोकशाहीचा पाया अव्याहतपणे विस्तारीत नेऊनच क्रांतीचे तिच्या शत्रूपासून यशस्वी व कायमस्वरूपी रक्षण होऊ शकते. हुकूमशाहीची जाहीर समर्थने काहीही असली तरी मुख्यत्वे ती राज्यकर्त्यांचे दौर्बल्य झाकण्याची उपाययोजना असते. जुलमी राजवटींशी झुंजताना चळवळयांच्याच ठिकाणी निर्माण झालेल्या जुलमी मनोवृत्तीचा तो आविष्कार असतो. मार्क्सला 'कामगारवर्गाची हुकूमशाही' हवी होती हे खरे असले तरी ती ही नव्हे, कारण ती हुकूमशाही असली तरी बहुसंख्येची असणे—म्हणजेच लोकशाही असणे—अभिप्रेत होते. आज साम्यवादी देशांमध्ये असलेली हुकूमशाही ही मूठभरांची आहे हे लक्षात घेतले पाहिजे.

क्रांतिकारी सत्तेला स्वेच्छाचाराचाही तितकाच गंभीर धोका संभवतो. सर्व प्रतिक्रांतिकारक शक्तींना एकवटल्यावर संभवेल त्यापेक्षाही तो मोठा असतो. स्टॅलिनवाद वैधतेचे विडंबन करतो. वैधतेची ढाल तो राज्यसत्तेच्या नागरिकांपासून संरक्षण करण्यासाठी वापरतो, नागरिकांचे त्या सत्तेपासून नव्हे. तो बळाचा व हिंसेचा अतोनात वापर करतो, इतका की कायमस्वरूपी क्रांतीची जागा कायमस्वरूपी दहशतवाद व हिंसाचार घेतो. मानव-जीवनाविषयीचा आदरच त्यामुळे धुळीस मिळतो. खरे तर अगदी क्रांतिशत्रूवरही हिंसेचा वापर करणे औचित्याला धरून नाही. मार्क्सला वर्गकलहाद्वारे वर्गाचे **सामाजिक** अस्तित्व पुसायचे होते, विरोधी वर्गाचे **शारीर** अस्तित्व नव्हे. क्रांतिकारक हिंसेची नैतिक मर्यादा विसरायला झाल्यावर प्रतिक्रांतिकारकांपेक्षा क्रांतिकारकांना चिरडण्यासाठीच तिचा अवलंब होतो. साधनरूप नष्ट होऊन तीस साध्यरूप प्राप्त होते. शेवटी तर ती प्रतिक्रांतीचेच साधन होऊन बसते. स्टॅलिनच्या कारकीर्दीत हेच घडले. क्रांतिकारी हिंसेचे परिवर्तन तेव्हाच्या राज्यकर्त्यांनी हिंसापिसाट संशयीपणात करून टाकले. क्रांतिकारी हिंसेच्या या शोकांतिकेचा आजवर झाला आहे त्यापेक्षा अधिक गंभीर विचार झाला पाहिजे.

हिंसेला मानवी स्वभावाची नैसर्गिक प्रतिक्रिया नेहमीच कामाविषयी औदासिन्य, घटलेली उत्पादनक्षमता, भौतिक एकाकीपणा व आध्यात्मिक चैतन्यशून्यता इत्यादी प्रवृत्तींच्या स्वरूपात व्यक्त होत असते हे विसरून चालणार नाही. जेव्हा अगदीच अनिवार्य असेल अशाच प्रसंगी हिंसेचा व बळाचा वापर व्हावा; आणि तो करीत असतानासुद्धा तो करणाऱ्यांनी ही जागती जाणीव सतत बाळगायला हवी की कितीही सकारण व काळजीपूर्वक वापरलेली असली तरी हिंसा क्रांतिकार्याची कधीही भरून न येणारी नैतिक हानी केल्यावाचून राहात नाही. तसेच आपण हिंसाचाराचा वापर **खरोखरच** कोणाविरुद्ध करीत आहोत याचीही त्यांना स्पष्ट कल्पना असायला हवी. आत्मनियमनावाचून केलेली हिंसा हे केवळ सॅडिस्टिक क्रौर्य ठरते. पाशवी बळाचा वापर कसा वाढत जातो ते कळत नाही पण एकदा त्या दिशेने फार पुढे निघून गेल्यानंतर परतण्याच्या वाटा बंद झालेल्या असतात. प्राप्त परिस्थितीत आवश्यक असेल त्यापेक्षा कित्येक पटींनी अधिक बलप्रयोग जुलूमशाहीत नेहमीच केला जातो. राज्यकर्ते हे विसरतात की हिंसाचाराने मार्गातले फार तर फक्त काही अडसर दूर होऊ शकतील पण प्रश्नांची उत्तरे हिंसा कधीच देऊ शकणार नाही.

साधने अशी साध्यापासून मुक्त होणे, दुरावणे व जुलमी होणे हे अनेकदा स्वप्नरंजनामुळेही घडते. उद्दिष्टे आणि वस्तुस्थिती यांच्यात मुळातच जेव्हा अमिट विसंगती असते तेव्हा क्रांतिकारक हे शून्यवादी होण्याची फार मोठी भीती असते. वस्तुस्थितीवर आदर्श लादण्याचे प्रयत्न अशा वेळी संघटनेमार्फत होतात. उद्दिष्टे जेवढी दुःसाध्य तेवढी अधिक जाचक मार्गांचा अवलंब करण्याची प्रवृत्ती जास्त, आणि मार्ग जेवढे पाशवी तेवढा दुष्प्राप्य साध्यांचा सोस मोठा असे दुष्ट वर्तुळ तयार होऊन बसते. स्वप्नरंजनाचे असे वाटोळे झाले की राज्यकर्ते स्याद-डावेपणाचा-(स्यूडो लेफ्टिझम्) आधार घेतात आणि अतिरेकी डाव्या वेडाचाराचा पुरस्कार करू लागतात. तसे करण्यातून आपण खऱ्याखुऱ्या ऐतिहासिक शक्यताच पार उधळून टाकीत आहोत याची त्यांना जाणीव नसते.

## राजकीय पक्ष

रशियाचा साम्यवादी पक्ष तिथल्या समाजवादाच्या ऱ्हासाला फार मोठ्या प्रमाणावर कारणीभूत ठरला आहे. पूर्ण राज्ययंत्रणा व पक्षयंत्रणा परस्परांत मिसळून गेल्यामुळे उरलेल्या सगळ्या संघटनांना केवळ प्रेषण माध्यमांचे कार्य उरले. सर्व उत्पादनसाधनांचे सामुदायिक स्वामित्व पक्षाच्या हाती आल्याने सगळ्या कामगारांवर त्याचे प्रत्यक्ष नियंत्रण प्रस्थापित झाले. तो त्यांचे अमर्याद शोषण करू शकला. कमालीचे केंद्रीकरण, काटेकोर उतरंड आणि सर्व व्यवहारांचे मक्तेदारीकरण या तत्त्वांवर आधारलेला हा पक्ष आपल्याच प्रतिमेनुरूप संपूर्ण समाजव्यवस्थेची जडणघडण करीत राहिला.

या केंद्रीभूत व लष्करी शिस्तीच्या संघटनेच्या केंद्रस्थानी व्यावसायिक क्रांतिकारकांचा भरणा असतो. सभासदांनी आपले नेते निवडण्याऐवजी नेतेच इथे सभासदांची निवड व पक्षप्रवेश करून घेतात. एकाश्मता (मोनोलिथिझम्), शिस्त, उतरंड, कर्तव्यतत्परता, जबाबदारी व नेमणूकपद्धती यांच्यावर अत्यंतिक भर दिल्यामुळे विविधता, पुढाकारवृत्ती, लोकशाही, हक्क व मिवडस्वातंत्र्य यांचा इथे निःसंशय बळी पडतो. पक्ष अस्खलनशील असून कामगारांच्या प्रश्नांचे उत्तर मिळवून देण्याचे ते एकमेव ऐतिहासिक साधन आहे; म्हणून प्रत्येकाने त्यात आपले संपूर्ण व्यक्तिमत्व बिनशर्त व पूर्णतः विसर्जित करावे अशी धारणा प्रयत्नपूर्वक जोपासण्यात येते.

**पृष्ठ २१ वर**

# बावीसावे मुंबई महानगर मराठी साहित्यसंमेलन !

दीपक श्रीराम मांडे

आदल्या दिवशीच्या मिष्टान्नाची चव जीभेवर रेंगाळत असतानाच, उगवत्या दिवशी पुन्हा पक्वान्नांची मेजवानी मिळण्याचा सुखद योग नुकताच मुंबैकरांना मिळाला.

१९७६ साल आपल्या विविध प्रकारच्या सांस्कृतिक कार्यक्रमांनी मुंबैकरांना रिझवून काळाच्या कोटात 'टाऽटा' करीत निघून जात असतानाच, गोरेगाव येथील प्रबोधन संस्थेतर्फे आयोजित '२२ वे मुंबई महानगर मराठी साहित्यसंमेलन' हळूच 'गुड् मॉर्निंग' करीत १ जानेवारीला प्रकटले !

गोरेगाव येथे आयोजित करण्यात आलेले हे, मुंबई मराठी साहित्य संघाचे बावीसावे मुंबई महानगर मराठी साहित्यसंमेलन नि गोरेगावला हे साहित्य संमेलन भरविण्याचा मिळालेला दुसरा सन्मान ! १९५८ साली गोरेगाव येथे श्रीमती कुसुमावती देशपांडे यांच्या अध्यक्षतेखाली हे साहित्यसंमेलन भरले होते, तर यावर्षीचे अध्यक्ष होते, 'स्वामी'कार पद्मश्री रणजित देसाई !.

जिचा कौतुक होण्याचाच काळ आहे, अशा वय वर्षे पाच असणाऱ्या 'प्रबोधन' ह्या संस्थेने प्रथमच आपल्या इतर उपक्रमांच्या जोडीने ह्यावर्षी हे साहित्यसंमेलन आयोजित केले.

१९७५ सालच्या संमेलनात, (जे गिरगावातल्या साहित्य संघाच्या इमारतीतच भरले होते) श्री. वा रा. ढवळे यांनी—'मराठी माणसांनी व्यापलेल्या ह्या एवढ्या मोठ्या मुंबई शहरात मराठी साहित्याची चळवळ थंडावल्याचा खेद व्यक्त करून आवाहन केले की, नवनवीन संस्थांनी पुढाकार घेऊन उपनगरातून ही संमेलने भरवली पाहिजेत. हे वृत्त वाचताच दुसऱ्याच दिवशी समारोपप्रसंगी 'प्रबोधन'कार मंडळी तिथे हजर झाली आणि त्यांनी तिथल्या तिथे १९७६ च्या संमेलनाची घोषणा करून टाकली.

'प्रबोधन'कारांनी संमेलन बोलावताना जी तडफ नि उत्सुकता दाखवली, तीच तडफ नि उत्सुकता संपूर्ण कार्यक्रमात आढळून येत होती. त्यामुळेच साहित्य संमेलनाचा भरगच्च कार्यक्रम व्यवस्थित पार पडला.

संमेलन सुरू होण्याआधी २५ ते २९ डिसेंबरपर्यंत प्रबोधनतर्फे आयोजित पाचवी एकांकिका स्पर्धा झाली, जिच्यात बावीस एकांकिका सादर झाल्या. त्यातल्या निम्म्या तर पहिल्यांदाच सादर केल्या जात होत्या. त्याचप्रमाणे साहित्य संमेलना अगोदरच्या तीन-चार रात्री गोरेगावकरांना प्रबोधनतर्फे संमेलनाच्या कै. वि. स. खांडेकर स्मारक मंडपात 'थँक्यू मि. ग्लाड', 'रामशास्त्री' इत्यादी नाटकांचे प्रयोग पाहायला मिळाले. प्रत्यक्ष संमेलन सुरू होण्याआधीच आठवडाभर अशा रीतीने 'येणार ! येणार !!' म्हणून एखादी सर्कस गाजते, तसे हे संमेलन गोरेगावकरांच्या कानात-मनात गाजत-वाजत राहिले. प्रबोधनच्या कार्यकर्त्यांनी तर दोन अडीच महिने अगोदरपासूनच संमेलनाची तयारी सुरू करून २,५०० स्वागत-सभासद गोळा केले होते. नमूद करण्याजोगी गोष्ट म्हणजे 'खुल्या मंडपा'त सादर होणाऱ्या या संमेलनास गोरेगाव पालिकेचीही साथ आढळून आली. डासां-चिलटांपासून बचाव व्हावा म्हणून पालिकेचे सेवक डी. डी. टी. मारताना (प्रामाणिकपणे !) आढळत होते.

नव्या वर्षाच्या पहिल्याच दिवशी संमेलनाला सुरुवात झाली. गोरेगावच्या अ. भि. गोरेगावकर शाळेत सजलेल्या मंडपाला 'स्वर्गीय वि. स. खांडेकरांचे' नाव देण्यात आले होते, नि मुख्य प्रवेशद्वाराला 'स्वर्गीय चिं. त्र्यं. खानोलकर' नाव देऊन 'प्रबोधन'कारांनी मोठेच औचित्य दाखविले.

'कै. वि. स. खांडेकर' मंडपाच्या आवारात साहित्यिकांच्या थोर कलाकृतींचे नि त्यांच्या १' × १' च्या भव्य क्लोजअप्सचे, हस्ताक्षरांचे प्रदर्शनही वैशिष्ट्यपूर्ण होते. थोर साहित्यिकांची छायाचित्रे जी गोडाऊनमध्ये धूळ खात पडली होती, ती साहित्य संमेलनाच्या मोक्याच्या जागी व प्रसंगी पुनर्प्रकाशात आणून 'प्रबोधन'कारांनी पुन्हा औचित्य दाखविले. तसेच रंगावलीत बद्ध अशी कै. ग. त्र्यं. माडखोलकर, रणजित देसाई, कै. खांडेकर, कै. चिं. त्र्यं. खानोलकर यांची 'रंगावली-चित्रे' ही खास उल्लेखनीय होती. श्री. शिरसेकर, श्री. कोळंबेकर व मालणकर या कलाकारांची त्यामागची मेहनत स्पष्ट दिसत होती.

मंडप आवारात पुस्तक-प्रदर्शन व विक्रीवर सवलत देणारे स्टॉल्स उघडले होते, महाराष्ट्र साहित्य व संस्कृती मंडळ, मॅजेस्टिक, नि बॉम्बे बुक डेपो यांनी ! प्रकाशनक्षेत्रात नुकतेच पाऊल टाकणाऱ्या नव्या 'ग्रंथाली'चाही स्टॉल होता.

प्रत्यक्ष संमेलनाची सुरुवात, उद्घाटक व मुंबईचे महापौर श्री. मनोहर जोशी यांच्या भाषणाने झाली. भाषणात ते मोठ्या ढंगदार शैलीत म्हणाले की, जसं मातेशी, मातीशी तसेच भाषेशीही इमान असावे. त्यासाठीच पालिकेतील कामकाज आजकाल मराठीतून होते. सर्व तऱ्हेची प्रगती ही प्रादेशिक भाषांतून होऊ शकते. परंतु त्यासाठी साहित्यिक आणि पालिका ह्यांच्यात एकरूपता हवी. त्यासाठी एखादे भव्य मराठी सांस्कृतिक केंद्र हवे. अनेक छोटी छोटी केंद्रे आहेत. पण त्यांचा व्याप-विस्तार कमी. अशी खंत व्यक्तवून एखादे भव्य सांस्कृतिक केंद्र उभारण्याचा प्रयत्न ते करतील असेही त्यांनी सांगितले. श्रीमंत व गरीब ह्या दोन जगांना जोडणाऱ्या दुव्याचा संमेलनातून विचार व्हावा अशी अपेक्षा त्यांनी मांडली.

महापौरांच्या हस्ते उद्घाटन झाल्यानंतर स्वागताध्यक्ष श्री. भाई सावंत यांनी, हे संमेलन म्हणजे ३ लाख वस्तीच्या नि अठरापगड

जातींच्या गोरेगावातील मराठीपण जपण्याची धडपड आहे असे सांगितले.

संमेलनाध्यक्ष 'स्वामी'कार रणजित देसाईंनी तीर्थरूप भाऊ-साहेबांस अभिवादन करून, स्वतःजवळ ज्ञान-वय-पदवी यांचे काहीही भांडवल नसलेला मी एक साधा ललितलेखक आहे, असं सांगून आपल्या अध्यक्षीय भाषणास प्रामाणिक सुरुवात केली.

'स्वामी' कारांनी, आपण 'नवं-जुनं साहित्य' हा भेद जाणत नाही, तर शाश्वत मूल्ये असलेल्या कलाकृतिच चिरंतन टिकतात, असं ज्ञानेश्वर-तुकाराम यांच्या कृतिंचा निर्वाळा देत सांगितले. 'लेखक का लिहितो?' हे सांगतांना ते म्हणाले कीं, समाजातील खुपणाऱ्या शल्यांवर आपली प्रतिभेची वैचारिक पुटे चढवून लेखक साहित्यमोती तयार करतो. यातूनच समाजाची, मानवी मनाची, सुख-दुःखे सांगणाऱ्या कलाकृति जन्मतात.

नाविन्य, रंजकतेतून आनंद शोधणारा वाचक, दुर्बोधतेमुळे त्या आनंदाला मुकला, त्यामुळे नवतेचा डांगोरा पिटूनही त्या प्रकारच्या कादंबऱ्यांना वाचकांच्या मनात घर करता आले नाही व शेवटी लेखकाने वाचकाचे स्थान गौण ठरवले. पण गाण्याला जसा श्रोता लागतो तसंच लिहिणाऱ्यालाही वाचक लागतोच लागतो, हे मत त्यांनी ठामपणे प्रतिपादित केले.

मागील पिढीतला वाचकवर्ग आणि आजचा वाचक, यात खूप फरक आहे असं सांगून ते म्हणाले की, आजचा वाचक जीवनाला अधिक सामोरा आहे. आजचं वाङमय थिटं मुळीच नाहीय, उलट या पाच सात वर्षांत नव्या जाणिवा, प्रवृत्ती, प्रेरणा घेऊन समाज-निष्ठ वाङमयनिर्मितीला खऱ्या अर्थानं सुरुवात झाली आहे, असे समाधान व्यक्तवून नि प्रबोधनकारांचे व रसिकांचे पुनश्च आभार मानून त्यांनी आपले अध्यक्षीय भाषण संपविले.

संमेलनाचा दुसरा नि मुख्य दिवस गाजला, तो नऊ कविरत्नांच्या जोषपूर्ण काव्यवाचनाने, रंगलेल्या परिसंवादाने आणि कथाकथनात हातखंडा असलेल्या पु. ल. काळेंच्या कथाकथनाने!

कै. आरतीप्रभूंची 'आधार' कविता वाचून आरती प्रभूंना श्रद्धांजली वाहिल्यानंतर कविसंमेलनाचे संचालक प्रा. वसंत बापट यांनी कार्यक्रमास सुरुवात केली.

केवळ नियोजित कवींनीच त्यांच्या मोजक्या ४-५ कविता कार्यक्रमाच्या पूर्वरंग नि उत्तररंगात म्हणून दाखविल्यामुळे २॥-३ तासांचे हे कविसंमेलन कऱ्हाडच्या कविसंमेलनाचे जुळे भावंड न ठरता, सुबद्ध रीतीने पार पडले.

प्रा. वि. दा. करंदीकरांनी 'आज प्रार्थना प्राणाएवढी' हे मुक्त सुनीत, 'मातीच पायाखालती' ही उपदेशपर गझल एक 'विरूपिका' नि त्यांची 'घेता' ही सुप्रसिद्ध कविता एका 'खास' फर्माईशीवरून सादर केली.

श्री. दया पवार यांनी 'काव्यशारदेच्या आठ भुजांपैकी आठवी दलित साहित्याची आहे' असं मोठ्या आवेगात सांगून 'सामान्य माणसाची अंत्ययात्रा', वाल्मिकी', 'आहे ना अजब नगरी, एका खोलीत तीन चुली...' असे सांगणारी 'पहिली रात्र', दलितांची उत्पत्ती पायापासून झाली अशा पारंपारिक समजावर आधारलेली 'पाय' नि 'विसाव्या शतकात, दर्शन अश्मयुगाचे...' अशी हेटाळणी असलेली 'शहर' ह्या कविता वाचल्या.

त्र्यंबक खानोलकरने वाचलेल्या पाहुणे आम्ही, पहाट, पोलादी पाय, चारचौघे यापैकी पाहुणे आम्ही व चार चौघे या कविता उल्लखनीय होत्या.

अंगात ताप असूनही कविसंमेलनास उशीरा का होईना आलेल्या शांता शेळके यांची 'पैठणीच्या चौकड्यांनो, आजीला माझे कुशल सांगा' असं सांगणारी 'पैठणी' ही कविता रसिकांस स्पर्शून गेली, तर मंगेश पाडगावकरांच्या माझ्या मेंढरांनो', 'शेपटी,' ('किसी के डोके को त्रास न देनेनाली') 'साधी सोपी-सरळ कविता', भीती नि-शोषण यांच्या पायावर आधारित समाजाच्या एका भेदरलेल्या जीवाची अवस्था रेखाटणाऱ्या 'सलाम' ह्या कवितांनी विचार करण्यास श्रोत्यांना भाग पाडले.

आपल्या हळुवार आवाजाने नि नाटचपूर्ण अभिनिवेशाने नवोदित राजन साटमने काजळछाया, लिखित, चंद्र उगवला नभात, कविता सादर केल्या. त्यांच्या 'सूर्याचा पोर' ह्या म. रा. कविसंमेलनात विजेत्या ठरलेल्या कवितेने जाणकारांची दाद मिळवून वन्स मोअर घेतला.

नितिन दादरावाला यानेही म. रा. स्पर्धेत विजेत्या ठरलेल्या 'हात' नि 'पिरॅमिड' ह्या हळुवार कविता वाचून वाहवा मिळविली.

श्री. नारायण सुर्वे यांनी त्यांच्या खास शैलीत पोस्टर, सत्य, माझ्या देशाच्या नोंदबुकात माझा अभिप्राय असे लांबलचक शीर्षक असलेली कविता वाचली नि 'गिरणीची लावणी' तर त्यांनी गाऊन दाखवली व श्रोत्यांना ठेका धरावयास लावले.

सरतेशेवटी, कार्यक्रमाचे संचालक प्रा. वसंत बापट यांनी 'सावंत' ही व्यक्तिचित्रात्मक, 'एका कुमाराची कहाणी' ही कुमार गंधर्वां-वरील कविता म्हणून, नि 'लावणी अखेरच्या विनवणीची' ह्या कवितेने ह्या बहारदार कार्यक्रमाची सांगता केली.

पहिल्या दिवशी जसा उन्हामुळे त्रास झाला, तसाच थोडा त्रास दुसऱ्या दिवशी कविसंमेलनानंतरच्या तब्बल ५ तासांच्या मध्यांतरा-मुळे गोरेगाव उपनगरी, जे पत्रकार-साहित्यिक वा रसिक बाहेरून आले होते, त्यांना झाला.

ह्या संमेलनात प्रत्येक कार्यक्रम नियोजित वेळेपेक्षा तासाभराने उशीरा सुरू करण्याची पद्धत होती की काय संयोजक जाणोत पण दुसऱ्या दिवशी परिसंवाद एक तास उशीरा सुरू होऊनही फारच रंगला.

संमेलनाध्यक्ष देसाईंनाच डोळ्यापुढे ठेवून निवडलेला 'ऐतिहासिक व चरित्रात्मक कादंबरीतील कल्पिताचे स्थान' हा विषय मोठा युक्त होता.

सर्वमान्य ऐतिहासिक सत्यांना नि सिद्ध घटनांना धक्के न लावता, प्रतिभेने कल्पित लिखाण केले, तर त्याला हरकत नाही, असे इतिहासकार सेतूमाधवराव पगडी यांनी सांगितले. 'श्रीमान योगी' कादंबरीत शिवाजीमहाराज हंबीररावांना एक शेर सुनवतात असा उल्लेख आहे. पण तो शेर शिवाजीनंतर २०० वर्षांनंतर 'इक्बाल' ह्या शायराने लिहिलाय. निदान अशा ढोबळ चुका तरी होऊ नयेत असे सांगून पगडींनी समस्त श्रोत्यांत हास्याची खसखस पिकवली.

प्रा. गंगाधर गाडगीळांनी उत्कर्षबिंदू वा नाटच वा रसनिर्मिती-

साठी तयार केलेल्या कल्पित घटनापात्रांवर सणाणून हल्ला केला. इतिहासातील वा व्यक्तीच्या चरित्रातील सत्य शोधून काढून, त्या ओबडधोबड प्रत्यक्ष सत्यातूनच कल्पिताची पुटे न चढविता लेखकाला प्रभावी कलाकृती निर्माण करता यावी असे आव्हान केले.

कुडमुड्या ज्योतिषाप्रमाणे पंचांग घेऊन, टीकाकारांनी बसू नये व सतत इतिहास नि ललितकृती यांच्या तौलनिक दृष्टीतून कादंबरीकडे पाहू नये असे सांगून श्री. ज. जोशी म्हणाले, सत्य हे प्रत्येकानुरूप बदलते. त्यामुळे मी लिहिलेले हे माझे सत्य. ते कसे रंगलेय, ते पहा.

प्रा. दिगंबर पाध्ये यांनी ललितकृतीदेखील वास्तवाचीच प्रतिक्रिया असते, असे असता फक्त ऐतिहासिक वा चरित्रात्मक कादंबरीकारालाच का धारेवर धरायचे ? असा मार्मिक प्रश्न उपस्थित करून मराठी टीकेतली विसंगती दाखवून दिली.

माधव मनोहरांनी शेक्सपिअरचा आदर्श आपल्या लेखकांनी डोळ्यापुढे ठेवावा असा सल्ला देऊन शेक्सपिअरने इतिहासात फारशी विकृती न करता, इतिहासाशी इमान राखून ललितकृती लिहिल्याचे सांगितले.

परिसंवादाचा समारोप करताना ‘ स्वामी ’कारांनी सांगितले की, ‘ रमा ’ हे पात्र कल्पित आहे असे म्हणून तिचे महत्त्व कमी करू नका, कारण इतिहासात रमेविषयी फक्त ४ ते ५ च उल्लेख उपलब्ध आहेत. इतिहासाला जे माहीत नाही, त्या दऱ्या आम्ही ललितलेखक इतिहास पूर्ण अभ्यासल्यानंतरच भरून काढतो आणि आम्हा कादंबरीकारांपेक्षाही इतिहासकारांनीच इतिहासात जास्त गोंधळ घातलाय.

कथाकथनाच्या कार्यक्रमाला इतर सर्व कार्यक्रमांपेक्षा जास्त गर्दी होणे ठरलेलेच ! इथेही तसेच झाले. दीड–दोन हजार श्रोतृप्रेक्षक हजर. परंतु सर्वांचेच समाधान व्हावे असे कथाकथन झाले नाही, हा या संमेलनातील एक फार मोठा कच्चा दुवा. सौ. नीला जोशी ह्यांनी एका ‘ फसलेल्या हनिमून ’ची कथा सांगताना कथेतल्या नवऱ्याच्या खादाडपणाचे उगीचच दळण दळले, तर गिरीजा कीर यांनी तद्दन मेलोड्रॅमॅटिक कथा तितक्याच नाटकी आवेशात सांगितली.

ह्या दोन्ही स्त्री-कथाकारांनी जणू दाखवूनच दिले की, उत्तम कथाकथन करणारी स्त्रीलेखिका दुर्मिळ आहे !

कथाकथनाचे संचालक डॉ. सदा कऱ्हाडे यांची कथा होती तशी तथ्यपूर्ण. कथन–आवेशही साजेसा होता, पण कुठेतरी काहीतरी चुकत होते नि श्रोता कथाकथनाची नस पकडून कथेबरोबर वाहून जाऊ शकत नव्हता, कथेला गती नव्हती.

मात्र कथाकथनाच्या त्या रटाळ ग्रीष्मात दोन वसंतांनी चांगलाच वसंत फुलविला ! वसंत सबनीस यांनी ‘ एक कविसंमेलन ’ ही कथा [जाता जाता–वसंत सबनीस हीच कथा, दीर्घ विनोदी काव्य म्हणून कविसंमेलनातही सादर करतात म्हणे. ] सांगून श्रोत्यांना घवघवीत हसविले, तर कथाकथन प्रकाराला नवे वळण, लोकप्रियता देणाऱ्या नि कथाकथनाचा पायंडा पाडणाऱ्या व. पु. काळे यांनी सातवळेकर हे व्यक्तिचित्रण रंगवून हुकमी हसू नि आसू डोळ्यातून काढून रटाळ होत जाणाऱ्या कार्यक्रमावर गुलाबपाण्याचे थंडगार शिंतोडे उडवले.

‘ प्रबोधन ’ आयोजित ह्या कार्यक्रमातून श्री. विजय नाडकर्णी यांचे सुश्राव्य निवेदन श्री. सुभाष देसाई, पद्माकर देसाई, तावडे इत्यादींची प्रामाणिक धडपड सातत्याने दृष्टीत भरत होती.

कथाकथनाच्या कार्यक्रमानंतर समारोप, आभार प्रदर्शन होऊन, नि रात्री श्री. पु. ल. देशपांडे लिखित, माधव वाटवे दिग्दर्शित ‘ आम्ही लटिके ना बोलू ’चा प्रयोग सादर करून दोन दिवसाचे हे छोटेसे पण आजतागायतच्या महानगर संमेलनांपेक्षा भव्य स्वरूपात सादर केले गेलेले प्रबोधन आयोजित संमेलन संपले नि गोरेगावकर रात्री १।। वाजता, हुडहुडत्या थंडीत, थरथरत्या कायेने नि प्रसन्न–संतुष्ट मनाने घरी परतले. □


**प्रसिद्ध झाले !**



**लाल किल्ल्यातील अभियोगाची कहाणी १९४८-४९**

**लेखक : पु. ल. इनामदार**

**मूल्य : वीस रुपये । राजहंस प्रकाशन, पुणे ३०**

पुस्तके

# काळाची पाउले

कमल पाध्ये

कृष्णाबाई मोटे यांची 'काळाची पाउले' हे पुस्तक नुकतेच वाचनात आले. स्त्रिया व मुले यांच्या जीवनाचा व प्रश्नांचा अभ्यासपूर्ण मागोवा घेणारे लेख निरनिराळ्या नियतकालिकांतून व मासिकांतून कृष्णाबाईंनी १९४७ सालापासून लिहिले होते. त्या लेखांचे हे संकलन. लंडन स्कूल ऑफ इकॉनॉमिक्सचा सोशल सायन्सचा डिप्लोमा घेऊन भारतात आलेल्या, महाराष्ट्र सरकारच्या स्त्री कर्मचारी कल्याण अधिकारी आणि बालविकास समिती संघटक म्हणून अनेक वर्षे कार्य करणाऱ्या कृष्णाबाईंचे हे पुस्तक उघडताना ते विद्वत्ताप्रचूर परिभाषेने भरले नसेल ना अशी एक शंका मनात तरळत होती. पण पुस्तक संपले आणि वाटले की, मध्यमवर्गीय स्त्रीसमाजाचे अतिशय सूक्ष्म आणि सहानुभूतिपूर्ण निरीक्षण केलेल्या एका समाजकार्यकर्तीशी गप्पा मारूनच आपण उठलो आहोत. आपल्या सहजसुंदर, सोप्या शैलीत त्यांनी, महायुद्धापासून आलेल्या महागाईने, शिक्षणाने, स्वातंत्र्यानंतर आलेल्या लोकशाहीने, स्त्रीविषयक कायद्यातील बदलाने आणि पाश्चात्य विचारांच्या प्रभावाने महाराष्ट्रातील मध्यम वर्गीय स्त्रीजीवनावर झालेले परिणाम आणि त्यात झालेले बदल यांचे नेमके दर्शन घडवले आहे. त्या एक नाणावलेल्या लेखिका आहेतच, पण त्याबरोबरच त्यांनी मध्यमवर्गीय स्त्रीजीवनाचा किती सांगोपांग व सखोल अभ्यास केला आहे, त्यासाठी किती निरीक्षण व वाचन केले आहे आणि प्रत्यक्ष अनुभव घेतले आहेत आणि या सर्व प्रश्नांकडे किती सहृदयतेने आणि आस्थेने पाहिले आहे याची साक्ष हे पुस्तक देते. स्त्रीच्या बदलत्या जीवनाचा आढावा घेताना अनेक वेळा पुनरुक्तीचा दोष पत्करूनही त्यांनी तिचे जीवनचित्र डोळ्यासमोर उभे केले आहे. निरनिराळ्या वेळी लिहिलेल्या लेखांचे हे संकलन असल्यामुळेही कदाचित ही पुनरुक्ती आली असेल पण त्यातून जाणवते ती त्यांची आत्मीयता आणि तळमळ !

महायुद्धाने झालेल्या महागाईमुळे निर्माण झालेली स्त्रियांनी अर्थार्जन करण्याची निकड आणि त्यामुळे उत्पन्न झालेल्या अडचणी याचे कृष्णाबाईंनी फार मार्मिक वर्णन केले आहे. त्या म्हणतात त्याप्रमाणे, या स्त्रियांच्या अडचणी जाणून घेऊन त्यांच्या सोयी करणे हे शासन किंवा नगरपालिका यांना आपले कर्तव्य वाटत नाही आणि स्त्रियांच्या संस्थांनाही त्याची फारशी आस्था दिसत नाही. खरोखर स्त्री नोकरीकरिता बाहेर पडते तेव्हा तिला घरच्यांचा आणि दारच्यांचा सर्वांचाच त्रास सहन करावा लागतो. कौटुंबिक अडचणींचा ताण तिला पडत असतो आणि तरीही ती कुटुंबाचा तोल राखण्याचा आटोकाट प्रयत्न करीत असते. पण ही कसरत करीत असताना तिला एका गोष्टीबद्दल जे अपराधी वाटत असते त्या भावनेवर कृष्णाबाईंनी अचूक बोट ठेवले आहे. त्या म्हणतात, 'नोकरी करणाऱ्या बाईला मूल कोणातरी नोकराच्या स्वाधीन करून जावे लागते. तो जाणता व विश्वसनीय असेल अशी खात्री नाही. त्यामुळे तरुण मातेच्या मनात आपण मुलाचे बाबतीत आपले योग्य कर्तव्य बजावीत नाही अशी अपराधी भावना उत्पन्न होते. विवाहित स्त्रिया नोकरी करू लागल्या तर खरी व मोठी अडचण येते ती ही !' (पृ. ९३) या तिच्या भावनांची खरी कदर हवी ती स्त्रियांना-त्यांच्या संस्थांना. पण कृष्णाबाईंनी म्हटल्याप्रमाणे बहुतेक संस्थांना अशा प्रश्नांबद्दल जिव्हाळा नसतो, हेच खरे.

स्त्रियांना मिळणारी बाळंतपणाची रजा ही तिची खरी हक्काची रजा. पण कृष्णाबाई म्हणतात तशी ती नोकरीतील एक डोकेदुखी झाली आहे. आपण समानतेच्या गोष्टी सांगतो आणि याबाबतीत परत खास सवलती मागतो हे कितपत योग्य अशी शंका काही स्त्रियांनाही वाटू लागली आहे, असे दिसते. परंतु समाजाचे सातत्य राखण्याचे महत्त्वाचे कार्य स्त्री करीत असताना त्यासाठी लागणाऱ्या रजेचा बाऊ करणे किंवा ती सवलत समजणे आणि त्यासाठी कुरकूर करणे हे अदूरदृष्टीचे आणि स्वार्थीपणाचे द्योतक आहे. यात स्त्रीला सवलत देण्याचा प्रश्न नसतो की समानतेला तुडवण्याचा प्रश्न नसतो तर कृष्णाबाईंनी म्हटल्याप्रमाणे समाजाचे आधारस्तंभ निर्माण करताना तिला सर्वांनी सर्वपरीने सहाय्य करण्याचा प्रश्न असतो. त्यासाठी द्यावी लागणारी किंमत किंवा सोसावे लागणारे नुकसान सर्व समाजाने सोसणे आवश्यक असते. मला वाटते, आपल्या आजच्या संक्रमण काळात, मुले व घर म्हणजे स्त्रियांची जबाबदारी ही भावना अजून कायम असताना आणि राष्ट्रीय बेकारी वाढत असताना विचार झाला पाहिजे तो स्त्रियांना अर्धवेळ काम देण्याचा आणि त्याबरोबरच घरकामाला आज प्राप्त झालेला कनिष्ठपणा घालवण्याचा. यासाठी सामायिक घरकामांचा (कम्यून्स) विचार होणे जरूर आहे. शिवाय राष्ट्रीय बेकारी वाढत असताना नोकऱ्यांचे रेशनिंग होणेही आवश्यक आहे. आर्थिक स्वातंत्र्य आहे म्हणून एकेका घरात चार-पाच लोकांनी नोकऱ्या करणे आणि दुसऱ्या घरात सर्वांनीच बेकार राहणे हे राष्ट्रहिताला बाधक निश्चितच होईल. या सर्व परिस्थितीत स्वतःचे स्वत्व व स्वातंत्र्य न गमावता स्त्रीला कोणता पर्याय पत्करता येईल याचा विचार होणे आवश्यक आहे. पण हे कार्य करावयाचे कुणी ? महिला संस्थांनीच ते उचलणे योग्य नव्हे का ?

अर्थार्जन करणाऱ्या स्त्रियांच्या सामाजिक अडचणींबाबत विचार करताना कृष्णाबाईंनी मांडलेला महत्त्वाचा विचार म्हणजे तिच्याकडे बघण्याचा पुरुष समाजाचा दृष्टिकोन. त्या म्हणतात, 'स्त्रियांच्या बाबतीत नोकरी करताना किंवा घराबाहेर समाजात वागताना स्त्रीचे स्त्रीत्वच आड येते असे दिसते. कारण स्त्री ही एक उपभोग्य वस्तू हा समाजाचा दृष्टिकोन अजून बदललेला नाही.' (पृ. ९५) स्त्रियांवर झालेल्या बलात्काराच्या किंवा अत्याचाराच्या हकीकतीबाबत पुरुष समाजात चर्चा, चीड किंवा संताप फारसा हिरीरीने व्यक्त होत असतो असे दिसत नाही. बहुतेक या बाबतीत मुग्धताच असते. कारण कृष्णाबाई म्हणतात त्याप्रमाणे 'स्त्रीच्या बाबती-

तील कामुकता व तिच्यावर होणारी जबरदस्ती याकडे कायद्याने समाजाने लक्ष पुरवावे इतका समाजाला तो गुन्हाच वाटत नाही.' (पृ. ९५) यासाठी स्त्री-कर्मचाऱ्यांच्या जागेकरिता त्या त्या गावातील रहिवासी लोकांतूनच स्त्रिया पुढे याव्या हा कृष्णाबाईंनी सुचवलेला उपाय थोडा मामुली मलमाचाच वाटतो. शिवाय त्याला सरकारी बदली नियमांचा चाप लावणेही शक्य असते. परंतु 'अशा वागणुकीच्या प्रतिकारार्थ स्त्रियांनी निर्धार करून एकत्र संघटित व्हावयास पाहिजे' असे जे कृष्णाबाईंनी म्हटले आहे तो उपाय मला अधिक महत्त्वाचा आणि गंभीरपणे विचार करण्यासारखा वाटतो.

स्त्रीसमाजापुढे उभ्या असलेल्या अशा अडचणींचा विचार स्त्रीसंघटनांनी करावा असे कृष्णाबाईंनी ठिकठिकाणी मोघमपणे सुचवले आहे. (पृ. ९३, १०४, १६८, १७०, १७१). पण मला असे निश्चितपणे वाटते की, स्त्रियांच्या सामाजिक अडचणी सोडवण्याचा प्रयत्न करणे किंवा याहून अधिक म्हणजे समाजाला नवे वळण व नवा दृष्टिकोन देण्याचे कार्य करणे हे महिलांचे किंवा महिलासंस्थांचे एक महत्त्वाचे कार्य असावयास हवे. स्त्रीला बाहेरच्या क्षेत्रात काम करताना तिच्या स्त्रीत्वालाच त्रास होऊ लागला तर त्याची दखल कुणी घ्यायची, असा प्रश्न इतक्या स्त्रीसंस्था असूनही पडावा हे दुर्दैव. पुरुषाची गैरवर्तणूक खपवून घेतली जाणार नाही असा वचक समाजात या महिलामंडळांनी निर्माण केला पाहिजे. नोकरी करणाऱ्या स्त्रीला, आपल्या तक्रारींकडे महिलामंडळे लक्ष देतील, आपल्यामागे उभी राहतील असा विश्वास वाटला पाहिजे. पण त्याऐवजी 'बाईच तसली' असे शेरे मारणाऱ्यात स्त्रियांचाच भरणा अधिक दिसतो, आणि हे आपले एक सामाजिक कर्तव्य आहे याची जाणीवही बहुतेक स्त्रीसंघटनांना असत नाही. बलात्कार, केशवपन वगैरे अन्यायाबावत साधे ठराव करण्याबाबतही त्या उदासीन असतात. मग वचक आणि विश्वास निर्माण करणारी पावले उचलणे तर दूरच राहो. आणि मग अशा महिलामंडळांचे कार्य हा एक टिंगलीचाच विषय बनला तर त्यात नवल नाही.

कृष्णाबाईंनी सांगितलेली अनेक महत्त्वाची कामे स्त्रिया का करत नाहीत ? स्त्रियांच्या संस्थांना त्याबद्दल आस्था का नाही ? स्त्रिया महिलामंडळे का स्थापन करतात आणि तेथे का जातात याचा विचार केला तरच याचे उत्तर ताबडतोब सापडेल. मुलींचे लग्न झाल्यानंतर ती आपल्या घर, संसार आणि मुले या जगात इतकी गुरफटते की आपले व्यक्तिमत्त्व, व सामाजिक किंवा राष्ट्रीय जाणिवा यांचा या शिकलेल्या मुलीला पूर्ण विसर तरी पडतो किंवा तिला त्याची जाणीवच झालेली नसते. आजच्या विभक्त कुटुंबपद्धती, कुटुंबनियोजन वगैरे गोष्टींमुळे तिच्या वयाच्या ३५–४० वर्षांपर्यंत संसाराच्या जबाबदाऱ्या फारच कमी झालेल्या असतात. मुले मोठी होतात आणि त्यांच्या जगात आया उपऱ्या ठरतात. गतकालातील अशिक्षित स्त्री संसारपाश कमी झाल्यावर देवधर्म व लहान नातवंडे यांना गोष्टी सांगण्यात व खेळवण्यात आपला काळ आनंदाने व्यतित करीत असे. पण आजच्या आधुनिक स्त्रीला यात. रस नसतो, त्यावर तिची निष्ठाही नसते, आणि विभक्त व लहान कुटुंबात नातवंडे–पातवंडे यांचा पोरवडाही नसतो. अशा वेळी तिच्या जीवनात जी अस्वस्थता निर्माण होते, जी पोकळी येते ती भरून काढण्याचा मार्ग म्हणून ती महिला मंडळाकडे वळते. सहाजिकच, स्वतःचे मन रमवताना महिलामंडळाच्या उद्दिष्टांचा विचार ती परत घराच्या चौकटीतच करते आणि मग सामुदायिक कांदेनवमी, वटसावित्री, हरतालिका, भजने किंवा पत्ते खेळणे या गोष्टींना अवास्तव महत्त्व येते, आधुनिकत्वाचा शिक्का म्हणून किंवा देखावा म्हणून म्हणा हुंडा, जातिभेद किंवा सामाजिक सुधारणा वगैरे विषयांवर व्याख्यान ऐकते, पण प्रत्यक्ष तिच्या जीवनात त्याचा फारसा संबंध नसतो. आपल्या मुलाच्या लग्नात घ्यावयाचा हुंडा, मानपान वगैरे गोष्टींची स्वप्ने पहातच ती अशी व्याख्याने ऐकत असते आणि समाजकार्य केल्याच्या आणि वेळ सत्कारणी लागल्याच्या समाधानात घरी परतते. अशा बहुसंख्य स्त्रियांनी भरलेल्या महिला मंडळाच्या कार्यकर्त्या, कृष्णाबाई म्हणतात त्याप्रमाणे, कार्यनिष्ठ नसून 'सामाजिक मानसन्मानाची शिडी चढण्याकरिता त्या इतक्या आसुसलेल्या असतात की, शासनाकडून नेमल्या जाणाऱ्या निरनिराळ्या कमिट्यांवर आपले नाव कसे येईल, याकरिता त्यांची सारी धडपड चालू असते. त्याकरिता शासनाधिष्ठित पक्षाभोवती व त्यातील सत्ताधिशांभोवती त्यांचा सारखा पिंगा चालू असतो. त्यामुळे स्त्रियांच्या कोणत्याही प्रश्नांबाबत निर्भीडपणे, नागरिकत्वाच्या जबाबदार जाणिवेतून विचार करण्यापेक्षा मानसन्मानाची शिडी चढावयास हात देणाऱ्या सत्ताधिशांना न दुखावता, मर्जी राखण्याच्या दृष्टीने त्यांची पावले पडत असतात.' (पृ. १७६)

ध्येयनिष्ठतेने कार्य करणाऱ्या काही संस्थांचा व राजकीयदृष्ट्या जागृत महिलामंडळाचा उल्लेख कृष्णाबाईंनी याच संदर्भात केला आहे. (पृ. १७६) ध्येयवादी दृष्टिकोनातून कार्य करणाऱ्या संस्था थोड्या हे तर खरेच पण राजकीय दृष्टी असलेल्या महिला संघटना या तत्त्वापेक्षा पक्षप्रभुत्वानेच वेढलेल्या दिसतात आणि म्हणून लोकजागृतीपेक्षा व तत्त्वाला चिकटून रहाण्यापेक्षा पक्ष-बळकटीलाच त्या अधिक प्राधान्य देतात. अशी शंका आल्याशिवाय रहात नाही.

आजच्या पिढीच्या वस्तुस्थितीचे वर्णन करताना कृष्णाबाई म्हणतात, 'आमच्या नव्या पिढीच्या साऱ्या निष्ठा, जीवनमूल्ये नाहीशी होऊन स्वतःपलीकडे त्यांना जग नाही...गांधी युग लोपून स्वार्थ, लाचलुचपत, भ्रष्टाचार यांचा बुजबुजाट झाल्याने ध्येयशून्यतेची काळी छाया पसरल्याने मुले–मुली मोकाट स्वैर सुटल्यासारखी वावरत आहेत.' (पृ. १७७) परत माझ्यापुढे तोच प्रश्न येतो की अशी परिस्थिती येण्यास जबाबदार कोण ? एकदा एका कॉलेज-विद्यार्थ्याने मला विचारले होते की, 'तुम्ही आमची पिढी अशी आहे तशी आहे म्हणून आम्हाला दोष देता पण तुमच्या पिढीपुढे जसे निष्ठावान पुढाऱ्यांचे आदर्श होते तसे आमच्यापुढे कुठचे आदर्श आहेत ? आज लाच न घेणारा बावळट ठरतो. फॉरिन जिन्नस न वापरणारा रानटी ठरतो. वापरणाऱ्याची पत समाजात वाढते. मग तो माल स्मगलिंगचा असला तरी त्याला बट्टा लागत नाही. भ्रष्टाचार शिष्टाचार ठरतो. टेलिफोन वाजला तर मी घरी नाही असे सांग असे मुलाला शेजारीच बसून सांगते आणि

संध्याकाळी खरे बोलण्याबद्दल मुलाकडून श्लोक म्हणवून घेते. असे हे आमच्यापुढचे आदर्श ! हे आदर्श पुढे ठेवणाऱ्या तुमच्या पिढीला आम्हाला 'बोल लावण्याचा काय अधिकार ?' 'दोरा तुटलेला पतंग' हा कृष्णाबाईंचा लेख वाचताना हा त्यांचा प्रश्न सतत मनात घोळत होता.

अवास्तव महत्त्व आलेल्या पैशाने सर्व नीतिमूल्ये आणि दानत आज पायदळी तुडवली आहेत. अर्थार्जन करणाऱ्या स्त्रियांची संख्या वाढत आहे. त्यासाठी त्या पदवीधर होत आहेत. ही पदवी त्यांनी ज्ञान मिळवण्यासाठी किंवा संस्कृती आणि व्यक्तिमत्व समृद्ध करण्यासाठीही घेतलेली नसते, की आर्थिक स्वातंत्र्याच्या कल्पनेनेही घेतलेली नसते. फक्त पैसा मिळवण्याचे साधन येवढीच त्यामागची भावना असते. स्वातंत्र्यापूर्वी ज्या स्त्रिया डॉक्टर किंवा शिक्षिका होत त्या पैशापेक्षा समाजसेवेचा व्यवसाय म्हणून त्याकडे पहात होत्या. आज ही भावना बहुतेक सर्वच व्यवसायातून लोपली आहे. म्हणून कृष्णाबाई म्हणतात त्याप्रमाणे 'नोकरी किंवा व्यवसायाकडे पहाण्याची स्त्रियांची वृत्ती बरीच समजदार व व्यवहारी होत आहे. आणि याचे मुख्य कारण म्हणजे आपले अर्थार्जन हा एक तात्पुरता व्यवसाय ही दृष्टीच बदलत आहे.' (पृ. ४३) स्त्रीच्या आंतरिक परिवर्तनाची ही खरी खूण मानायची का ? त्या म्हणतात, 'मुख्य बदल म्हणजे आताची तरूण स्त्री व्यवसाय म्हणजे जीवन-व्यवसाय मानीत असली, तरी आपल्याकडील सुशिक्षित बायकांच्या पहिल्या दुसऱ्या पिढीप्रमाणे ती सर्व वैयक्तिक सुखांना मूठमाती देऊन तापसीचे जिणे काढू इच्छित नाही.. व्यवसाय ही तिची पुरुषाप्रमाणेच एक मानसिक म्हणा वा बौद्धिक म्हणा गरज झालेली आहे....(पृ. ४३–४४) स्त्री खरोखरच या गरजेपोटी अर्थार्जन करते का ? तसं असतं तर मला वाटतं त्या विद्यार्थ्याला वर विचारलेला प्रश्न विचारायची संधी मिळाली नसती. आणि कृष्णाबाईंनी म्हटल्याप्रमाणे 'काळाच्या लोंढ्यात आमची नैतिकमूल्ये, आमची दानत, सारी झंझावातात सापडलेल्या पानाप्रमाणे' (पृ. ३१) उधळून गेली नसती. आंतरिक विकास झालेल्या स्त्रीने पैसा हेच अंतिम मूल्य मानले असते का ? आजची मध्यमवर्गीय स्त्री धड जुनी नीतिमूल्येही मानत नाही आणि काळाने आलेली नवी नीतीमूल्येही आत्मसात करीत नाही. बौद्धिक गरजेसाठी व्यवसाय करणाऱ्या स्त्रीला आजच्या संक्रमणाच्या काळातील जबाबदारीची जाणीव अधिक तीव्रतेने असायला हवी. पण तशी ती फारच थोड्या स्त्रियांत असलेली आढळते. आजची मध्यमवर्गीय शिकलेली स्त्री स्वतःच्या कुटुंबापुरते पहाणारी सुस्त स्त्री बनलेली आहे. आजच्या स्त्रीजीवनाबद्दल खरं म्हणजे कृष्णाबाईही साशंकच आहेत. त्या म्हणतात, 'सामाजिक जाणिवेने, ध्येयनिष्ठा वगैरे जीवितमूल्यांनी भारलेल्या स्त्रिया एकंदर स्त्रियांच्या संख्येच्या मानाने थोड्याच दिसतात, बाकी सर्वत्र या निष्ठांचा, चैतन्याचा अभावच दिसतो. स्वातंत्र्यानंतर हा बदल कशामुळे झाला ? पूर्वीच्या त्या निःस्वार्थी निष्ठा व जीवनमूल्ये कोठे गेली ?' (पृ. १७६) आणि शेवटी सुशिक्षित स्त्री गतीशील झाली नाही तर होणाऱ्या अनर्थाचा इशाराही त्यांनी दिला आहे. (पृ. १७७)

विवाहपद्धती आणि विवाहसंस्था या अस्तित्वात का आल्या व कालमानाप्रमाणे त्यांच्यात कसकसे बदल होत गेले हे कृष्णाबाईंनी सुस्पष्ट केले आहे. विवाहसंस्थेच्या स्वरूपात नेहमीच बदल होत रहाणार, हे मान्य करूनही, जोपर्यंत आल्डस् हक्सलेच्या 'दि ब्रेव्ह न्यू वर्ल्ड' सारखे समाजजीवन प्रस्थापित होत नाही आणि जोपर्यंत अपत्यसंगोपन, कुटुंबभावनेत येणारा जिव्हाळा, विश्वास व आपुलकी यांची वैयक्तिक जीवनातून हकालपट्टी झाली नाही तोपर्यंत विवाहासारख्या सामाजिक बंधनाची गरज राहील, असे त्यांना वाटते. हे कृष्णाबाईंचे मत मानले तरी लोकशाहीशी बांधिलकी सांगणारी समाजव्यवस्था आणि पुरुषप्रधान कुटुंबपद्धती यांची सुसंगती कशी साधणार हा प्रश्न रहातोच. त्यासाठी लोकशाहीप्रधान समाजात ही कुटुंबपद्धती आमूलाग्रच बदलावी लागेल. अपत्यसंगोपन हा स्त्रियांचाच प्रांत, ही कल्पना चुकीची आहे, असे अनेक पारंपारिक संदर्भ बदलावे लागतील हे निश्चित. जोपर्यंत हे आवश्यक बदल होत नाहीत तोपर्यंत विवाह पद्धतीतील दोषही कायम रहाणार. मग लग्नाला उभी असलेली आजची शिकलेली मुलगी बिनदिक्कत अशी अपेक्षा करते की, वरपक्षाने मागितलेला पैसा तिच्या भावी सुखासाठी तिच्या आईवडिलांनी दिला पाहिजे. (दोन तीन वर्षापूर्वी जयश्री नरगुंदकर यानी केलेल्या पहाणीतील तरूण मुलींचे विचार) समान दर्जा, समान हक्क या मूल्यांची जोपासना मुलीच्या लहानपणापासून करण्यापेक्षा तिला तिच्या दुय्यम दर्जाचीच जाणीव आई सतत करून देत असते. याच संस्कारात ती लहानाची मोठी होते. मग वरपक्षाने हुंडा मागितला तर तिने बंड करून उठले पाहिजे, अशी अपेक्षा करण्यात काय अर्थ आहे ? आणि लहानपणापासून तू मुलगा आहेस, मुलीपेक्षा श्रेष्ठ आहेस अशी भावना करून दिलेल्या तरूणाला पत्नीला सहचरी मान असे पोकळ शब्द शिकवण्याचा कितीसा उपयोग होणार आहे ? कायदा करून सुद्धा शेवटी ह्या गोष्टी कुठल्या ना कुठल्यातरी स्वरूपात कायमच रहाणार. खरं म्हणजे मुळातच ही घडण बदलण्याची आवश्यकता आहे. हे होत नाही तोपर्यंत अशी अस्मिता जागृत असलेली मुलेमुली विरळाच असणार. □


पुरंदऱ्यांचा सरकारवाडा

लेखक
ब. मो. पुरंदरे

मूल्य : सात रुपये
राजहंस प्रकाशन, पुणे ३०

# समाजवादी क्रांतीच्या वाटेतील खाचखळगे : पृष्ठ १४ वरून

सत्तासंपादन व सत्तासंकलीकरण यासाठी पक्षाची ही संघटना व कार्यपद्धती उपयुक्त ठरली तरी लोकशाही मूल्यांच्या आधारावांचून तिचे हे कार्य फारच अल्पकाळ ती करू शकली. तिच्या निरंकुशतेचे पर्यवसान लवकरच लोकशाही केंद्रिततेचा बुरखा अखंड मिरवणाऱ्या अल्पजनसत्तावादी केंद्रिततेत झाले. निर्णयप्रक्रिया केवळ कामगार-वर्गापासूनच नव्हे तर पक्षसभासदांपासूनही दुरावली. मूठभरांच्या सुज्ञपणावर भिस्त ठेवून 'सामान्य' सभासदांनी केवळ त्यांचे अंधानुकरण करावे व प्रेषण माध्यम म्हणून निमूटपणे काम करावे; राज्य (=समाज) केवळ पक्षश्रेष्ठींचे निर्णय राबविण्यासाठी क्रियान्वित असावे; यातूनच राज्यशाही (पॉलिटॉक्रसी)-किंवा खरे तर पक्षशाही (पार्टोक्रसी)-स्थापन होणे अटळ ठरले.

क्रांतिकारी संघटना काही मानवतावादी कार्यक्रमाच्या परिपूर्तीसाठी असतात. त्या केवळ विशिष्ट ऐतिहासिक उद्दिष्टांशी परिबद्ध असून भागत नाही तर त्यांना आपली रचना व कार्य ह्या उद्दिष्टांबरहुकूम बदलावी लागतात हे पार विसरून स्टॅलिनवाद्यांनी नेमके उलटे केले. त्यांनी पक्षाला एक प्रकारच्या दुर्ज्ञेय व आध्यात्मिक वस्तूचे महात्म्य मिळवून दिले. असंख्य अडचणींना तोंड देऊन सत्ता मिळवावी लागणे; आणि मिळालेल्या सत्तास्थानावर दीर्घ काळ आरूढ होऊन राहता येणे-या दोन गोष्टी संघटनेला स्वयमेव साध्यरूप देण्यास नेहमीच कारणीभूत ठरत असतात. अशा वेळी नेहमीच क्रांतिकारी उत्साहाची जागा उत्क्रांतिवादी संधिसाधुपणा घेत असतो. आदर्शवादावर हताश भौतिक व्यवहारवाद कुरघोडी करतो. सर्वव्यापी पक्षाचा एकाधिकार, वर्चस्व व सामाजिक रचना या सगळ्यांमुळे राज्यवादास पोषक परिस्थिती निर्माण होते.

लोकशाही केंद्रिततेचे दोन मुख्य अर्थ आहेत. एक, शक्य तितक्या प्रत्यक्षपणे सभासदांनी पक्षाच्या धोरण व निर्णय यांच्या निर्मितीत सहभागी व्हावे आणि दुसरा, अल्पमतवाल्यांनी बहुमतवाल्यांचे निर्णय मानावेत. यापैकी साम्यवादी पक्षाने फक्त दुसऱ्या अर्थावर भर देऊन पहिला पारच झुगारून दिला. एवढेच नाही तर एकदा निर्णय झाल्यानंतरसुद्धा चर्चा व टीका करण्यावर बंदी घातली. लोकशाही केंद्रितता म्हणजे कृतीप्रमाणेच मतांमध्येही एकवाक्यता असणे असा अर्थ केला. अल्पमतवाले केवळ विरोधासाठी विरोध करतात. याखेरीज त्यांच्या विरोधाला कुठलीही वस्तुनिष्ठ व खरीखुरी प्रामाणिक कारणे संभवतच नाहीत हे ठाम गृहीत धरले. याउलट लोकशाही बहुलतेमध्ये (प्लुरॅलिझम्) अल्पमतवाल्यांना जरी बहुमतवाल्यांचा निर्णय कृतीत मानावाच लागत असला तरी स्वतःची मते धारण व आविष्कृत करण्याचा, आपल्या मतांचे श्रेष्ठत्व पटवून देण्याचा त्यांचा हक्क काढून घेतला जात नाही. तिथे निर्णयकर्त्यांचा व्यावसायिक वर्ग असणेही संभवत नाही. सर्वसत्तामान राज्ययंत्राऐवजी सामाजिक स्वयंशासन असते.

तसा या तथाकथित पुरोगामी व समाजवादी क्रांतिकारकांचाही लोकशाही बहुलतेवर विश्वास असतो पण तो केवळ प्रतिगाम्यांशी झुंजत असेपावेतोच टिकतो. आपल्यापेक्षा अधिक पुरोगाम्याशी वागताना मात्र ते स्वतःच प्रतिगामी होऊन जातात. एकाश्मतावादातून लोकशाही निर्माण होऊ शकते ही त्यांची धारणाच भ्रममूलक असते, कारण एकाश्मतावाद नेहमीच नेत्यांचा एकाधिकार गृहीत धरीत असतो. नेते म्हणतील तोच तिथे बहुमताचा कौल ठरतो. साहजिकच अल्पमतवाल्यांना त्यांचे उपरोल्लेखित हक्क देण्याची राज्यकर्त्यांना गरज भासत नाही. किंबहुना आपला निर्णय चूक आहे असे कोणी म्हणू नये म्हणून खुली चर्चाच ते अवैध ठरवतात. त्यामुळे पक्षांतर्गत खरे लोकमत व्यक्त होण्याची शक्यताच बाद ठरते. अशा तऱ्हेने मूठभर नेते 'बहुमता'ची भूमिका पार पाडतात आणि लोकशाही केंद्रिततेला प्राणभूत असलेले खरे बहुमत दडपून टाकतात. अल्पमतवाल्यांना आविष्कार स्वातंत्र्य दिल्यास पक्षविघटन होईल अशी त्यांना भीती वाटते. ती अर्थातच निराधार आहे. कारण टिकाऊ पक्षैक्य टीकेवर व चर्चेवर लादलेल्या कृत्रिम बंधनापेक्षा विचारांच्या लोकशाही संघर्षातून व मंथनातूनच अधिक शक्य होत असते. कृत्रिम बंधनांनी एकवाक्यतेचा व एकाश्मतेचा केवळ देखावा निर्माण केला जाऊ शकतो. प्रत्यक्षात मात्र हे दडपलेले मतभेद गटबाजीला वाव देतात. समोरासमोर विरोध करण्याऐवजी आपल्याला न रुचलेल्या ध्येय-धोरणांच्या अमलबजावणीला सर्वतोपरी खीळ घालण्याचे प्रयत्न पक्षातील असंतुष्ट गटाकरवी केले जातात आणि पक्षस्थैर्याच्या दृष्टीने हा धोका अधिक गंभीर ठरू शकतो. मतभेद खुलेपणी मांडण्याची संधी मिळाली तर अल्पमतवाल्यांच्या वागण्यातला हा दुटप्पीपणा तरी कमी होऊ शकतो. निरंतर क्रांतीसाठी एकलता व बहुलता, शिस्त व स्वातंत्र्य यांचा समुचित संतुलित समन्वय आवश्यक असतो याचे भानच या पक्षांना राहात नाही.

पक्षाच्या एकाश्म स्वरूपामुळे विचारांना कुंठितपणा येतो. प्रसंगी पक्ष पूर्णतः बुद्धिवादविरोधी होऊन जातो. बुद्धिवंतांबद्दल असे पक्ष सर्वसामान्यतः संशयी असतातच. पक्षामध्ये प्रत्ययास येणारे मतभेद या बुद्धिवंतांच्या कुप्रभावामुळे आहेत अशी त्यांची ठाम समजूत असते. एवढेच नव्हे तर प्रत्येक राजकीय चळवळीचे व संघर्षाचे मूळही ते या कुप्रभावातच शोधतात. गंभीर सामाजिक-आर्थिक प्रश्नांमधूनही असे प्रसंग उभे राहू शकतात हे त्यांच्या ध्यानीमानसीही नसते. म्हणूनच त्या प्रश्नांना मुळापासून निपटण्यासाठी प्रयत्न करण्याऐवजी बुद्धिवंतांना झोडपण्यातच त्यांना कृतार्थता वाटते. आपल्या अनेक महागड्या व अप्रस्तुत उपक्रमांच्या खेळखंडोबाचे खापर ते या विचारांच्या विश्वात वावरणाऱ्या व प्रयोग करणाऱ्यांवर फोडून मोकळे होऊ पाहतात. पक्षनेत्याकडे वैचारिक-सैद्धांतिक मक्तेदारी सोपविल्यानंतर इतरांनी केवळ साचेबंद पोपटपंची करावी अशी इथली रीत असते. याचे अत्यंत भयावह परिणाम विचारांच्या क्षेत्रात घडून येतात. नेत्यांच्या विचारांना आव्हानित करणे हा राजद्रोह ठरून तो करणारांना नेत्यांच्या रोषास, औद्धत्यास-प्रसंगी क्रौर्यासही-बळी पडावे लागते. सदविवेक आणि पक्षनिष्ठा यांच्यात प्रामाणिक संघर्ष येऊ शकतो, हेच या पक्षनेत्यांना मान्य नसते. नेता सोडल्यास अन्य कुणीच बिनचूक असू शकत नाही. नेत्याच्या व्यक्ति-

निष्ठ निर्णयांना इतरांनी वस्तुनिष्ठेचा मुलामा देण्याचे प्रयत्न आपापल्यापरीने करायचे असतात. नेत्यांच्या शब्दावाचून अन्य कुणाच्याच शब्दाला प्रामाण्य असत नाही. एवढेच नाही तर नेता जे सांगेल तेच त्याने सांगण्यापूर्वी सांगणारे 'सामान्य' सभासद बेजबाबदार व शिस्तभंगकर्ते ठरतात. म्हणून पक्षातील खालच्या पातळ्या त्या फंदात मुळीच न पडता केवळ मूक आज्ञापालन करणे, तपशील आखीत बसणे, नेत्यांच्या विचारांचे-विधानांचे प्रतिध्वनी घुमविण्यातच आपले 'वैचारिक' व्यक्तिमत्त्व राबविणे आणि आखून दिलेल्या चौकटीत बसतील तेवढीच मतांतरे मांडणे–एवढेच करीत राहतात. अशा पक्षांचे नेतृत्व महत्त्वाकांक्षी असले तरी अपवादानेच प्रज्ञावंत व ज्ञानी असते. स्वाभाविकच त्याची तात्त्विक–वैचारिक पातळी पार खालची असते. हे नेते अधूनमधून लोकशाही वाटतील असे काही जाहीरनामे (उदा. मतस्वातंत्र्य, टीकास्वातंत्र्य, मुक्त व निर्भय वृत्तपत्रे, समता वगैरे) काढतात, पण त्याचबरोबर त्यांचा अर्थ शब्दशः घेऊन त्यानुसार वागणारांना ते शिक्षा ठोठावतात.

एखादा नवा विचार कितपत सत्य आहे हे त्याच्या आशयापेक्षा तो ज्याने मांडला त्याच्या पक्ष-उतरंडीतील स्थानावरून ठरत असते. 'काय बोलला?' या पेक्षा 'कोण, कुठे, केव्हा व कुणाखातर' बोलला हे अधिक महत्त्वाचे ठरते. **सत्याच्या अधिसत्तेची** जागा **अधिसत्तेचे सत्य** अडवून बसते. खरोखर जर पक्षाला आपली 'सामूहिक विचारवंता'ची भूमिका पार पाडायची असेल तर या एकाश्मतेच्या पछाडलेपणातून त्याने स्वतःची सोडवणूक केली पाहिजे. कोणत्याही गंभीर तत्त्वचिंतनाला जी अंतर्गत सुसंगती असावी लागते ती, एकीकडे चर्चेचे व समीक्षणाचे आवाहन करीत असताना त्याच वेळी विचारवंतांपैकी जे सर्वाधिक प्रामाणिक व निर्भय असतील त्यांनाच अपात्र ठरवायचे वा त्यांच्यावर राजकीय हल्ला चढवायचा अशा दुटप्पी वर्तनातून कधीच येऊ शकत नाही.

अशा वैचारिक साचेबंदपणामुळे, सामाजिक हितास्तव प्रयत्न करणाऱ्या क्रांतिकारी चळवळीतील सच्ची समूहभावना नष्ट होते; आणि आपला पृथक् स्वार्थ लपविण्याचे अलंकारिक आवरण म्हणून सामूहिकतेचे स्तोम माजविले जाते. नागरिकांचे निर्व्यक्तीकरण (डी–पर्सनलायझेशन) केले जाते. सत्ताधारक गटांबद्दल अमर्याद भक्तिभाव आणि संपूर्ण आत्मविसर्जन हे सर्वश्रेष्ठ गुण ठरतात आणि श्रेष्ठींवरची श्रद्धा हरवून बसणे यापरता दुसरा घोर अपराध नसतो. परस्परांविषयी अविश्वास, हेरगिरी, विश्वासघात, फसवाफसवी, कट-कारस्थाने, अपमान अधिक्षेप व बदनामी या सगळ्या गोष्टी वर्गीय एकसंधता टिकविण्यासाठी आचरणीय ठरतात. सामाजिक प्रतिष्ठा मिळविण्यासाठी व प्रगतीच्या शिडीवर भरभर चढण्यासाठी प्रसंगी अंगच्या कसबापेक्षाही राजकीय निष्ठा अधिक महत्त्वाच्या ठरतात.

सत्ताधारी वर्ग जसजसा अधिकाधिक बलशाली होत जातो तसतशी त्याची व्यावर्तक वृत्ती, अतिरेकी आत्मविश्वास व इतर सर्वांबद्दल संशयीपणा आणि भिन्न मतप्रवाहांबद्दल असहिष्णुता या गोष्टी वाढत जातात. थोडक्यात एकाधिकार वृत्ती उत्तरोत्तर फोफावत जाते. पक्षातल्या दुफळ्या लपविण्याचे आटोकाट प्रयत्न केले जातात. क्रांतिकारी शिस्तीच्या नावाने उतरंडीला काटेकोरपणे जपण्यात येते, त्यामागे कोणत्याही मानवतावादी ध्येयांची परिपूर्ती हा उद्देश नसून सत्तालालसा व आत्मोन्नती आणि वर्गीय हितसंबंध जोपासणे हा स्वार्थच फक्त असतो. उतरंडीतले आपले स्थान टिकविण्यासाठी व उंचावण्यासाठी मान, आदर्श, सत्य, नीती या सगळ्यांना फाटा देण्याची तयारी अशा व्यवस्थेत राहणाऱ्या माणसाची आपसुकच होते. कारण सामाजिक प्रतिष्ठा, सत्ता, ऐश्वर्य, व्यक्तिगत प्रगती हे सर्व प्राप्त करण्याचा ही उतरंड हाच एकमेव मार्ग असतो. दुय्यम भूमिकांसवे येणाऱ्या सुरक्षितपणाचा एकदा सराव झाला की मग तो सुरक्षितपणाच सर्वश्रेष्ठ वाटू लागतो. उपक्रमशीलता, स्वातंत्र्य व जबाबदारीची भावना यांचा ऱ्हास होणे पुढे क्रमप्राप्तच ठरते.

दीर्घ उतरंडीमुळे संपर्क व माहितीच्या प्रवाहांनाही धोका निर्माण होऊ शकतो. वरिष्ठांना नाखूष करून मनमानी शिक्षा ओढवून घेण्यापेक्षा त्यांना रुचेल अशीच माहिती वर पाठविण्याची प्रवृत्ती बळावते. होयबांची भाऊगर्दी श्रेष्ठींभोवती जमते. श्रेष्ठींच्या कानी केवळ स्तुतिस्तोत्रे व जयघोष पडत राहिल्यामुळे त्यांनाही स्वतःच्या सर्वशक्तिमानतेचा व अचूकतेचा अहंगंड ग्रासू लागतो. प्रत्येक पायरीवर पायरीनुरूप व्यक्तिपूजा माजत जाते. वरिष्ठ आपल्या कनिष्ठांशी बेपर्वाईचे व विवेकशून्य असे वर्तन करतात. खालच्या पातळीवरील 'सामान्य' सभासदांनी व जनतेने बिनतक्रार आचरणात आणण्यासाठी ही पद्धती विशिष्ट धाटणीच्या 'धर्मा'ला जन्म देत असते. वेगवेगळे पंथ, त्यांचे पुरस्कर्ते व कर्मकांड, अनावर हर्षोन्माद व परमानंद आणि जिवंतपणी उभारलेली स्मारके वगैरे या धर्माची लक्षणे असतात. नागरिकांच्या हक्कांपेक्षा कर्तव्यांवरच त्याचा भर असतो. प्रत्येक खालच्या पातळीला तिच्या वरच्या पातळीशी जुळवून घ्यावे लागते. सदैव जुळवून घेणारी (कन्फॉर्मिस्ट) व्यक्तिमत्त्वे प्रयत्नपूर्वक घडविली जातात. ज्या व्यक्तीला 'अधिकृत' (ऑफिशियल) अशा कोणत्याही गोष्टीबद्दल यत्किंचितही संशय नसतो ती स्थिर समजली जाते. श्रेष्ठी सर्वदा व सर्वथा बिनचूक असणार त्यामुळे त्यांच्याशी मतभेद करणे म्हणजे त्यांची नालस्ती वा चुगली किंवा थेट राजकीय गुन्हा करण्यासारखेच होय. त्यांना गैरसोयीचे प्रश्नही कोणी विचारू नयेत. विचारल्यास विचारण्याच्या निष्ठा संशयास्पद ठरतात. व्यक्तिस्वातंत्र्याचे हक्क राज्यसत्तेविरुद्ध कुणीच सांगू शकत नाही. राज्यकर्त्यांनी आखून दिलेल्या लक्ष्मणरेषा जे ओलांडतील ते विध्वंसक किंवा शत्रुपक्षाचे हस्तक ठरतात. खऱ्या व शाबीत गुन्हेगारांपेक्षाही अशा 'गुन्हेगारीं'ना अधिक कडकशिक्षा ठोठावल्या जातात. वैचारिक व राजकीय नामर्दांना अशी परिस्थिती एक पर्वणीच असते कारण प्राप्त परिस्थितीशी जुळवून घेण्याचे अगाध कौशल्य त्यांना साध्य झालेले असते. त्यांची प्रचंड वेगाने अशा वेळी भरभराट होते.

पक्षाचे जीवन असे मक्तेदारी स्वरूपाचे झाले म्हणजे 'सामान्य' सभासद नैतिक व राजकीयदृष्टया बेजबाबदार होणे आणि त्यांनी पक्षालाच अंतिम सत्याचे वाहन मानून चालणे अटळ ठरते. 'पक्षाची सेवा बजावणे' नेहमीच धोक्याचे असते कारण 'सेवा' करायची ती उद्दिष्टांची हवी. ती उद्दिष्टे निर्धारित करणे, त्यांना मूर्तरूप देणे व पक्षधोरणे नियंत्रित करणे या गोष्टींचा या सेवेत समावेश झाला पाहिजे. नागरिकांचे मुक्त स्वायत्त व प्रतिष्ठित व्यक्तिमत्त्व निर्माण

करणे हे उद्दिष्ट त्यात आवर्जून असले पाहिजे; कारण दुय्यम, दबलेली, दडपलेली व परावलंबी माणसे उद्दिष्टप्राप्तीसाठी झुंजण्याचे केवळ नाटक करू शकतात. खरा लढा देणे त्यांच्या कुवतीबाहेरचे असते.

### अपक्व व परिपक्व साम्यवाद

आपल्या मुक्तीसाठी व पुनवर्सनासाठी माणसाने निर्माण केलेल्या साम्यवादाचे पर्यवसान असे नेमक्या विरुद्ध टोकाच्या परिस्थितीत होण्याचे कारण समजावून घ्यायचे झाल्यास परिपक्व व अपक्व साम्यवादात फरक केला पाहिजे. साम्यवाद ही मानवी विकासाची सुरुवात आहे, सांगता नव्हे. साम्यवाद अपक्व असला म्हणजे सामाजिक समतेच्या तत्त्वाला सर्वश्रेष्ठ ठरवून व्यक्ति-विशिष्टत्वाच्या (इंडिव्हिज्युॲलिटी) तत्त्वाला पार गौणत्व दिले जाते. परिपक्व साम्यवादात या दोन्ही तत्त्वांचे संतुलन अभिप्रेत असते. कोणत्याही एकाचा अतिरेक अवांछनीय असतो. परिपक्व साम्यवाद म्हणजे अपक्व साम्यवादाचा संपूर्ण त्याग नव्हे. तर त्यांच्यातील संबंध हे 'सातत्य व परिवर्तन' अशा स्वरूपाचे असतात. क्रांतिकारकांची मती जेव्हा कुंठित होते तेव्हा त्यांच्या लक्षात हे संबंध येत नाहीत. त्यांना फक्त दोनच वाटा दिसतात, एक अपक्व साम्यवादाची आणि दुसरी साम्यवादाला पूर्णतः सोडून दूर जाणारी. या दोन वाटांच्या मधून जाणारी परिपक्व साम्यवादाची वाट त्यांना दिसतच नाही. आजचा खरा प्रश्न हा परिपक्व साम्यवाद—म्हणजेच आधुनिक-अत्युत्पादक व खुला समाजवादी समाज—निर्माण करीत असतानाच समाजवादाचा नैतिक-मानवतावादी गाभा कसा विकसित करता येईल हा आहे.

आणि या प्रश्नाचे एकमेव उत्तर सामाजिक स्वयंशासन हे आहे. याचा अर्थ राज्यमालमत्तेच्या जागी सामाजिक मालमत्ता व राज्यव्यवस्थापनाच्या जागी सामाजिक व्यवस्थापन येणे, मुक्त उत्पादकांच्या संघटनांनी सामायिक व योजनेनुसार कार्य करणे, कामगारवर्गाच्या ठायी स्वयंव्यवस्थापनाची ताकद निर्माण करीत असतानाच त्याला व्यापक आणि एकात्म सामाजिक स्वयंशासनाची जोड देणे असा होतो. मार्क्सला हेच अभिप्रेत होते. तो केंद्रिभूत राज्यसत्तेचा विरोधक होता कारण समाजापासून दुरावून त्याचा अधिपती होण्याची व स्वतःच्या हितसंबंधांना इतर सर्व हितसंबंधांपेक्षा प्राधान्य देण्याची अंगभूत प्रवृत्ती राज्यसंस्थेच्या ठिकाणी असल्याची त्याला पूर्ण जाणीव होती. राज्याची मालकी कोणत्याच अर्थाने अगदी अप्रत्यक्षपणेसुद्धा सामाजिक मालकी ठरू शकत नाही. ती फार तर एक संक्रमणावस्था होऊ शकते. तिचे अंतिम पर्यवसान एकतर राज्यवादात किंवा स्वयंशासित समाजात होऊ शकते. ती संक्रमणावस्था आहे याचीच जर जाणीव क्रांतिकारी चळवळीस नसली तर राज्यवादात पर्यवसान होण्याचीच शक्यता दांडगी असते.

समाजवाद ही एक अशी मानवतावादी संकल्पना आहे. जिला साकार करताना अनंत वेळा पीछेहाट झाली तरी फिरून ती नव्या जोमाने पुनःपुनः उफाळून वर येते, येत राहिली आहे. आजच्या नव्या डाव्या पिढीला सुदैवाने स्टॅलिनवादाच्या भ्रमाने पछाडलेले नाही. समाजवाद कोणत्याच एका देशातील वास्तवाच्या चौकटीत बंदिस्त करायला व त्याला आदर्श मानून चालायला ती तयार नाही. स्टॅलिनवादाने गाडून टाकलेले समाजवादी आदर्शच तिला आजही आकर्षून घेतात व प्रेरित करतात. साम्यवादी व सामाजिक लोकशाहीवादी यांच्यातील फरकाप्रमाणेच क्रांतिकारी व संधिसाधू असे दोन ठळक वर्ग आजच्या डाव्या चळवळीत पडू लागले आहेत. डाव्या अंगाच्या या तरुण पिढीने नव्यानव्या संघटना उभारण्याऐवजी डाव्या पक्षामध्ये शिरून त्यांना क्रांतिकारी करण्याची खरी गरज आहे. कारण जुन्या डाव्यांनी आज एकतर भांडवलदारीशी जुळवून घेतले आहे अथवा राज्यवादी प्रतिगामी राज्यकर्त्यांची भूमिका निभावण्यात कृतार्थता मानली आहे. नव्या डाव्या शक्तींनी प्रसंगी तातडीची व उत्स्फूर्त संघटनक्षमता दाखविली असली तरी दुर्दैवाने त्यांना अजून टिकाऊ संघटनांचे महत्त्व पुरते पटलेले दिसत नाही. जुन्या डाव्या शक्तींना जसे अश्मीभवनाच्या (पेट्रिफिकेशन) व्याधीने पछाडलेले होते तसे नव्या डाव्यांना क्रांतिकारी शक्तींना स्वयंस्फूर्तेच्या अंधश्रद्धेची बाधा होण्याचा धोका संभवतो.

आर्थिक लोकशाहीच्या प्रतिष्ठापनेचे निमित्त पुढे करून स्टॅलिनवाद्यांनी राजकीय लोकशाहीचे विडंबन केले व वरून त्याची भलावणही केली. त्यांच्या मते, राजकीय लोकशाही हा बूर्ज्वा लोकशाही क्रांतीचा वारसा आहे. परंतु आज हे सिद्ध झाले आहे की, कामगारवर्ग व श्रमणारी सामान्य जनता राजकीय लोकशाहीखेरीज आर्थिक लोकशाही कधीच निर्माण करू शकत नाही. समाजवादाचे पहिले महत्त्वाचे ऐतिहासिक कार्य लोकशाहीला समाजात सार्वत्रिक करण्याचे (युनिव्हर्सलाइज) असते आणि दुसरे, तिला जास्तीत जास्त प्रत्यक्ष करण्याचे असते. निर्णयनिर्मितीचे अधिकाधिक प्रत्यक्ष मार्ग उपलब्ध असणे आणि असे लोकशाहीचे सार्वत्रीकरण होणे या प्रक्रिया परस्परपूरक असतात. खऱ्या समाजवादाद्वारे लोकशाहीचे उत्थान झाले पाहिजे. केवळ सामाजिक स्वयंशासनच हे करू शकते. मूठभरांची राजवट जनतेच्या स्वयंशासनापेक्षा अधिक कार्यक्षम असते हा स्टॅलिनवाद्यांचा दावाही फारसा वस्तुस्थितीला धरून नाही. कारण खऱ्या सामाजिक हितसंबंधांची पूर्तता म्हणजे जर कार्यक्षमता असेल तर सामाजिक स्वयंशासन हाच प्रकार सर्वाधिक कार्यक्षम ठरेल.

बूर्ज्वा उदारमतवादी लोकशाहीच्या काही मर्यादा उघडच आहेत. ती केवळ राजकीय क्षेत्रापुरती सीमित असते, सामाजिक गटांच्या बाबतीत (विशेषतः आर्थिक क्षेत्रात) ती मुळीच लोकशाही नसते कारण त्यांना ती स्वयंशासन सपशेल नाकारते. तीत अनेक पक्ष असले आणि राजकारणामध्ये खुली स्पर्धा असली तरी पक्षीय केंद्रीकरणामुळे सभासदांना मतदारांपेक्षा पक्षाशी एकनिष्ठ राहणे अधिक महत्त्वाचे वाटते. तळपातळीवरून शासनावर नियंत्रण नसल्यामुळे, त्याची जागा घेण्यासाठी या पद्धतीतील डाव्या शक्ती संसदबाह्य प्रतिकाराचा प्रयत्न करतात. पण लोकशाहीचा हा विस्तार इथे लोकशाही विरोधी, किंवा 'रानटी' वा 'रस्त्यावरची लोकशाही' ठरवून दडपला जातो. बूर्ज्वा वर्गाच्या आकाराच्या मानाने त्याची सत्ता प्रचंड मोठी असते. भांडवलदार = शासन असे समीकरण होऊन जाते, कारण भांडवलावाचून राजकीय यश मिळणे अशक्य असते. तेव्हा कामगारांना व अन्य अस्सल विरोधी पक्षांना

ते संपादिता येणे दुष्कर असते, हे वेगळे सांगायला नको. धनवानांच्याच हाती माहिती शिक्षण, प्रचारादी साधने असल्यामुळे दुसरी बाजू ते सोयिस्करपणे अंधारात ठेवू शकतात.

तरीसुद्धा स्टॅलिनवादी म्हणतात तसे या लोकशाहीला निव्वळ औपचारिक म्हणून त्याज्य ठरविणे योग्य होणार नाही. या बूर्ज्वा लोकशाहीला मोडून नव्हे तर पार करून (ट्रान्सेन्ड) समाजवादी लोकशाही अस्तित्वात येऊ शकते. कार्यक्रमदृष्टचा समाजवाद भांडवलशाहीपेक्षा अधिक बहुलवादी व लोकशाही असायला हवा. प्रत्यक्षात मात्र आजपर्यंत तो बूर्ज्वा राजकीय लोकशाही इतकाही विकसित झालेला नाही, कारण राज्यसत्ता व एकाधिकार यावरच त्याने भिस्त ठेवली. त्यामुळेच पश्चिमेतील डाव्या शक्ती आज स्वातंत्र्य व लोकशाहीची हमी देऊ शकेल अशा समाजवादासाठी झगडत आहेत. व्यक्तींना त्यांचे हक्क देण्याबाबत समाजवादाचे आजवरचे कार्य एकूण निराशाजनकच म्हणावे लागेल आणि याचे अपश्रेय वस्तुनिष्ठ परिस्थितीपेक्षा राज्यकर्त्यांच्या वैचारिक राजकीय एकात्मतेलाच द्यावे लागेल. त्यांच्या या वृत्तीमुळेच निवडणुका केवळ देखावा ठरतात, राजकीय चैतन्य हा राजकीय औदासिन्याचा केवळ मुखवटा ठरतो. जनसंपर्काच्या साधनाद्वारे लोकमताचे पडसाद उमटत नाहीत की लोकांना वस्तुस्थितीचे ज्ञानही होत नाही. कामगारांना संपाचा हक्क नाकारण्यात येतो (हा हक्क त्यांनी बूर्ज्वा लोकशाही देशातही झगडून पदरात पाडून घेतला असताना समाजवादी म्हणविणाऱ्या राजवटीमध्ये सुद्धा त्यांना त्या हक्कासाठी झुंजावे लागणे हे समाजवादाच्या अभावाचेच लक्षण आहे). पक्षांतर्गत होणारे आत्मपरीक्षणही पातळीवार होत असते म्हणजे खालच्या पातळचा वरच्यांचे परीक्षण करू शकत (धजत) नाहीत. परीक्षणातही पुढाकार श्रेष्ठींनीच घ्यायचा असतो. टीका वर्गशत्रूंचीच नव्हे तर वर्गबांधवांचीही सहन केली जात नाही. यातूनच चळवळीचे अधःपतन अटळ होऊन बसते.

कामगारवर्ग सामाजिकदृष्टचा बलवत्तर होण्याचा स्वयंव्यवस्थापक हाच एक मार्ग आहे. सामाजिक स्वयंशासनाचा तोच गाभा आहे. समाजवादी चळवळ त्याच्याखेरीज सामाजिक होऊ शकत नाही, ती केवळ राजकीय राहील आणि क्रमशः राज्यवादात परिवर्तीत होईल. मात्र स्वयंव्यवस्थापनाचा अर्थ केवळ संपूर्ण स्वायत्त समूह-व्यवस्थापन असा नाही. समाजातील काही समूह अन्य समूहांना जर साधन म्हणून वापरू लागले तर तिथेही परात्मभाव अटळ होईल व सामूहिक भांडवलशाही अवतरेल. एकात्मिक समाजवादी समुदाय निर्माण होण्यासाठी स्वयंशासन व स्वयंव्यवस्थापन ही साधने असली तरी स्वयंमेव मूल्य नाहीत ती कितीही आवश्यक असली तरी पुरेशी मात्र नाहीत. निर्णयकर्ते कोण आहेत तसेच त्या निर्णयांचा आशय काय आहे हेही तितकेच महत्त्वाचे असते. निर्णयांचे मूल्यांकन ते समाजवादी समुदायाच्या निर्मिती व विकासासाठी कितपत उपयुक्त ठरतील याच आधारे करण्यात आले पाहिजे.

केवळ उत्पादन व उपभोग यांच्या पछाडलेपणापोटी मागासपणातून झपाट्याने बाहेर पडण्याचा केलेला प्रयत्न नेहमीच समाजवादाला मारक ठरण्याची शक्यता असते. कारण अशा वेळी उत्पादन-वितरणाच्या पातळीवरच समाजवादाचे सर्व प्रश्न आणून बसविले जातात. गरीब समाजवादी राष्ट्राने भौतिक वैपुल्याचे प्रयत्न अवश्य करावेत परंतु भौतिक मालमत्ता व मानवी मालमत्ता यांच्यातील संबंध साधन-साध्याचे आहेत, त्यांची उलटा-पालट होऊ नये ही दक्षता नेहमीच घेतली गेली पाहिजे. समाजवादी समुदायात लोकांच्या हितसंबंधांना स्थान निश्चितच असले तरी त्यांचे सर्वसर्वाकरण (अॅब्सॉल्यूटायझेशन) करून चालणार नाही. नागडे हितसंबंध समुदायाचा स्थायी पाया ठरू शकत नाहीत. प्रत्येकाचे हितसंबंध इतर सर्वांच्या हितसंबंधांशी निगडित, एकरूप व पूरक होणे अगत्याचे असते. मग त्यासाठी व्यक्तीच्या व गटाच्या हितसंबंधाचा सर्वांच्या हितसंबंधाखातर बळी पडला तरीही तो क्षम्य ठरतो. संपूर्ण जीवनात केवळ आर्थिक हाव व आपापसातील स्पर्धा यांचाच प्रादुर्भाव झाला तर समाजवादी म्हणविणाऱ्या त्या समाजात, मार्क्सने जिच्यावर टीकास्त्र सोडले ती बूर्ज्वा मूल्यव्यवस्थेची उतरंडच पक्की होत जाईल.

समाजवादापासून व्यक्तींचे विशिष्ट प्रकारचे व्यक्तिमत्त्व साकार झाले पाहिजे. ते आत्मकेंद्रित व्यक्तीचे जसे नसावे तद्वतच अमूर्त-नागरिकाचेही नसावे, तर नागरिकांची कर्तव्ये खऱ्या अर्थाने व अहर्निश करणाऱ्या सचेतन व्यक्तीचे ते व्यक्तिमत्त्व असावे. सामाजिक हितसंबंध निर्धारित करण्यास त्याला वाव असल्यामुळे ते त्याला स्वतःचेच हितसंबंध वाटतील. प्रसंगी त्याला स्वतःच्या वा गटाच्या हितसंबंधांना गौणत्व द्यावे लागले तरी ते खऱ्या सामुदायिक हितसंबंधाप्रती असल्यामुळे सामाजिक एकात्मतेत विघातक ठरणार नाहीत. अशा समाजात उतरंड असली तरी न्यूनतम आणि लोकशाही प्रकारची असेल. हक्क व कर्तव्ये, व्यक्तीच्या/गटाच्या हक्कांची जाणीव व सामाजिक शिस्त यांचा समन्वय असेल. अतिरिक्त मूल्याच्या फेरवितरणाच्या न्याय्य व समाधानकारक पद्धती उपलब्ध असतील. नैतिक जाणिवा व उत्तरदायित्व व्यक्तीच्या अंगी बाणलेले असेल. स्वातंत्र्याचे भय वाटून सामूहीकरणाच्या आडोशाला जाण्याची गरज मग व्यक्तीला उरणार नाही. त्याची स्वायत्तता सामाजिक स्वरूपाची असेल. परिपूर्ण जीवन जगण्याची आकांक्षा व क्षमता त्याच्या अंगी येईल आणि अशाप्रकारे समाजवादी क्रांती कोणत्याही एकाच क्षेत्रापुरती परिमित न राहता सामाजिक, आर्थिक, राजकीय व नैतिक अशा सर्व क्षेत्रांत ती सुसंवादीपणे घडून येईल. किंबहुना, ती मानवतावादी संपूर्ण क्रांती ठरेल. मग दरवेळी 'आपली स्वप्ने आता पूर्ण होण्यातच आहेत' असे सांगून पुन्हा भवितव्याचा हवाला देत राहण्याची गरज उरणार नाही. ☐

**[ समाज प्रबोधन पत्रिका, जुलै–ऑगस्ट १९७६ अंकावरून लेख साभार पुनर्मुद्रित ]**

# अशी चौकशी, अशी फाशी ! : पृष्ठ १० वरून

दोघेहीजण कॅलिफोर्नियाचे असल्यामुळे एकमेकाबद्दल अभिमान बाळगीत असत. उमद्या मनोवृत्तीचा हा मनुष्य पुढे सेक्रेटरी ऑफ स्टेट झाला परंतु हल्डमन–एहरलियमन ह्या दुक्कलीने पुष्कळ वेळा निक्सन आणि रोजर्स ह्यांच्यामध्ये वितुष्ट उत्पन्न करण्याचा धंदा कायम ठेवला होता.

पाचवी व्यक्ती–रोझ मेरी वुडस : १९५० साली निक्सनच्या निवडणूक मंडळाच्या कार्यालयात कामाला लागलेली ही बाई शेवट-पर्यंत अत्यंत प्रामाणिकपणाने राहिली. पहिल्या पहिल्यांदा निवडणूक फंडाचे हिशोब फार चोखपणे ती ठेवीत होती; परंतु पुढे पसाराच इतका वाढला : भरमसाट पैसा समितीच्या हातात येत गेला की, मिसेस वुडसपर्यंत पैसे आणि हिशोब येऊन पोहोचतच नसत. अत्यंत मानी स्वभावाची होती, परंतु हल्डमन मिचेल ह्यांच्या दडपणामुळे न्यायालयात साक्षीला उभी राहिली असताना, केवळ निक्सनला वाचविण्याच्या उद्देशांनी, २० जून १९७२ च्या टेपविषयी तिला खोटी साक्ष द्यावी लागली. ह्या दिवशीच्या निक्सनच्या टेलिफोन-वरून केलेल्या भाषणाचा साडेआठरा मिनिटे चालेल एवढा टेपचा भाग माझ्याकडून खराब झाला असे न्यायालयात सांगताना तिला केवढे दुःख झाले असेल, ह्याची कल्पनाच करवत नाही.

सहावी व्यक्ती–एच. आर. हल्डमन : रॉबर्ट फिंच ह्याने १९६० मध्ये निक्सनची आणि हल्डमनची गाठ घालून दिली. त्यावेळी फिंच स्वतः निक्सन निवडणूक मंडळाचा एक प्रचारक होता आणि त्याच्याच सल्ल्याने हल्डमनला निक्सन–निवडणूक–प्रचार मोहिमेचा मुख्य बनविण्यात आले होते.

१९६० पासून पुढे सतत १३ वर्षे निक्सनच्या बरोबर राहून, पहिल्यांदा निवडणूक मंडळात व नंतर राज्यकारभारात काम केलेली व्यक्ती. वेळेवर काम करण्याचा उरक व शिस्तीचा भोक्ता. ५० भाषणे करण्यापेक्षा टी. व्ही. चा पूर्ण उपयोग करून घेऊन निक्सनचे नाव एकसारखे जनतेपुढे ठेवण्याचा उपक्रम करणारा निक्सनचा सहाय्यक. ह्याने निवडून काढलेले–पुढे निक्सनच्या व्हाईट हाऊसमध्ये घुसलेले–जॉन व्हिटॅकर, जॉन वॉरनेर, जॉन एहरलिचमन व पॅट्रिक ग्रे, ह्यांनी १९६८ नंतर धुमाकूळच घातला. १९६० व १९६८ ह्या दोन्ही निवडणुकांच्या वेळी हल्डमन व त्याचा स्नेही हर्बर्ट कामबँच वकील मन लावून काम करीत होते.

१९६० ची निवडणूक निक्सन हरला व १९६२ ची गव्हर्नरपदाची निवडणूक लढविण्यासाठी पुढे सरसावला त्यावेळेपासून जी काही माणसे निक्सनच्या बरोबर होती त्यात सीटल येथे वकिली करणारा जॉन एहरलिचमन, जे वॉल्टर थॉम्पसन कंपनीत काम करणारा हल्डमन, रेनॉल्ड झिगलर व डवाइट चॅपमन, पॅट्रिक बुचानन, रे प्राइस, वुईल्यम सफायर, जॉन सीअर्स, थॉमस इव्हान्स व लिओनार्ड गार्मेंट.

१९६३ पासून निक्सन न्यूयॉर्क येथील सॉलिसिटर्स कंपनीमध्ये वकिलीचे काम करू लागला. त्यावेळी त्या कंपनीचा भागिदार जॉन न्यूटन मिचेल ह्याच्याशी निक्सनचा दाट परिचय झाला. मिचेल हा जवळ जवळ निक्सनच्याच वयाचा. पूर्वी जॉन केनेडीबरोबर वायुदलात नोकरी केलेला. चेहऱ्यावरून अत्यंत शांत, गंभीर, मितभाषणी, मनमिळाऊ स्वभाव ह्यामुळे सर्व थरांमधील लोकांत तो सहजपणे मिसळला जात असे.

उमेदवाराला निवडणुका लढविण्याच्या वेळी निरनिराळ्या व्यक्तींचा परिचय चांगल्या तऱ्हेने होत असतो व निवडणूक मंडळा-तील जबाबदारीची स्थाने त्या त्या लायक व कर्तबगार व्यक्तींकडे तो सोपवीत असतो. निवडणुका जिंकल्यावर उमेदवार स्वतः जुलमी सत्ताधारी नसतो परंतु भोवतालच्या व्यक्तींचा गुलाम बनत जातो आणि सभोवतालचे वर्तुळ हे खुषमस्कऱ्यांनी आणि होयबांनी आणि हातचलाखी करणाऱ्यांनी भरलेले असते. त्यांच्यातीलच कर्तबगार व्यक्तीच्या हातातील निवडून दिलेला उमेदवार हा बाहुले असतो.

निवडणूक-लढत म्हणजे एक रक्तहीन युद्ध. त्याच्यांतही युद्ध-कलानिपुण Strategist असतात. मध्यस्थ व्यक्ती असतात, दुसऱ्याच्या खिशात हात घालून त्याला न दुखवता पैसा साळसूदपणाने खेचून काढणाऱ्या व्यक्ती असतात व King's Lancers—म्हणजे पुढे नेटाने सरकणाऱ्या व्यक्ती असतात.

Edger Berman ह्या लेखकाने Politician Primeval ह्या नुकत्याच प्रसिद्ध केलेल्या आपल्या ग्रंथात ह्या विषयासंबंधी लिहि-ताना म्हटले आहे :

'All advance men are wired together into the central purpose of Politics–which is the persuit of power, the control of events. To be an advance man is a great affair. Campaign headquarters sometimes attract young business-man especially young lawyers. For all of these types, Politics is the adventure of a season. It's a once-in-a-lifetime deal.'

१९६८ च्या निक्सन निवडणूक मंडळामध्ये एकूण ३८ तरुण वकील होते, हे ध्यानात घेण्यासारखे आहे व ह्याच्यातूनच पुढे निवडणूक झाल्यावर १२ व्यक्ती व्हाईट हाऊसमध्ये घुसल्या. ही माणसे आत घेण्यामध्ये हल्डमन हा फार दर्दी. अत्यंत हुशार व चलाख व्यक्ती. जरा अंगाने थिलथिलीत. बोलण्यात मृदू, वागण्यात सरळ अशा ह्या हल्डमनने थोडक्याच वेळात व्हाईट हाऊस हादरून सोडले.

लॉस एन्जेल्स येथील कॅलिफोर्निया युनिव्हर्सिटीमधील एक साधा-सुधा समजला गेलेला हा तरुण व्हाइट हाऊसमध्ये कर्दनकाळ ठरला.

१९४९ मध्ये जे. वॉल्टर थॉम्पसन ह्या कंपनीत विक्रेता म्हणून तो कामास लागला. ज्या ज्या वेळी निक्सन निवडणुकीला उभा राहिला त्या त्या प्रत्येक वेळी हल्डमनने कंपनीकडे रजेचा अर्ज सादर करून कामासाठी रजा मागून घेतली होती. १९६७ मध्ये जे वॉल्टर थॉम्पसनमध्ये तो बऱ्याच वरच्या जागेवर काम करीत होता. त्या कंपनीमधून ४ व्यक्ती निक्सनच्या निवडणुकीशी निगडित होत्या. त्यातील लॅरी हिगबी हा २३ वर्षांचा बाणेदार तरुण हल्डमन-बरोबरच कंपनीतून बाहेर पडला व व्हाइट हाऊसमध्ये दाखल झाला.

मर्फी हल्डमनविषयी बोलताना म्हणत असे–

'It was a total commitment, a clear-cut case of hero-workship, almost a wedding. The basic loyalty was to the man, not to the Republican Party; perhaps not to the traditional processes of Government.... you have to understand that......the tragedy was his loyalty.'

पण हेही तितकेच खरे की, हल्डमनचे स्वतःचे पैशाचे व्यवहार अत्यंत चोख होते, कोणतेही व्यसन त्याला नव्हते, त्यामुळे व्हाइट हाऊसमध्ये त्याचा फार वचक आणि दबदबा होता.

सातवी व्यक्ती–जॉन एहरलिचमन : हल्डमनचा कॉलेज शिक्षणापासूनचा दोस्त. १९६०, १९६२, १९६८ ह्या तिन्ही निवडणुका निक्सन लढला तो वर दिलेल्या व्यक्तींच्या बळावर. दुसऱ्या महायुद्धावरून परतल्यावर एहरलिचमन सीटल ह्या शहरी वकिली करीत होता. अत्यंत धार्मिक वृत्तीचा, निर्व्यसनी, नीटनेटका संसार करणारा, मनमिळाऊ, बुद्धीने तल्लख असा हा हल्डमनचा मित्र १९६८ नंतर व्हाइट हाऊसमध्ये दाखल झाला.

सगळं ठीकठाक चाललं होतं. परंतु निक्सनची ही निवडणूक यंत्रणा आतून पोखरल्यासारखी झालेली दिसत होती. १९६९ च्या मध्याला तर हे स्पष्टच दिसू लागले होते. प्रत्येकाला दुसऱ्याविषयी कसला तरी काहीतरी संशय येत होता हे त्याला खरे कारण.

मिचेल विरुद्ध फिंच, फिंच विरुद्ध कौलसन, क्लेन्डिस्ट विरुद्ध एहरलिचमन, हल्डमन विरुद्ध एहरलिचमन–असे सतत कोणाविषयी कोणीतरी संशयास्पद वृत्तीने वागत होते व एकमेकांकडे कावीळ झालेल्या दृष्टीने बघत होते.

१९६८ मधील निवडणुका झाल्या व सर्वचजण थकून गेले होते, म्हणून निक्सन, एहरलिचमन, हल्डमन, मिचेल व फिंच ही मंडळी की-बिसकायने येथे विश्रांतीसाठी एक आठवडा गेली.

नवीन सरकार स्थानापन्न होणार तेव्हा कोणाकोणाला कोणती जागा द्यावयाची ह्याविषयी विचार चालू होते.

मिचेलनी अॅटॉर्नी जनरल होण्याचे मान्य केले.

एहरलिचमनने Personal Counsel to the President होण्याचे मान्य केले.

हल्डमनने Chief of staff at White House होण्याचे मान्य केले.

'राज्य कसे करावयाचे' ह्याचा यत्किंचितही अनुभव तिघांनाही नव्हता.

निक्सनने, आपला जुना मित्र विल्यम रोजर्स ह्याला संरक्षण खाते घेण्यास सांगितले व ते त्यांनी मान्य केले. हेन्री किसिंजर ह्याला Foreign Policy Advise ह्या जागेवर नेमले. रॉजर्सला ते आवडले नाही. पहिल्याच वर्षात खटके उडावयास लागले. निक्सनला, दोघांचीही आवश्यकता आहे असे वाटल्यावरून, त्याला एकदा सांगावे लागले की, राज्ययंत्रणेवर पुरा ताबा राष्ट्राध्यक्षाचा राहील व त्याच्या खालोखाल बॉब हल्डमनचा.

वेळकाळ प्रसंगी न्यायबाह्य, गलिच्छ अशी कृष्णकृत्ये करून देखील आपण उभा केलेला उमेदवार निवडून आणावयाचाच अशा हिरिरीने आत पडलेल्या ह्या निक्सनच्या वर्तुळातील व्यक्ती, राज्य चालविण्याची जबाबदारी अंगावर पडल्यावर तरी सचोटीने व चोख मार्गाने राज्यकारभार चालवीत होत्या काय ? मुळीच नाही, तेच एकमेकांतील दुष्टावे, हेवेदावे, पैशाचे अपहार चालू राहिल्यामुळे राज्ययंत्रणा पुढील पाच वर्षांत पार कोसळून पडली. जॅक अॅन्डरसन म्हणतो :

'While power may not be corrupting, it is impossible to deny that the American Political system invites corruption. Men must accumulate funds to campaign for office. Those who finance the campaigns expect a return on their investments.'

राष्ट्रपतिपदावर आरूढ होताना अध्यक्ष निक्सन ह्याने २० जानेवारी १९६९ ला शपथ घेतली. 'मी कायद्याचे उल्लंघन करणार नाही–न्यायनीतीने वागेन–' मग त्या शपथेप्रमाणे तो वागला नाही म्हणूनच त्याचा अधःपात झाला.

राज्यासकट चालविण्याची जबाबदारी निक्सनने ज्यांच्या अंगावर टाकली त्यात अमेरिकेतील ५० संस्थानांचे राज्यकारभार व्यवस्थितपणे केलेले असे कोणी गव्हर्नर्स नव्हते, व्यवहारकुशल, चतुर असे कारभारी नव्हते किंवा तज्ज्ञ, नाणावलेले सल्लागार नव्हते.

दुसऱ्या महायुद्धावरून परतलेले सैनिक, १९६० ते १९६८ ह्या काळातील राजकीय निवडणुका लढविणारे सामान्य प्रतीचे लोक, जे. वॉल्टर थॉम्सन ह्या जाहिरात वितरक कंपनीतील नोकर, व नुकतेच कोठे न्यायालयात प्रविष्ठ झालेले वकील होते.

कोणत्याही राज्यकारभारात साधारणतः तीन महत्त्वाची खाती असतात. परराष्ट्रीय संबंध खाते, गृहखाते व अंतर्गत सुव्यवस्था खाते, परराष्ट्रीय संबंध खाते स्वतः निक्सनने व हेन्री किसिंजरने ठीक संभाळले होते. गृहखात्यामधील दोन व्यक्ती–डॅनियल मॉमनहिन् व आर्थर बर्न्स, दोघेही विद्वान. एक हारवर्ड युनिव्हर्सिटीतील प्राध्यापक व दुसरा कोलंबिया युनिव्हर्सिटीमधील प्राध्यापक. एका विषयावर दोघांचे कधीच एकमत झाले नाही व ते होण्यासारखेही नव्हते कारण ते दोघेही विद्वान होते !

निक्सनला दोघेही पाहिजे होते. बेबनाव राहूनदेखील दोघेही निक्सनला आपापल्या परीने मदत करीत होते व त्यांच्या दृष्टीने योग्य तो सल्ला देत होते. पण निक्सन एकंदरीने नाराजच होता.

हल्डमन– प्रशासकीय राज्यकारभार व इतर सर्व व्यवस्था पाहाणारी व्यक्ती. ह्या विषयाची काहीही माहिती नसलेला असा हा निक्सनचा अंतर्गत व्यवस्था सल्लागार. निरनिराळ्या विषयाकरिता अलग असलेली खाती लेखणीच्या एका फटकाऱ्याने त्याने आपल्या नजरेखाली आणली आणि त्यामुळे घटनेप्रमाणे अगदी स्वतंत्र असलेली प्रमुख खाती (Judiciary, Legislative And Executive) न्यायखाते, कायदे करणारे खाते व कायद्यांची अंमलबजावणी करणारे खाते– ह्या सर्व खात्यांतून गोलमेल सुरू झाला. १९६९ साल लोटले नाही तो हल्डमनचा सर्व खात्यावर न कळत अंमल सुरू झाला– जणू काय तोच राष्ट्रपती अशा थाटात व्हाईट हाऊसमध्ये वावरू लागला.

किसिंजरच्या परराष्ट्रीय खात्यामध्ये मात्र तो ढवळाढवळ करू शकला नाही. ह्याचे प्रमुख कारण म्हणजे निक्सनचा स्वतःचा तो

एक आवडीचा विषय होता. किसींजर समर्थ माणूस होता, व स्वतः हल्डमनला परराष्ट्रीय राजकारण ह्या विषयासंबंधी पूर्ण अज्ञान होते.

न्यायखाते व्हाईट हाऊसनी केव्हाच गुंडाळून टाकले होते. त्या ठिकाणी आपलेच होयबा पित्ते कामाला ठेवून न्यायखाते न्याय देण्यावाचून बाकी सगळे उपद्व्याप करीत होते. अँन्डरसन म्हणतो–

'Justice Department was populated at its upper levels with Ex-Campaign Managers and wounded political war horses. When Law enforcement becomes entangted with party politics and when the party managers are appointed to administer justice, the justice becomes vulnerable to the political fix.'

आताचे अमेरिकेचे परराष्ट्रीय राजकारण तेवढेसे अवघड व गुंतागुंतीचे नव्हते. मार खाल्लाच होता तेव्हा काहीतरी बहाणा दाखवून व्हिएटनाम युद्ध बंद करावयाचे, हजारो अमेरिकन सैनिक व्हिएटनाममध्ये मृत्यूमुखी पडलेच होते पण जे शिल्लक होते त्यांना अमेरिकेत सुखरूप परत आणावयाचे. इस्त्रायलमध्ये पैसा ओतून, ते राष्ट्र जिवंत ठेवून– अरब इस्त्रायल झगडे कायम चालू ठेवावयाचे– हे डाव खेळण्यामध्ये निक्सन व किसिंजर चांगलेच दर्दी व वाकबगार होते.

१९६९ च्या मध्यावर ३ गव्हर्नर्स रोमने, जॉन व्होल्ट आणि वॉलेटर हिकेल राजकारणात नवीनच उदयाला आलेले दोन तारे– वुइल्यम रोजर्स व मेलव्हिन लायर्ड, नाणावलेले दोन धंदेवाईक– डेव्हिड केनेडी व मॉरिस स्टान्स हे सर्वजण व्हाइट हाऊसमधून बाहेर फेकले गेले. हल्डमन व मिचेल ह्यांनी ह्या सर्वांना अशा जागांवर नेमून टाकले की व्हाईट–हाऊसमधील रोजच्या राजकारणांशी त्याचा काहीही संबंध येणार नाही.

आता १९६९ च्या अखेरीस व्हाइट हाऊस संभाळणाऱ्या तीन व्यक्ती– एहरलिचमन, मिचेल हल्डमन.

ह्या व्हाइट हाऊसची १९७० च्या सुरुवातीला रचना कशी होती ?

ओव्हल ऑफिसमध्ये शिरल्याबरोबर डाव्या हाताला प्रेस सेक्रेटरी, रोनॉल्ड झिपलरचे कार्यालय. त्याला जोडून जरा पुढे कॅबिनेट रूम, नंतर व्हाइट चॅपमनचे कार्यालय. तो झिपरलपेक्षा वयाने लहान व अपॉईन्टमेन्ट सेक्रेटरी. त्याने कोणालाही दिलेल्या निक्सनला भेटीगाठीच्या वेळा हल्डमनने नक्की करावयाच्या. ह्याच्या बाजूलाच पहिल्या वर्षी मॉमनीहन् व ऑर्थर वन्स बसत असत. नजिकच्या प्रशस्त दिवाणखान्यात हल्डमनचे कार्यालय. जवळच्या खोलीत त्याचे दोन हस्तक अलेक्झांडर बटरफिल्ड व हिंगबी. बिल्डींगच्या बेसमेन्टमध्ये हेन्री किसींजर आणि त्याच्या बाजूला वॉल्ड रेस्टो आणि मॅक बुंडी.

पहिल्या मजल्यावर राष्ट्रपती निक्सनची कार्यालये, जॉन एहरलिचमनचे कार्यालय, त्याच्यावरील दुसऱ्या मजल्यावर सेक्रेटरीज, दुय्यम सेक्रेटरीज व त्यांची कार्यालये आणि नोकरवर्ग. एका कोपऱ्यातील दिवाणखाण्यात हल्डमनचे गुप्त कार्यालय की, ज्यात फक्त आठ मुलीच काम करीत राहणार. इतर कार्यालये उघडण्याच्या अगोदर ह्या मुली कामावर व रात्री ११ वाजल्यानंतर घरी परतणार. ह्या पश्चिम भागावर पोलिसांचा कडेकोट बंदोबस्त.

पूर्व भागात मोठमोठाले चार दिवाणखाने, निक्सन–एहरलिचमन–मिचेल व हल्डमन ह्यांना भेटण्यासाठी येणाऱ्या मंडळींची बसण्याची व्यवस्था. एक्झिक्युटिव्ह ऑफिस बिल्डींगच्या व पहिल्या मजल्यावर बुचानन, प्राईस, व सफायर ह्यांची कार्यालये, व त्यांच्या शेजारीच जेब मॅगुडर, गॉर्डन स्ट्रॅचेन, हरबर्ट पोर्टर व जॉन डीन ह्यांची कार्यालये.

दुसऱ्या मजल्यावर उपराष्ट्रपती स्पिरो ॲग्न्यू ह्यांचे वैयक्तिक कार्यालय व नोकर वर्ग.

पहिल्या मजल्यावरच्या पश्चिम भागाला KING'S ROW ही संज्ञा दिली गेली होती. ह्याच भागात पुढील चार वर्षे निक्सनच्या बगलबच्चांनी असा काही धिंगाणा घातला, इतकी अनन्वित पापकृत्ये केली की त्यांची मोजदाद करणेही कठीण जाणार आहे.

१९५२ सालापासूनच निक्सनचे आणि मोठमोठाले वर्तमानपत्रकार, स्तंभलेखक, बातमीदार ह्यांचे विळ्या भोपळ्याचे नाते. निक्सनवर तेव्हापासून इतका विलक्षण मारा केला गेला की काही विचारण्याची सोय नाही, पण हातात तशी सत्ता नव्हती म्हणून निक्सन स्वस्थ बसला होता. १९७० सालानंतर मात्र त्याने त्यांची मुस्कटदाबी करण्याचा शिस्तवार प्रयत्न सुरू केला पण त्यात त्याला संपूर्ण अपयश आले.

जबाबदार वर्तमानपत्रकार, बातमीदार व स्तंभलेखक निक्सन व्हाईट हाऊमधून निघून गेला तरी त्याच्यामागे लागले होतेच. काहीही कारण नसताता आपल्या जांवयामार्फत चीनच्या माऊकडून आमंत्रण करायला लावून निक्सननी १९७६ मध्ये चीनची वारी केलीच. आणि वर्तमानपत्रांनी त्याची भंबेरी उडवून योग्य ती पूजा केली. एवढेच काय पण वॉशिंग्टन पोस्टचे २ तरुण वार्ताहर–बॉब वुडवर्ड व कार्ल बेनस्टिन ह्यांनी 'The Final days' हे निक्सनच्या पडत्याकाळाचे योग्य ते चित्रण केलेले पुस्तक छापले.

१७ फेब्रुवारी १९६९ ला म्हणजे राष्ट्रपतीपद स्वीकारल्यावर तीनच आठवड्यांनी निक्सनने बेब रिबेझो ह्याला बोलावून घेऊन सांगितले की लंडनला जाऊन त्याने व्ही. पॉल गेटी ह्या धनाढ्य व्यक्तीची भेट घेऊन त्याने जमवून ठेवलेला पैसा अमेरिकेत आणावा व त्याचा एक खाजगी फंड उभारला जाऊन तो इतर कोणच्याही हातात देऊ नये. स्वतः निक्सन, रिबेझो, एहरलिचमन व हल्डमन ह्यांच्यावाचून ही घटना कोणालाच माहीत नव्हती. परंतु १९७१ मध्ये इत्थंभूत हकिकत पोस्टनी छापलीच. नेहमीप्रमाणेच हल्डमनने नकार दिला. निषेध प्रकट केला.

येथून पापकर्मे करावयास सुरुवात झाली. व्हाइट हाऊसची विटंबना सुरू झाली. पावित्र्य लयाला गेले.

हळूहळू व्हाईट हाऊसचे 'Vice House' बनत चालले.

[क्रमशः]

क्रीडांगण । मुकुंद मणूरकर

# मुकाबला आहे 'ग्रेग' नीतिशी

पिकतं तिथं विकत नाही हेच खरं. नाहीतर बेदीप्रभृतींनी बाजूला टाकलेली इसाप-नीती टोनी ग्रेगने कशाला वाचली असती !

इसापनीतितील ही गोष्ट सगळयांनाच माहितय्. कावळा एक मांसाचा तुकडा तोंडात धरून झाडावर बसलेला असतो. खाली एक भुकेला कोल्हा येतो. त्याला तो मांसाचा तुकडा हवा असतो. म्हणून कावळयाची अभूतपूर्व स्तुती तो करू लागतो. 'कावळेदादा, तुमचा आवाज किती गोड. नाहीतर ती काळुंद्री कोकिळा, विशिष्ट वेळी आणि एकाच कर्कश आवाजात गाते. तुमचा आवाज मात्र विविधतापूर्ण आणि शिवाय कधीही तुम्ही गाऊ शकता. मला गाऊन दाखवा ना एखादी चीज.' एवढयावर तो कावळा भाळून रेकायला लागतो. आणि खाली पडलेला मांसाचा तुकडा कोल्हा अलगद मटकावतो.

या गोष्टीतील तात्पर्याचा उपयोग ग्रेगने करण्याचं ठरवलं. भारतात पाऊल टाकल्या टाकल्या या महाशयांनी कुठली रेकॉर्ड लावली असेल तर ती भारतीय अंपायर्सच्या स्तुतीची. 'भारतातील अंपायर्स जगातील इतर कुठल्याही श्रेष्ठ अंपायर्सच्या तोडीचेच आहेत. त्यांच्या हातून काही चुका झाल्या तर शेवटी माणसंच आहेत.' ग्रेगचे हें वक्तव्य काही उशीरा सुचलेल्या शहाण-पणाच्या वर्गातले नव्हते, तर ती एक उघड उघड चाल होती. कारण चार वर्षांपूर्वी भारतात आला होता तेव्हा हाच ग्रेग खोटी अपील्स करून आणि ती नाकारल्यावर हात-वारे करीत पंचांच्या अंगावर धावून जाण्यास कमी करत नव्हता. त्याच्या त्या वेळच्या वैशिष्टयपूर्ण अॅक्शन्सचे फोटोही प्रसिद्ध झाले होते. आणि हाच ग्रेग आता भारतीय अंपायर्स जागतिक दर्जाचे असल्याची कबुली देतोय.

आणि एवढयावर आपले अंपायर्स पाघळलेले दिसताहेत. नुकताच न्यूझिलंडचा दौरा संपला होता. आणि न्यूझिलंड कर्णधार ग्लेन टर्नरने भारतीय अंपायर्सबद्दल बरीच बोंबाबोंब केली होती. त्या पार्श्वभूमीवर ग्रेगने लावलेले मधाचे बोट त्यांना पुरेसे ठरले. मग काय बिशाद आहे संशयाचा फायदा इंग्लिश खेळाडूंना न मिळण्याची ? म्हणजे संशयाचा फायदा फलंदाजाला देण्याची प्रथा आहेच, शिवाय अंपायर्सनी भारतीय संघाला फेवर दाखवावं असंही कुणी म्हणणार नाही. पण एमिससारखा फलंदाज जेव्हा किरमाणीने झेल टिपल्याचे बघून स्वतःहून तंबूकडे जायला निघतोय् तरीही त्याला नाबाद ठरवायचे याला काय अर्थ आहे ? कलकत्त्याच्या सामन्यातील एक पंच श्री. शर्मा यांची न्यूझिलंडविरुद्ध मद्रास येथील कसोटीत नेमणूक झाली होती. पण ते स्वतः व त्यांचे दुसरे सहकारी हे दोघेही 'अपरिहार्य' कारणामुळे उपस्थित राहू शकले नाहीत. मग आयत्यावेळी दोन स्थानिक पंचांची नेमणूक झाली आणि त्यांनी अतिशय गलिच्छ पंचगिरी केली. भारताला बऱ्याच वेळा झुकतं माप दिलं. त्याबाबत ओरडाही खूप झाला. त्यामुळे शर्मांना या सामन्यात आपला 'रामशास्त्री' बाणा दाखविण्याची चांगली संधी होती व ती त्यांनी पुरेपूर साधली. ग्रेगविरुद्ध प्रसन्नाने केलेली पायचीतची अनेक अपील्स मग त्यांनी निर्विकारपणे फेटाळली. अर्थात श्रेष्ठ अंपायरचा बहुमान त्यांना ग्रेगकडून मिळेलच. (शिवाय ग्रेग लेखकही आहे. उद्या एखाद्या पुस्तकात शर्माबद्दल गौरवोद्गार आले की, शर्मासाहेबांना पितरच काय पण स्वतःही स्वर्गात गेल्याचा आनंद मिळेल !) एकूण ग्रेगच्या गुगलीने अंपायर्सची दांडी गुल केलीय आणि विजयातला एक मोठा अडथळा त्यांच्या मार्गातून दूर झाला.

स्तुतीचा हा प्रकार फक्त अंपायर्सच्या बाबतीतच मर्यादित नाही. सर्वांचीच स्तुती ग्रेग करतोय्. भारतीय हवामान, भारतीय प्रेक्षक, भारतीय क्रीडांगणे, भारतीय पाहुण-चार, भारतीय पत्रकार सर्वांवर नुसती स्तुतिसुमनांची उधळण चालवलीय् त्याने. 'फोडा आणि झोडा' या यशस्वी ठरलेल्या ब्रिटिश नीतीइतकीच ग्रेगची 'जोडा आणि खिशात टाका' हीही नीती यशस्वी ठरलीय्.

ग्रेगचे दुसरेही एक वक्तव्य वैशिष्टयपूर्ण होते. तो म्हणाला होता की, आम्ही येथे सर्व सामने जिंकायचा प्रयत्न करू. आणि ते जमले नाही तर तुम्हालाही जिंकता येणार नाही यासाठी धडपडू. याचे पुरेपूर प्रत्यंतर कलकत्त्याच्या सामन्यात आले. भारत केवळ १५५ धावात गडगडल्यावरही या पठ्ठयांनी कुठला धोका पत्करणे वगैरे तर सोडाच, पण मनमोकळेपणानेही फलंदाजी केली नाही. एक तर टॉस ग्रेग हरला होता. तेव्हा शेवटच्या दिवशी दुसरा डाव खेळायची त्यांची इच्छा नव्हती. तेव्हा पहिला डाव कितीही वेळ का चालेना, त्यांना त्याची फिकीर नव्हती. दिल्लीचा सामना तर जिंकला होताच तेव्हा हा अनिर्णित राहिला तरी चालण्यासारखे होते, नव्हे त्यांचा तसा प्रयत्नही चालला होता. पण आपल्या अव-सान घातकी फलंदाजीने तो हाणून पाडण्यात आला. संयमपूर्ण फलंदाजीचे सुरेखसे प्रात्य-क्षिक इंग्लंड संघाने नुकतेच दाखविले असता-नाही आमचे मदनलाल-किरमाणीसारखे खेळाडू, एकेक धाव काढल्यावर प्रेक्षकांनी केलेल्या कोलाहलामुळे उत्तेजित होऊन एका-मागोमाग एक चेंडू उचलीत होते. त्यांची ही तऱ्हा तर विश्वनाथची शैलीची वेगळीच तऱ्हा. पेपरवाल्यांनी मारे त्याचे कौतुक केले की विश्वनाथ त्याच्या नेहमीच्या ऑनड्राईव्ह करतेवेळी मनगटाला झटका देण्याच्या शैली-मुळे बाद झाला. कसली बोडक्याची शैली ! खरं तर विश्वनाथ खेळावयास आला तेव्हा गावसकर-गायकवाड स्वस्तात आणि लवकरच बाद झालेले होते. अशावेळी जरा वेळ काढायचे सोडून केवळ तीन धावा झाल्या असताना तो शैलीदार खेळ करतोय् याला काय म्हणायचे ? याच्या उलट ग्रेगचा एक किस्सा 'महाराष्ट्र टाईम्स'च्या वि. वि. करमरकरांनी सांगितलाय. ग्रेग म्हणाला की, 'चंद्राचा पहिलाच चेंडू मी ड्राईव्ह केला तो बेदीच्या डोक्यावरून गेला. तो थोडासा खालून जाता तर मी बाद होतो. तेव्हाच कानाला खडा

लावला की या पीचवर चेंडू ड्राईव्ह म्हणून करायचा नाही.' आणि पठ्ठ्याने त्याप्रमाणे करून दाखविले. भरपूर उंची, मनगटात ताकद, संघाची मजबूत स्थिती या भांडवला-वरही ग्रेगसारखा खेळाडू स्वतःच्या सत्तर धावा झाल्या असतानाही बेदीची ओळीने सात सात, आठ आठ षटके शांतपणाने निर्धाव खेळून काढू शकतो. आणि याबाबत त्याला कुठल्याही प्रकारे गिल्टी वाटत नाही. कारण पंचाहत्तर हजार प्रेक्षकांना आपल्या शैलीदार फलंदाजीने जरी नाही, तरी विदुषकी चाळ्यांनी चांगल्या प्रकारे तो रीझवू शकतो. वा ग्रेग, तुझी कमाल आहे!

खरं तर कलकत्त्याचा सामना भारत सहज अनिर्णित ठेवू शकला असता. पण पहिल्या सामन्यापासून आपल्या समोर कोणता संघ उभा आहे याचा मनापासून विचारच भारतीय संघाने केला नसावा. प्रत्येक खेळाडूचे वैयक्तिकरीत्या गुणदोष अभ्यासण्याप्रमाणेच संपूर्ण संघाचा सॉय-कॉलॉजिकली विचार करायला हवा. भारतीय संघाने हे केले नाही. एका विशिष्ट परिस्थितीत क्रिकेट खेळणारा प्रत्येक देश आपापल्या विशिष्ट पद्धतीने खेळत असतो. उदाहरणार्थ कलकत्त्याच्या सामन्यात इंग्लंड-च्या ऐवजी वेस्ट इंडिजचा संघ असता तर पावणेदोनशेच्या आत तो नक्की बाद झाला असता. कारण समोर सुरेख गोलंदाजी चालू असताना ती खालती मुंडी घालून नुसतीच तटवून काढण्याची वेस्ट इंडिजची पद्धत नाही. हिट आऊट ऑर गेट आऊट हे त्यांचे तत्त्व. पण इंग्लंडचे तसे नाही. व्यावसायिक-पणा त्यांच्या अंगी पुरेपूर मुरला आहे. धावा नाही निघाल्या तरी बेहत्तर. तासन तास चेंडू नुसतेच तटवून काढण्याचा संयमीपणा त्यांच्याजवळ नक्की आहे. शिवाय आपल्या-कडे बंपर्स, बाऊन्सर टाकणारे कुणी गोलंदाजही नाहीत. त्यामुळे जायबंदी वगैरे होण्याचीही इंग्लंडच्या खेळाडूंना भीती नाही. (ग्रेगने या गोष्टीबद्दल अनेकवेळा समाधानही व्यक्त केले आहे.) मग फिरकी गोलंदाजीपुढे धावा काढायच्या नाहीत असं ठरवल्यावर बाद न होता चेंडू नुसतेच खेळून काढणे विशेषसे अवघड ठरत नाही. त्यामुळे सामना जिंकण्याची आपली संधी एकदा हातातून सुटल्यावर पुन्हा ती प्राप्त होणे इंग्लंडविरुद्ध शक्य नाही. म्हणूनच पहिला डाव गडगडल्यावर व इंग्लंडने लीड घेतल्या-वर सामना अनिर्णित ठेवण्याच्या दृष्टीनेच भारताने पाऊले टाकावयास हवी होती. पण दुसऱ्या डावात फलंदाजी करतानासुद्धा आपण भराभर धावा करून इंग्लंडवर शेसव्वाशे धावांचे लीड ठेवू म्हणजे शेवटच्या दिवशी या धावा करणेही इंग्लंडला जड जाईल या दिवास्वप्नातच भारतीय खेळाडूंनी फलंदाजी केली. धावांकडे लक्ष न देता नऊ तास नुसते खेळून काढण्याची भारतीय फलंदाजांची क्षमता नक्कीच आहे. आणि हा सामना अनिर्णित ठेवला असता तर मालिकेतील ०—१ अशी पिछाडी भरून काढण्यात पुढे तीन सामने बाकीही होते. असो.

मद्रासचा तिसरा कसोटी सामना १४ तारखेपासून सुरू आहे. याच तंत्राचा वापर केल्यास आम्ही पुढचे सामनेही जिंकू असं ग्रेगने खुल्लंखुल्ला सांगितलंय. (परवा भारताच्या दुसऱ्या डावात गोलंदाजी करताना ग्रेगने समोरच्या अंडरवूडला उपयोगी पडतील असे खड्डे खेळपट्टीवर पाडले. आणि अंपायर्सनी त्याकडे सोयीस्कर दुर्लक्षही केलं.) एकूण काय तर भारताला इंग्लंडचे अकरा खेळाडू, दोन अंपायर्स व ग्रेगच्या मैदानातील व मैदानाबाहेरील करामतीविरुद्ध लढायचंय. हे लक्षात घेऊन त्यांनी खेळ केला तर घडगत आहे. अन्यथा पाचही सामन्यात सणसणीत-पणे मार खाण्याची मानसिक तयारी त्यांनी स्वतः आणि त्याहीपेक्षा लक्षावधी क्रीडा-शौकीनांनी आतापासून केलेली बरी.

□

दोन चित्रपट। शिरीष सहस्रबुद्धे

# फरारी

## हेही नसे थोडके!

या मराठी सिनेमावाल्यांना झालंय तरी काय?

'मराठी चित्रसृष्टी संपली' अशी हाकाटी एकीकडे चालू होती तेव्हा खचून जाऊन खरोखरच संपण्यापूर्वी त्यातल्या मंडळींनी चक्क पुन्हा उठून उभं राहण्याची धडपड सुरू केली. पैशाचा तुटवडा, थिएटर्सचा अभाव, तांत्रिक बाबींचा उजेड आणि मुख्य म्हणजे प्रेक्षकांचा थंडा प्रतिसाद अशा नानाविध अडचणींवर मात करून रंगीत चित्रनिर्मिती आणि तमाशापटांच्या चाकोरीतून मुक्तता अशी दोन पुढची पावलंही टाकली गेली. मराठी चित्रपट आता सर्रास रंगीत निघताहेत, एवढंच नव्हे तर रंगीत चित्रांना उपकारक ठरणारी पार्श्वभूमीची व तंत्राची समृद्धताही त्यात सढळपणे दिसते आहे, ही समाधानाची गोष्ट.

हे लिहिताना, या अलिकडच्या चित्रपटांच्या दर्जाचा विचार अर्थातच बाजूला ठेवला आहे. तो स्वतंत्रपणे आवश्यकतेनुसार ज्याचा त्याला करता येईल. जे घडलं आहे आणि घडतं आहे ते महत्त्वाचं आहे आणि काळाची ती गरज आहे. ते किती मोलाचं आहे, हा प्रश्नही योग्य, पण नंतर येणारा.

'फरारी' हा नवा मराठी चित्रपटही वर उल्लेखिलेल्या श्रेणीत येणारच आहे. 'झुंज' चित्रपटाद्वारे दिग्दर्शनक्षेत्रात पदार्पण करणारे आणि व्ही. शांताराम यांच्या तालमीत तयार झालेले दिग्दर्शक रवींद्र यांचा हा स्वतंत्र चित्र–निर्मिती–दिग्दर्शनाचा पहिलाच प्रयत्न. व्ही. शांतारामचा उल्लेख एवढ्यासाठीच

केला की, त्यांच्या शिष्यत्वाच्या काही खाणाखुणा रवींद्राच्या दिग्दर्शनातही जाणवल्यावाचून रहात नाहीत. चित्रपटाची श्रेयनामावलि, विशेषतः प्रारंभीच, तुटलेल्या सरातील ओघळलेल्या मोत्यातून तयार होणारी 'फरारी' ही अक्षरे हा अशाप्रकारचा एक खास नमुना एरवीही दिग्दर्शनात काही क्रांतिकारक प्रायोगिकता वगैरे नसली तरी नेटकेपणा–सुबकता निश्चित आहे. कथेचाही प्रकार असाच. कथानक आहे ते तमाशा आणि दरोडेखोरी या दोन्ही परिचित वळणांनी वाहणारे. कथाकारानं दोहोंची बेमालूम निरंगाठ मारली आहे. लता–लंका या जुळ्या बहिणी, तमाशाबारीतल्या मुख्य नर्तिका. त्यांच्या फडाचा (आणि जुळेपणाचाही) वापर एक दरोडेखोर करून घेत असतो. अशाच एका प्रकरणात, आपल्या हातून सावकाराचा खून झालाय् असा (गैर)समज झालेली लता फरारी होते. सिनेमातच शोभावा अशा योगायोगानं तिची एका शिपाईगड्याशी (अरूण सरनाईक) गाठ पडते ती जन्माचीच. मग हिशेबी गुंतागुंत. लताला दरोडेखोरानं (मधुकर तोरडमल) पळून नेणं, शिपाईबुवांनी तिच्या शोधार्थ आपल्या साथीदार जोडीसह–रिक्षावाला व सोनी–बाहेर पडणं, आणि वेषांतरादि नानापरींनी पुनर्मीलन असा एकंदर थाट. कथानकावरची 'हिंदी' छाप जाणवण्याइतकी स्पष्ट विशेषतः वेषांतर करून गाणी म्हणत एखाद्याच्या शोधार्थ बाहेर पडण्याचा मामला 'आँखें'सारख्या अनेक हिंदी चित्रपटांत पाहिलेलाच आहे. अर्थात मराठीत असे प्रकार पाहताना पब्लिकला जरा गंमत वाटते एवढंच.

'फरारी'चा तोल कलाकारांनी–यात संगीतकार राम कदम आलेच–छान सांभाळला आहे. प्रामुख्यानं उल्लेख करायला हवा तो जयश्री टी. चा. लता व लंका या जुळ्या बहिणीच्या डबलरोलमध्ये ती बहुधा निरपवादपणे आकर्षक दिसली आहे आणि दोघींच्या मेकअपमध्येच फक्त फरक न ठेवता व्यक्तिरेखांमध्येही जाणवण्याइतपत बदल दाखवण्याचा प्रामाणिक प्रयत्न तिनं अभिनयाद्वारे केल्याचं लक्षात येतं. हिंदी चित्रात नर्तिकेच्या ठोकळेबाज भूमिका पुनः पुन्हा करीत राहण्यापेक्षा तिला मराठीमध्ये नव्यानं मिळालेला वाव तिनं वाया दवडलेला नाही. 'तूच माझी राणी' या फरारीनंतर प्रदर्शित झालेल्या तिच्या चित्राकडे यामुळे प्रेक्षक अपेक्षेनं पाहतील. अरूण सरनाईक यांनीही आपल्या साध्याभोळ्या, सरळ–सुस्वभावी पोलिसाच्या भूमिकेचं 'बेअरिंग' उत्तम ठेवलं आहे, आवाज–संवादफेक व शरीर–मुद्राभिनय त्यांनी जाणूनच 'सॉफ्ट' केला असावा. दादा दरोडेखोराची भूमिका मधुकर तोरडमल यांनी पारंपारिक उग्रतेनं वठवली आहे. त्यांच्याकडून यापेक्षा अधिक talented performance ची अपेक्षा नक्कीच होती. अन्य पात्रे ठीक.

संगीतकार राम कदम यांनी दोन–तीन चाली बऱ्या दिल्या असल्या तरी संगीताची मला त्यापेक्षा आवडलेली वैशिष्टच म्हणजे मूळ गीत–संगीत व त्याचे चित्रीकरण भडक loud कर्कश करण्याचा मोह सर्व संबंधितांनी टाळला आहे आणि दोन–तीन गाण्याचा (उदा. 'पडला दरोडा पडला' व 'या आगीची धग' ही नृत्यगीते) उपयोग कथानकात प्रकर्षानं करून घेण्यात आला आहे. 'फरारी'मध्ये दोष नाहीत, असं कुणीच म्हणणार नाही, पण मराठी चित्रसृष्टीचा एकंदर नूर लक्षात घेता हेही नसे थोडके. *

## सुरुवात चुकवू नये आणि शेवट पाहू नये :

# दो अनजाने

हे दो अनजाने म्हणजे अमित रॉय ऊर्फ नरेश दत्त अर्थात अमिताभ बच्चन आणि रेखा ऊर्फ सुनितादेवी म्हणजे रेखाच. आता ऊर्फकारावरून कुणाला डबल रोलची अभद्र शंका येईल. पण तशी काही भानगड इथे नाही. म्हणजे अधिकृतपणे तरी. ही एक फर्मास कौटुंबिक भावकथा आहे. अमित रॉय हा साधासुधा गरीब कारकून व श्रीमंतीच्या हव्यासामुळे व नृत्यकलेच्या ओढीमुळे असमाधानी असणारी त्याची पत्नी यांच्या संसारात अमितचा एक रईस दोस्त रणजीत मलिक (प्रेम चोप्रा) याच्या आगमनामुळे उठलेलं वादळ हे मुख्य कथासूत्र. रणजित अमितच्या खुनाचा प्रयत्न करतो पण अमित बचावतो. मात्र त्याची याददाश्त हरवल्याने नरेश दत्त या नावानं एका लक्षाधीशाचा मुलगा म्हणून त्याचं जीवन नव्यानं सुरू होतं. एका अपघातानं दृष्टीचा पुनर्लाभ झाल्यानंतर तो कलकत्त्याला परतून रणजीतचे हिशेब चुकते वगैरे करतो. त्याची रेखा आता सुनीतादेवी या नावानं बडी हिरॉइन झालेली असते. तिचा पश्चात्ताप झिडकारून आणि आपल्या मुलाला घेऊन तो परत फिरलेला असतोही. तेवढ्यात त्याची (नवी) आई मध्ये पडते आणि सर्वांचं पुनर्मीलन होऊन शेवटाचा मुद्दा. शेवटच्या दृश्यापर्यंत ताण कायम राखण्यात दिग्दर्शकानं यश मिळवलं असलं तरी शेवटच्या ऐन मोक्याच्या क्षणी मात्र ओढून ताणून कौटुंबिक जिव्हाळ्याच्या सुखांत करून विश्वासघात केला आहे. म्हणूनच चित्रपटाचा शेवट पाहू नये असं म्हटलं. सुरुवात मात्र प्रेक्षणीय झाली आहे ती बऱ्याच काळानंतर फ्लॅशबॅकचा एक चांगला उपयोग पहायला मिळाल्यामुळे. अमितच्या दोन आयुष्यधाग्यांचा पीळ त्याला दुसरा अपघात होतो इथपासून फ्लशबॅक घेऊन पटकथाकारांनी मोठ्या हिकमतीनं उलगडलाय.

उत्पल दत्त या दादा ॲक्टरची एक नामांकित भूमिका हे दो अनजानेचं सगळ्यात मोठं आकर्षण. संन्याल नावाच्या एका बंगाली चित्रपट दिग्दर्शकाची ही छोटीशीच पण दिलपसंत भूमिका त्यांनी अत्यंत बहारीनं वठवली आहे. विशेषतः बंगाली बाबूंच्या हिंदी उच्चारांची जी खुमासदार टवाळी या भूमिकेतून केली आहे. ती अभिरुची संपन्न कॉमेडीचा एक उत्तम नमुना ठरावी. अमिताभनंही आपल्या दोनही रूपांचं वेगवेगळं बेअरिंग जीव तोडून सांभाळलंय. त्याच्या चालू छापातल्या नाण्यापेक्षा हे थोडं वेगळं असल्यानंही सुखदं वाटतं. विशेषतः त्याची पूर्वार्धातली अमित रॉयची अदाकारी बेहतरीन आहे. प्रेमचोप्राही त्याच्या अलिकडच्या मेहबूबासारख्या चित्रपटापेक्षा बराच सुसह्य आहे. रेखा आणि कल्याणजी आनंदजी यांनीही मन लावून काम केल्याचं दो अनजाने हे अत्यंत दुर्मिळ आणि अपवादात्मक उदाहरण ठरावं. चित्रपटाची सौम्य, soft प्रकृती ध्यानात घेऊन दोघांनीही आपापल्या कामात योग्य तो बदल केला आहे. एकंदरीतच जाणते आणि समर्थ दिग्दर्शक दुलाल गुहा यांचा 'दो अनजाने' चालू हिंदी चित्रप्रवाहापेक्षा बराच वेगळा आणि चवदार झाला आहे. □

# साप्ताहिक भविष्य

कृष्ण माईणकर

१५।१।७७ ते २१।१।७७

## अमेरिका व भारत मैत्रीच्या अधिक जवळ येतील

आज मकर लग्न उदीत आहे तर चंद्र वृश्चिक राशीत आहे. राशीला राहू व हर्शल जरी बारावा असला तरी तो प्रतिकूल घडवणार नाही. मात्र स्थानातच रवी आहे व भारताची रास मकरच आहे. याचा अर्थ भारताची प्रतिमा त्याचबरोबर पंतप्रधान श्रीमती इंदिरा गांधी व परराष्ट्र मंत्री श्रीयुत यशवंतराव चव्हाण हे मकर राशी बरोबर निगडीत असल्यामुळे जगातील राजकीय रंगमंचावर भारताची प्रतिमा खूप उंचावणार आहे. प्रामुख्याने अमेरिकेत याचे साद पडसाद उमटणार आहेत. अमेरिकेचे अध्यक्ष कार्टर भारताच्या अधिक जवळ येतील. अमेरिकेचे संबंध मैत्रीच्या जवळ येतील. वर उल्लेख केलेल्या भारतीय नेत्यांचे कौशल्य कसोटीस उतरेल. अंतर्गत राजकारणांत विरोधी पक्षांत आता संशोधनपर मंथन होईल. सरकार व विरोधी पक्ष यातील दर्शन कमी होईल. महाराष्ट्र कॉंग्रेस पक्षात बरेच बदल अपेक्षित आहेत.

---

**मेष : धंद्याची भरभराट**

दशमात रवी आणि भाग्यांत मंगळ व राशीतील गुरूबरोबर मंगळाचा नवपंचम योग ही ग्रहरचना म्हणजे तुमच्या स्वप्नपूर्तीची पावतीच होय. यावेळी तुम्ही जर एखाद्या धंद्याची मुहुर्तमेढ रोवणार असाल तर तुम्ही धंद्याच्या दृष्टीने मोठे भाग्यवान ठरणार आहात. चालू धंद्यात भरभराटीची स्पष्ट चिन्हे दिसू लागतील. आता तुमच्यापुढील साऱ्या अडचणी संपल्या आहेत व तुमच्या सफलतेची किरणे तुमच्या जवळ येत आहेत. नोकरीत अनेकांच्या नोकऱ्या कायम होतील. बेकारांना उच्चप्रतीची नोकरी मिळेल. चालू नोकरीत प्रमोशन मिळणार असून तुम्हाला वरिष्ठांच्या मर्जीचा लाभ होणार आहे. शुभ दिनांक १६–१८.

**महिलांना :** प्रेम व प्रतिष्ठा प्राप्त होणार आहे. पैसा बऱ्यापैकी मिळेल.

**विद्यार्थ्यांना :** आकांक्षापूर्तीचा आनंद मिळेल.

**वृषभ : अनुकूल परिस्थिती**

यावेळी तुमचे सारे हित एकट्या रवीच्या हाती आहे. तो भाग्यस्थानी असताना तुमच्या व्यावसायिक व सार्वजनिक जीवनात काही महत्त्वपूर्ण बदल झाले नाहीत तरच नवल ! एक विवाहेच्छु व्यक्तिचा प्रश्न सोडला तर इतर सर्व व्यक्तींस अनुकूल वातावरण आहे. विवाह लांबणीवर पडतील. पण संसारात सुखाची वृत्ति राहील. व्यवसाय सुधारेल. अडचणी दूर होऊन अनेक महत्त्वाचे निर्णय यावेळी होतील. सरकार दरबारी वजन वाढेल. सरकारदरबारची कामे प्रगतीच्या पथावर राहतील. लेखक व पत्रकार यांची गुरुच्या व्ययस्थानातील भ्रमणाची दखल घेणे आवश्यक आहे. दुसऱ्याच्या मनावर परिणाम होईल असे लेखन करू नये. आर्थिक बाजू भक्कम होईल. शुभ दिनांक १७–१९.

**महिलांना :** विवाहेच्छु स्त्रियांचा लग्नाचा बेत थोडा लांबणीवर टाकणे हितावह होईल.

**विद्यार्थ्यांना :** सर्वत्र सहानुभूतीचे व मदतीचे वातावरण राहील.

**मिथुन : साधारण अनुकूलता**

यावेळी तुमच्या भविष्याचे सारे काही रवीच्या हाती आहे. तो अष्टमात आला आहे. मंगळाबरोबरचे त्याचे संबंध दुरावले आहेत. तसेच गुरूही तुमच्या बाजूचा आहे. त्यामुळे अगदी जरी चांगले नसले तरी हा आठवडा थोडाफार अनुकूलतेचा जाईल. पैसा हा तुमच्या बाबतीत ज्वलंत प्रश्न. पण यावेळी त्याची अडचण भासणार नाही, गरज भागेल. कुणाकडे उसणे मागावे लागणार नाहीत. तुमचे जर जन्मस्थ ग्रहमान उच्च असेल तर यावेळी रेस-लॉटरीपासून लाभ होईल. लेखक व बुद्धिवंत यांना सरकार दरबारी मानाचा योग येईल. उच्चपदस्थांबरोबर प्रामुख्याने राजकीय क्षेत्रातील उच्चपदस्थाबरोबर लांबचा प्रवास घडू शकेल. नोकरीत ठीक. शुभ दिनांक १६–१७.

**महिलांना :** संसारात समाधानाची वृत्ती ठेवा. नोकरीत पगारवाढ मिळेल.

**विद्यार्थ्यांना :** अनुकूल असे काहीतरी घडेल.

**कर्क : विरोधकांना वचक**

राशीत शनी व शुभ स्थानी धनू राशीत मंगळ ही एकच ग्रहपरिस्थिती तुमच्या सध्याच्या परिस्थितीत उपकारक आहे. शनीमंगळ षडाष्टक असला तरी त्याचा तुम्हाला त्रास होणार नाही. उलट यावेळी तुम्ही तुमच्या सर्वच विरोधकांना तुमचा वचक निर्माण करण्यात मोठे यश मिळवाल. तुम्ही एखादे अधिकारी असाल तर तुम्ही शिस्तीचे वातावरण निर्माण करू शकाल. मात्र हाताखालची माणसे दुखवू नका. यावेळी बेकारांना कायम स्वरूपाची नोकरी मिळू शकेल. शनी-रवी प्रतियोग थोडाफार कटकटी निर्माण करणार असला तरी त्यामुळे नुकसान नाही. तब्येतीची मात्र काळजी घ्या. ज्यांना सर्दीचा त्रास होतो त्यांनी विशेष दक्षता घ्यावी. आर्थिक स्थितीत सुधारणा. शुभ दिनांक १६–१७.

**महिलांना :** संसारात मतभेदांना वाव देऊ नका. पैसा मिळेल.

**विद्यार्थ्यांना :** आत्मविश्वास वाढेल. यश हाती येईल.

**सिंह : यशाची ग्वाही**

पंचमात मंगळ व षष्टात रवी असताना तुम्ही बाराव्या रवीची मुळीच काळजी करू नका. तुम्ही तुमच्या विरोधकांना नामशेष करण्यात यावेळी खूपच यशस्वी होणार आहात. राजकारणात तुमची शान वाढणार असून तुमचे मोलही वाढणार आहे. तुमचा प्रभाव अनेकांना थक्क करून सोडील. नोकरीच्या दृष्टीने हितकारक असे काहीतरी घडेल. तुमचा बढतीचा वा बदलीचा प्रश्न तुम्हाला साहाय्यकारी होऊन सुटेल. प्रवासाचा यावेळी योग आहे. अनेकांना यावेळी लांबचा क्वचित परदेशाचा प्रवास घडण्याची शक्यता आहे. तुमच्यापैकी ज्यांचे विवाह ठरत नव्हते वा लांबणीवर पडत होते त्यांचे अचानक ठरतील व पारही पडतील. संसारात समाधान राहील. शुभ दिनांक १७–२०.

**महिलांना :** मुलांचे सुख मिळेल. नोकरीत बदल होईल.

**विद्यार्थ्यांना :** बुद्धी तल्लख होऊन स्मरणशक्ती तीव्र बनेल.

**कन्या : नोकरीच्या दृष्टीने बदल**

तुम्हाला खरे म्हणजे ग्रहमान सध्या प्रतिकूल नाही. चौथा मंगळ उगीचच मन साशंक ठेवतो. काल्पनिक भीती निर्माण करतो. पण त्याचे प्रत्यक्ष परिणाम काही होत नाहीत. मात्र यावेळी तुम्ही तुमचे घराचे प्रश्न समाधानकारकपणे सोडवू शकाल. नोकरीत प्रतिकूल असे काही घडणार नाही. जे घडेल व जो बदल होईल तो अति हितकारक ठरेल. प्रतिष्ठा व अधिकार यांत कोठेही

कमतरता येणार नाही. उलट ज्यांच्या नोकऱ्या कायम झाल्या नसतील ते नोकरीत कायम होतील. पगारवाढ वा इतर काही महत्त्वाचे प्रश्न वरिष्ठांकडून सोडवून घेण्यात यश मिळेल. प्रवासाचा बेत तडीस जाण्याची शक्यता नाही. शारीरिक स्थिती थोडीफार नरमगरम राहील. पण त्रास नाही. शुभ दिनांक १५–१७.

**महिलांना :** संसारातील अनेक प्रश्न सुटतील. तब्येत सुधारेल.

**विद्यार्थ्यांना :** कलाक्षेत्रात मोठे यश मिळेल. परीक्षा सोपी जाईल.

**तूळ : प्रगतीला वेग**

तिसरा मंगळ, सातवा गुरू व चौथा रवी ही या वेळेची तुमची ग्रहपरिस्थिती आहे. सर्वसाधारण ही परिस्थिती अनुकूलच आहे. यावेळी तुमच्या प्रगतीची सारी सूत्रे मंगळाच्या हाती आहेत, तो तुमची सर्वच क्षेत्रात घोडदौड सुरू करून देणार आहे. मंगळ हा अधिकार व कार्यक्षमता वाढवणारा ग्रह आहे. त्यामुळे तुमच्या अवतीभोवती जे अनुकूल वातावरण तयार होत आहे त्याचा तुम्ही भरपूर लाभ उठवा. धंद्यात नवीन भर घालून काही तरी भरीव काम करू शकाल. व्यापार भरभराटीला येईल. नोकरीची परिस्थिती समाधानकारक राहील. गैरसमज दूर होऊन गुणांना संधी मिळेल. वरिष्ठांची मर्जी वाढून अपेक्षित बदल घडवून आणता येतील. विवाहेच्छूंचे विवाह ठरतील. शुभ दिनांक १७–१९.

**महिलांना :** कलागुणांना प्रसिद्धी व पैसा मिळेल.

**विद्यार्थ्यांना :** मन आनंदी राहून अपेक्षित यश पदरी पडेल.

**वृश्चिक : नोकरीत नवे घडेल**

राहू-हर्शलची दृष्टी आता कमी होत आहे. त्यामुळे तुमचे मन आनंदी व उत्साही राहून हातून अनेक मोठे पराक्रम घडणे शक्य होईल. शेतीचा व्यवसाय व इंजिनियरिंग उद्योग उत्तम प्रकारे प्रगतीच्या मार्गावर वाटचाल करतील. वर्कशॉप असल्यास ते उत्तम पैसा मिळवून देईल. जमिनी विकणे व खरेदी करणे असे काही तुमचे असेल तर त्यातही चार पैसे मिळतील. रेस व लॉटरीत भाग घ्या. मात्र रेसच्या आहारी जाऊ नका. नोकरीची परिस्थिती समाधानकारक राहणार आहे. वरिष्ठांच्या मर्जीने अनेक कामे पुरी होतील. स्वतःच्या अपेक्षा पुऱ्या होतील. केलेल्या कामाचा वरिष्ठांवर प्रभाव पडेल. गैरसमज उरणार नाही. ज्यांच्या नोकऱ्या कायम नसतील त्यांच्या त्या कायम होतील. शुभ दिनांक १७–१८.

**महिलांना :** नोकरीच्या दृष्टीने समाधान मिळेल.

**विद्यार्थ्यांना :** परिश्रमाचे फळ पदरात पडेल.

**धनू : सामर्थ्य वाढेल**

राशीत मंगळ असेपर्यंत तुम्हाला कोणतीच भीति बाळगण्याचे कारण नाही. तुमचे सामर्थ्य सध्या इतके वाढते आहे की तुमच्या केसाला हात लावण्याचे धाडस कुणी करणार नाही. विरोधक संधीची वाट पाहात असले तरी त्यांचा तुमच्यावर कोणताच परिणाम होणार नाही. अपेक्षा पूर्ण करण्याइतके स्वास्थ्य व सामग्री तुम्हास प्राप्त होणार आहे. तुम्ही जे जे ठरवाल ते ते व्यवस्थित पार पाडण्याइतपत अधिकार तुम्हाला मिळतील. प्रामुख्याने नोकरीत तुमचे बस्तान बरेच समाधानकारक राहील. नवे प्रकार तुम्ही आत्मसात करा व त्याच्याशी समरस व्हा. अपेक्षा वा आशाआकांक्षा काही प्रमाणात पुऱ्या होतील. आर्थिक बाजू स्थिरावेल. कर्जातून मुक्त जरी झाला नाहीत तरी ते कमी होईल. शुभ दिनांक १७–१८.

**महिलांना :** संसारात अनेक उत्साहवर्धक गोष्टी घडतील.

**विद्यार्थ्यांना :** चांगले मित्र मिळतील व त्यांची मदत होईल.

**मकर : यशाची प्राप्ती**

अजून मंगळ बारावा आहे. तो तुमचे काही नुकसान करणार नसला तरी त्याच्याकडे दुर्लक्ष करून चालणार नाही. मात्र रवी हा राशीतच असल्यामुळे तोच तुमचा खरा त्राता आहे. त्याचे मकर संक्रमण झाल्यापासूनच खरे म्हणजे मकर राशीच्या व्यक्ती प्रगतीपथावर येऊ लागल्या आहेत. यावेळी तुमचे सारे बेत तडीस जाणार आहेत. नोकरीधंद्याची व सार्वजनिक कार्याची व्याप्ती वाढणार असून धंदा भरभराटीला आणण्याच्या प्रयत्नाला प्रतिसाद मिळणार आहे. नोकरीत मात्र गैरसमज वाढणार असून हाताखालची माणसे फारशी साथ देणार नाहीत. शुभ दिनांक १७–१९.

**महिलांना :** नोकरीत कार्यक्षमता वाढून वरिष्ठांच्या मर्जीचा लाभ होईल.

**विद्यार्थ्यांना :** काम करून चार पैसे मिळवण्याची संधी येईल.

**कुंभ : उपेक्षा संपणार**

रवी व मंगळ हे दोन्ही ग्रह तुम्हाला फार अनुकूल होते. आता रवी बारावा झाला तरी त्याच्या मकर संक्रमणाने तुमचे संक्रमण घडणार आहे. त्याचे सुप्त परिणाम तुमच्या बाबतीत होत होते ते आता स्पष्ट होतील. हे परिणाम अनुकूल होतील. तुम्ही राजकारणात आजवर जी कामगिरी बजावली आहे, त्याचे फळ तुमच्या पदरात पडण्याचा काळ जवळ आला आहे. तुम्ही या क्षेत्रात अधिक प्रभावी होणार आहात. नोकरी व धंदा सुधारेल. अचानक असे स्थलांतर कदाचित नोकरीत घडण्याची शक्यता आहे. धंद्याचे बस्तान चांगले बसेल. भागिदारीत लाभ होईल. यावेळी रेसमध्ये लाभ होणे शक्य आहे. इतर बाबतीत आठवडा अनुकूल आहे. शुभ दिनांक २०–२१.

**महिलांना :** नोकरीत प्रमोशन व बढती मिळेल.

**विद्यार्थ्यांना :** कमी श्रमाने भरपूर लाभ पदरात पडतील.

**मीन : अडचणीवर मात**

दुसरा गुरु व अकरावा रवी हे दोन्ही ग्रह प्रामुख्याने तुमचे आर्थिक जीवन समृद्ध करण्यासाठी वचनबद्ध आहेत. आता तुम्ही कोणतीच काळजी करू नका. जे जे मनात आणाल ते ते सहज घडून येणार आहे. तुम्ही रेसमध्ये लॉटरीमध्ये अवश्य भाग घ्यावा. व्यापारी लोकांनी यावेळी शेअर्स व वायदे याचे व्यवहार करावे. ते बरेच काही पदरात पाडून घेऊ शकतील. लेखकांना व प्रकाशकांना यावेळी पैशाची दगदग राहाणार नाही. स्वतंत्र प्रेसचा व्यवसाय ज्यांना उभा करावयाचा असेल त्यांना बरीच अनुकूलता आहे. कर्ज वा पैशाची इतर मदत मिळू शकेल. नोकरीत तुमच्या साऱ्या इच्छा आकांक्षा मंगळाच्या अनुकूलतेमुळे सफल होणार आहेत. वरिष्ठांची मर्जी राहील. शुभ दिनांक १७–२०.

**महिलांना :** संसारात स्वास्थ्य व नोकरीत समाधान मिळेल.

**विद्यार्थ्यांना :** लेखक म्हणून प्रसिद्धी मिळेल. □